# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, ■ सोमवार ६ एप्रिल २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठे १०







## दिल्ली हादरवण्याचा 'टॉय कार' कट उधळला!

### जैश-ए-मोहम्मदच्या दोन दहशतवाद्यांना अटक

**मुंबई/प्रतिनिधी** : मुंबई पोलीस आणि दिल्ली पोलिसांच्या विशेष पथकाने एक मोठी संयुक्त कारवाई केली. त्यांनी जैश-ए-मोहम्मद या दहशतवादी संघटनेशी संबंधित असल्याच्या संशयावरून मोसाब अहमद उर्फ कलाम आणि मोहम्मद हमद कालरा यांना अटक केली. ते दिल्लीत 'टॉय कार' बॉम्बस्फोट घडवण्याच्या तयारीत होते. सुदैवाने, कोणतीही घटना घडण्यापूर्वीच त्यांना पकडण्यात आले.



महाराष्ट्र एटीएस आणि दिल्ली पोलिसांच्या स्पेशल सेलने केलेल्या संयुक्त कारवाईत, मोसाब आणि हमाद या दोन संशयितांना कुर्ला आणि कडवाली येथे ताब्यात घेण्यात आले. पुढील तपासासाठी त्यांना दिल्लीला घेऊन जाणार आहेत. त्यांना न्यायालयात हजर केले जाईल, न्यायालयीन कोठडी सुनावण्यात येईल आणि त्यांची चौकशी केली जाईल.

दिल्लीत दहशत पसरवण्याचा कट उधळला एक मोठा दहशतवादी कट उधळला गेल्याने दिलासा मिळाला आहे. मोसाब आणि हमाद पुन्हा एकदा दिल्लीत दहशत पसरवण्याचा कट रचत होते. दोघेही ऑनलाइन कट्टरपंथी बनले होते. आरोपांनुसार, ते जैशच्या सांगण्यावरून भारतात काम करत होते.

मिळालेल्या माहितीनुसार, पोलीस पथकाने मोसाब आणि हमाद यांच्याकडून काही संवेदनशील वस्तूही जप्त केल्या आहेत. आरोपींचे ब्रेनवॉशिंग करण्यात आले असल्याचा तपास यंत्रणांना संशय आहे. या प्रकरणाचा पुढील तपास दिल्ली पोलिसांचे विशेष पथक करेल. पोलिसांनी दोघांनाही यापूर्वीच मुंबईच्या ताब्यात दिले आहे.

# सुनेत्रा पवारांविरोधात आकाश मोरेंना उतरवले रिंगणात

### काँग्रेसने केली घोषणा

**पुणे/प्रतिनिधी** : अजित पवार यांच्या अपघाती मृत्युमुळे रिक्त झालेल्या बारामती विधानसभा मतदारसंघात निवडणूक होत आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार या निवडणूक लढवत असून, महायुतीतील भाजपा, शिंदेसेना आणि महाविकास आघाडीतील राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाने त्यांना पाठिंबा दिला आहे. मात्र काँग्रेसने निवडणूक लढवण्याची भूमिका घेतली असून, आकाश मोरे यांच्या नावाची उमेदवार म्हणून घोषणा केली आहे. आकाश मोरे यांनी २०१४ मध्ये काँग्रेसकडूनच निवडणूक लढवली होती.

अजित पवार यांच्या अपघाती मृत्युमुळे रिक्त झालेल्या बारामती विधानसभा मतदारसंघात निवडणूक होत आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार या निवडणूक लढवत असून, महायुतीतील भाजपा, शिंदेसेना आणि महाविकास आघाडीतील राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाने त्यांना पाठिंबा दिला आहे. मात्र काँग्रेसने निवडणूक लढवण्याची भूमिका घेतली असून, आकाश मोरे यांच्या नावाची उमेदवार म्हणून घोषणा केली आहे.



**बारातमीत बिनविरोध निवडणूक होण्याची शक्यता संपली-** अजित पवारांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या या जागेवर बिनविरोध निवडणूक करण्याचे प्रयत्न महायुतीचे आहेत. आतापर्यंत बारामती विधानस मतदारसंघात १९ उमेदवारांनी अर्ज भरले आहेत.

**महाविकास आघाडीत फूट**

बारामतीत होत असलेल्या पोटनिवडणुकीमुळे महाविकास आघाडीत फूट पडली आहे. या जागेवर निवडणूक न लढवण्याची भूमिका महाविकास आघाडीतील राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार आणि उद्धवसेना या पक्षांनी घेतली आहे. दोन्ही पक्षांनी सुनेत्रा पवार यांच्या उमेदवारीला पाठिंबा दिला आहे, तर काँग्रेस निवडणुकीत उतरली आहे.

**राज्यसभा निवडणुकीपासून वाढली दरी-** अजित पवार यांच्या निधनानंतर दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या ☞(पान २ वर)

### सर्व पक्षांनी सुनेत्रा पवारांना पाठिंबा देत निवडणूक बिनविरोध करावी-शिंदे

**ठाणे/वृत्तसंस्था-** :बारामती विधानसभा मतदारसंघातील पोटनिवडणुकीसाठी महायुतीकडून सुनेत्रा पवार यांना उमेदवारी देण्यात आली आहे. ही जागा दिवंगत नेते अजित पवार यांच्या निधनामुळे रिक्त झाली आहे. दरम्यान, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सर्व पक्षांनी सुनेत्रा पवार यांना पाठिंबा देत ही निवडणूक बिनविरोध करण्याचे आवाहन केले आहे. ठाणे येथे माध्यमांशी बोलताना त्यांनी सांगितले की, अशा परिस्थितीत महाराष्ट्रात पोटनिवडणुका बिनविरोध करण्याची परंपरा राहिली आहे. महायुती सुनेत्रा पवार यांच्या पाठीशी ठामपणे उभी असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.



दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपूर येथे पत्रकारांशी संवाद साधताना याच भावनेतून सर्व पक्षांनी सकारात्मक विचार करावा, असे आवाहन केले. महाविकास आघाडीतील मित्रपक्ष असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस ☞(पान २ वर)

## 'सीडीआर लीकची चौकशी होणार, 'ईडी'चा फास आवळणार'

### अशोक खरात प्रकरणावर मुख्यमंत्री फडणवीसांचे स्पष्ट संकेत

**मुंबई/प्रतिनिधी** :अशोक खरात प्रकरणातील सीडीआर लीकची चौकशी केली जाईल. ईडी खरात याच्या मालमत्तेचीही चौकशी करणार आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज पत्रकारांसोबत संवाद साधताना दिली. ते आज नाशिकमध्ये बोलत होते. फडणवीस म्हणाले की, असे कॉल डेटा रेकॉर्ड मिळवण्याचा अधिकार कोणालाही नाही. सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांच्या दाव्याला उत्तर



देताना त्यांनी हे विधान केले. दमानिया यांनी खरात आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यातील संभाषणांचा खुलासा केला होता. त्यांना एका अज्ञात नंबरवरून व्हॉट्स?पवर खरातचा सीडीआर मिळाल्याचा त्यांनी दावा केला. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, ☞(पान २ वर)

### एसआयटीवर लोकांचा विश्वास

सीएम फडणवीस म्हणाले, ईडीने या प्रकरणाची दखल घेतली असून कारवाई सुरू केली आहे. खरातची सर्व खाती आमच्या निदर्शनास आली असून त्याद्वारे झालेले व्यवहार ओळखण्यात आले आहेत. सर्व बेकायदेशीर मालमत्ता आणि गैरप्रकार उघडकीस येतील, असा त्यांना विश्वास आहे. विशेष तपास पथकाच्या तपासावर आनंद व्यक्त करताना मुख्यमंत्री म्हणाले की, खरातबद्दल माहिती देण्यासाठी मोठ्या संख्येने लोक पुढे येत आहेत. याचे कारण म्हणजे लोकांचा विश्वास वाढत आहे. आतापर्यंत सुमारे १२ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. लोकांनी एसआयटीवर विश्वास ठेवावा, एसआयटी उत्तम काम करत आहे, असेही फडणवीस म्हणाले.

## बंगालमध्ये परिवर्तनाची लाट; निवडणुकांनंतर TMC च्या पापांचा हिशोब घेतला जाईल

### पीएम मोदींचा हल्लाबोल

**कोलकाता/वृत्तसंस्था-** पश्चिम बंगालमधील कूचबिहार येथे आयोजित सभेतून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राज्यातील सत्ताधारी तृणमूल काँग्रेस सरकारवर जोरदार टीका केली. बंगालमध्ये परिवर्तनाची लाट सुरू झाली असून, घुसखोरांना बाहेर काढले जाईल, असे मोदी यांनी स्पष्ट केले. तसेच टीएमसीवर भ्रष्टाचार, हिंसा आणि कायदा-सुव्यवस्था कोलमडल्याचा आरोपही त्यांनी केला.

**टीएमसीवाले घाबरले-** मोदी म्हणाले की, कूचबिहारमधील सभा ही बंगालमधील जनतेच्या बदलाच्या मनःस्थितीचे प्रतीक आहे. राज्यात टीएमसीच्या भ्रष्टाचार, हिंसा आणि प्रशासनातील अपयशामुळे जनतेमध्ये मोठा संताप आहे. काही दिवसांपूर्वी कोलकात्यातील ब्रिगेड



ग्राउंडवरून बंगालमध्ये परिवर्तन महाअभियानाची सुरुवात करण्यात आली होती. त्या सभेला मिळालेला मोठा प्रतिसाद पाहून टीएमसी घाबरली आहे आणि आता कूचबिहारच्या सभेने त्या परिवर्तनाच्या बिगुलावर शिक्कामोर्तब केले आहे.

**निवडणुकीनंतर कारवाईचा इशारा-** मोदी यांनी टीएमसीवर आरोप करताना म्हटले की, एकीकडे टीएमसीचे कटमनी, भ्रष्टाचार आणि सिंडिकेट राज आहे, तर दुसरीकडे विकास आणि विश्वास देणारी भाजप आहे. निवडणुकीनंतर भ्रष्टाचार आणि गुन्हेगारी प्रकरणांमध्ये कठोर कारवाई केली जाईल. ४ मेनंतर कायदा आपले काम करेल. कितीही मोठा गुन्हेगार असला तरी यावेळी न्याय होणार, असे आश्वासन पीएम मोदींनी दिले.

**महिलांच्या सुरक्षेचा मुद्दा-** मोदींनी संदेशखाली प्रकरणाचा उल्लेख करत महिलांच्या सुरक्षेचा मुद्दा उपस्थित केला. त्यांनी सांगितले की, महिलांच्या सुरक्षा, सन्मान आणि सक्षमीकरणासाठी भाजप सरकार काम करेल. देशातील ३ कोटी महिलांना 'लखपती दीदी' बनवण्यात आले. लोकसभा आणि विधानसभांमध्ये महिलांना ३३ऽ आरक्षण देण्याचा कायदा करण्यात आला. २०२९ च्या लोकसभा निवडणुकीपासून महिलांना त्याचा फायदा मिळेल.

**बंगाल एकेकाळी आघाडीवर होते...** एकेकाळी बंगालची गणना देशातील सर्वात विकसित राज्यांमध्ये केली जात असे. व्यापार, ☞(पान २ वर)

## नागभीड तालुक्यात वाघाचा थरारक हल्ला

## मोहफुले वेचायला गेलेला शेतकरी ठार!

**चंद्रपूर/वृत्तसंस्था-** चंद्रपूर जिल्ह्यातील नागभीड तालुक्यातील मींथुर येथे वाघाच्या हल्ल्यात एका शेतकऱ्याचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. मोहफुले वेचण्यासाठी शेतात गेलेले हरिदास महादेव कुबडे (वय ५८) हे शनिवारी संध्याकाळपर्यंत घरी न परतल्याने शोध घेतला असता वाघाने त्यांच्यावर हल्ला केल्याचा संशय व्यक्त होत आहे. रविवारी सकाळी शेताजवळील नाल्यात त्यांचे अवशेष आढळून आले असून परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे.

नागभीड तालुक्यातील मींथुर गावातील रहिवासी हरिदास महादेव कुबडे (५८) हे शनिवारी (दि. ४ एप्रिल) सकाळी लवकर शेतात मोहफुले




वेचण्यासाठी गेले होते. दिवसभरानंतरही ते घरी परत न आल्याने कुटुंबीय चिंतेत पडले. सायंकाळी सुमारे सहा वाजताच्या सुमारास त्यांचा पुतण्या अक्षय कुबडे हा त्यांना शोधण्यासाठी शेताच्या दिशेने गेला. शेताजवळ पोहोचताच त्याला अचानक वाघांची जोडी आणि त्यांच्यासोबत तीन बछडे दिसून आले. एवढ्या ☞(पान २ वर)

## जालन्यात रहस्यमय प्रकार! विद्युत खांबाजवळून 'लाव्हा सदृश' पदार्थ बाहेर

### महावितरणचे पथक घटनास्थळी; तपास सुरू

**जालना /वृत्तसंस्था-** : शहरातील राजपूत वाडी परिसरात रविवारी (दि. ५) दुपारी एक रहस्यमय घटना समोर आल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. विद्युत खांबाजवळील जमिनीतून 'लाव्हा सदृश' पदार्थ बाहेर पडत असल्याचे नागरिकांच्या निदर्शनास आले असून, या प्रकारामुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दुपारी सुमारे ४ वाजताच्या सुमारास काही नागरिकांनी विद्युत खांबाजवळून गरम व चिकट स्वरूपाचा पदार्थ जमिनीतून बाहेर येताना पाहिला. या घटनेने घाबरलेल्या नागरिकांनी तत्काळ



महावितरण विभागाशी संपर्क साधला. माहिती मिळताच महावितरणाचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी परिस्थितीचा आढावा घेत आवश्यक ती उपाययोजना सुरू केली. घटनास्थळी उपस्थित असलेल्या काही नागरिकांनी हा प्रकार प्रत्यक्ष ☞(पान २ वर)






## '...नाहीतर तुम्ही नरकात जगाल'

### अर्वाच्य भाषेचा वापर करत ट्रम्प यांनी दिली इराणला धमकी

**वॉशिंग्टन वृत्तसंस्था** : अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी रविवारी (५ एप्रिल) इराणविरुद्ध अत्यंत आक्रमक पवित्रा घेतला आहे. इराणच्या ऊर्जा पायाभूत सुविधांवर अभूतपूर्व हल्ले करण्याची धमकी देतानाच, येणारा मंगळवार इराणसाठी 'पॉवर प्लांट आणि पुलांच्या विद्ध्वंसाचा दिवस असेल' असे ट्रम्प यांनी जाहीर केले आहे. आपल्या 'ट्रुथ सोशल' पोस्टमध्ये ट्रम्प यांनी अत्यंत अर्वाच्य आणि प्रक्षोभक भाषेचा वापर करत म्हटले की, 'ती होर्मुझची)



सामुद्रधुनी उघडा, मूर्ख लोकांनो! नाहीतर तुम्ही नरकात जगाल – फक्त पाहत राहा! इराणला दिलेल्या या संदेशात ट्रम्प यांनी शिवराळ भाषेचा वापर केला आहे. विशेष म्हणजे, एका अमेरिकन राष्ट्राध्यक्षाकडून आणि सैन्यदलाच्या सरसेनापती कडून अपेक्षित असलेल्या शिष्टाचाराला सोडून ट्रम्प यांनी हे विधान केले आहे. अमेरिका आणि इराण मधील तणाव गेल्या काही आठवड्यांपासून शिगेला पोहोचला आहे. जगातील कच्च्या तेलाचा मोठा पुरवठा ज्या मार्गावरून होतो, ती 'होर्मुझची सामुद्रधुनी' खुली करण्यासाठी ट्रम्प सातत्याने दबाव टाकत आहेत. शनिवारी इराणच्या अणुकेंद्रानजीक झालेला हल्ला आणि अमेरिकेचे एक विमान पाडल्याच्या वृत्तानंतर ट्रम्प ☞(पान २ वर)

## दोन अमेरिकन विमानांसह हेलिकॉप्टर्सही केली नष्ट

### इराणच्या इस्लामिक रिव्होल्युशनरी गार्डचा दावा

**तेहरान; वृत्तसंस्था** : अमेरिकन रेस्क्यू ऑपरेशन (बचाव मोहीम) दरम्यान अमेरिकेची २ हेलिकॉप्टर आणि २ वाहतूक विमाने नष्ट केली आहेत, असा दावा इराणने केला आहे. इराणच्या इस्लामिक रिव्होल्युशनरी गार्ड कॉर्प्स (आयआरजीसी) नुसार, ही कारवाई इस्फहानच्या दक्षिण भागात करण्यात आली.



आयआरजीसीने म्हटले आहे की, अमेरिकन सैन्य कोसळलेल्या विमानाच्या वैमानिकाला वाचवण्यासाठी मोहीम राबवत होते. त्याचवेळी त्यांच्या विमानांना लक्ष्य करण्यात आले. इराणच्या दाव्यानुसार, या कारवाईत अमेरिकेची दोन सी-१३० वाहतूक विमाने आणि दोन ब्लॅक हॉक हेलिकॉप्टर नष्ट करण्यात आली असून अमेरिकेची बचाव मोहीम अपयशी ठरली. यापूर्वी इराणी माध्यमांनी एक विमान ☞(पान २ वर)

## कुवेतच्या तेल प्रकल्पावर इराणचा क्षेपणास्त्र हल्ला

## वीज निर्मिती आणि जलशुद्धीकरण केंद्रांचेही मोठे नुकसान

**कुवेत सिटी;वृत्तसंस्था** : आखाती देशांमधील तणाव आता टोकाला पोहोचला असून, रविवारी इराणने कुवेतवर ड्रोन आणि क्षेपणास्त्रांद्वारे भीषण हल्ला केला. या हल्ल्यात कुवेत सिटीमधील मंत्रालय संकुल आणि शुवेख भागातील तेल क्षेत्र संकुल प्रामुख्याने लक्ष्य करण्यात आले. या हल्ल्यांमुळे सरकारी इमारतींचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. यामध्ये आतापर्यंत कोणतीही जीवितहानी झाल्याचे वृत्त नाही. दरम्यान, हे हल्ले इराणी आक्रमकतेतून होत असल्याचे कुवेतच्या अर्थ मंत्रालयाने म्हटले आहे.



इराणी ड्रोननी केवळ सरकारी इमारतींनाच नव्हे, तर कुवेतच्या अत्यंत महत्त्वाच्या नागरी पायाभूत सुविधांनाही लक्ष्य केले. कुवेतच्या वीज आणि पाणी मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, दोन मुख्य वीज निर्मिती आणि जलशुद्धीकरण (डिस्टिलेशन) केंद्रांवर ड्रोन पडल्याने मोठे नुकसान झाले आहे. दोन वीज संच निकामी झाले आहेत. पाणीपुरवठ्यावरही परिणाम होण्याची शक्यता आहे. कुवेतमध्ये पिण्याच्या पाण्याचा ९० टक्के पुरवठा याच प्रकल्पांतून होतो.

हल्ल्यावेळी कुवेतच्या लष्कराने आपली हवाई संरक्षण यंत्रणा (एअर डिफेन्स सिस्टीम) सक्रिय केली होती. लष्कराने एक्स पोस्टवर माहिती दिली की,




# सिंहस्थ कुंभमेळयासाठी ३५ हजार कोटी रुपयांची विकास कामे होणार- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**नाशिक/प्रतिनिधीः-** प्रभू श्रीराम यांच्या पदस्पर्शाने पुनीत झालेल्या नाशिक त्र्यंबकेश्वरमध्ये पुढील वर्षी होणारा सिंहस्थ कुंभमेळा हा भव्य दिव्य आणि अविस्मरणीय करण्यासाठी ३५ हजार कोटी रुपयांची विविध विकास कामे करण्यात येत आहेत. भाविकांना विविध सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी नियोजन करण्यात आले असून या प्रक्रीयेत साधू- महतांचे मार्गदर्शन महत्वाचे आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

अखिल भारतीय संत समिती-राष्ट्रीय कार्य समितीच्या दोन दिवसीय बैठकीचा समारोप तपोवनातील श्री स्वामी नारायण मंदिर येथे झाला. त्यावेळी मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. कार्यक्रमाला कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, अखिल भारतीय संत समिती अध्यक्ष अविचल देवाचार्यजी, महंत श्री ग्यान देवसिंग महाराज, अखिल भारतीय आखाडा परिषदेचे अध्यक्ष रविंद्रपुरी महाराज, संत निवृत्ती महाराज, रावसाहेब महाराज गोसावी, पुरुषोत्तम महाराज देहूकर, अशोक तिवारी, श्री यतिंद्रानंद गिरीजी महाराज, जनार्दनहरी महाराज, स्वामी संविदानंद सरस्वती, जितेंद्रानंद स्वामी, ब्रह्मेशनंद महाराज, राजेंद्र दास, महंत दुर्गादास महाराज, भक्तिचरणदास महाराज आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, भाविकांना गोदावरीच्या निर्मळ आणि प्रवाही पाण्यात स्नान करता यावे म्हणून उपाययोजना केल्या जात आहेत. त्र्यंबकेश्वर येथे गोदवारीचा प्रवाह बारमाही व्हावा यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे. कुशावर्तासाठी जलशुद्धीकरण प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. त्र्यंबकेश्वर रस्ता, नाशिक परिक्रमा मार्ग, रेल्वे स्थानकावरील सुविधा, घाटांची संख्या आणि लांबी वाढविणे, जुन्या मंदिरांचे संवर्धन, मंदिराकडे जाणाऱ्या मार्गांचे रुंदीकरण, ओझर विमानतळाचे विस्तारीकरण आदी विकास कामे सुरू आहेत. साधूग्रामसाठी कायमस्वरूपी जमीन अधिग्रहणाचा निर्णय घेण्यात आला आहे. साधूग्राममध्ये आवश्यक सर्व पायाभूत सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात येतील, असे त्यांनी सांगितले.



ते पुढे म्हणाले, कुंभमेळ्याकरीता प्रयागराजच्या धर्तीवर नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा विकास प्राधिकरण स्थापन करण्यात आले आहे. कुंभमेळ्याच्या सूक्ष्म आणि नेटक्या नियोजनासाठी नाशिक येथील अधिकाऱ्यांच्या पथकाने प्रयागराजचा दौरा केला होता. मागील कुंभमेळ्याच्या तुलनेत यंदा दहा पट अधिक भाविक येण्याची शक्यता असून त्यादृष्टीने नियोजन करण्यात येत आहे. विकासकामे करतांना साधू, महंत आणि आखाड्यांकडून आलेल्या सूचनांचाही स्वीकार करण्यात येईल, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

संत शक्ती ही सज्जनशक्ती असून साधू संतांनी भारतीय संस्कृती टिकवून ठेवल्याचे नमूद करून मुख्यमंत्री म्हणाले, जगातील अन्य संस्कृती नामशेष होत असताना भारतीय संस्कृती टिकून राहिली. या संस्कृतीने वाईट गोष्टींना दूर सारले. ही प्राचीन असण्यासोबत नित्यनूतनही आहे. हेच भारतीय संस्कृतीचे वैशिष्ट्य आहे. साधू संतांनी या प्रवाहातील वाईट बाबी बाजूल्या सारल्याने संस्कृतीची निरंतरता टिकून आहे. महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायानेदेखील अनेक आक्रमणांना सामोरे जात वारीची परंपरा टिकवून ठेवली. हीच परंपरा कुंभमेळ्यात प्रतिबिंबीत होते.

कुंभमेळा भारतीय अध्यात्मिक संस्कृतीचा सर्वात मोठा सोहळा आहे. मन आणि आत्म्याच्या शुद्धीकरणाचा हा सोहळा आहे. विचारांच्या प्रदूषणाला दूर सारून भारतीय संस्कृतीला प्रवाहीत करण्याचे हे पर्व आहे. या सोहळ्यात सर्व जाती-धर्मांचे भाविक सहभागी होत असल्याने कुंभमेळा हा राष्ट्रीय एकात्मतेचे आणि भारतीय संस्कृतीचे प्रतिक आहे, असेही त्यांनी सांगितले. कुंभमेळ्यात केवळ पवित्र स्नान होत नाही, तर साधू - संतांचे मार्गदर्शन, विचारांचे आदान-प्रदान होत असल्याने पुढील वर्षी होणारा कुंभमेळा अविस्मरणीय होईल, असा विश्वास फडणवीस यांनी व्यक्त केला.

महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य विधेयकामुळे समाजातील गैरप्रकारांना आळा बसेल, असेही मुख्यमंत्री म्हणाले. भोंदूगिरी करणाऱ्यांविरोधात कडक कारवाई करण्यात येईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

यावेळी अविचल देवाचार्य, जितेंद्रानंद स्वामी, रवींद्रपुरी महाराज, तुषार भोसले यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी आमदार ॲड. राहुल ढिकले, महापौर हिमगौरी आडके-आहेर, उपमहापौर विलास शिंदे, स्थायी समितीचे सभापती मच्छिंद्र सानप, माजी आमदार बाळासाहेब सानप, महानगरपालिकेचे नगरसेवक यांच्यासह देशभरातून आलेले साधू, संत, महंत उपस्थित होते.

# इन्स्टाग्रामवर मैत्री अन् हॉटेलमध्ये भेट; प्रेमविवाह झालेल्या विवाहित महिलेचे १६ वर्षीय मुलावर लैंगिक अत्याचार

**छत्तीसगडः** एका २५ वर्षीय विवाहित महिलेने १६ वर्षांच्या अल्पवयीन मुलावर लैंगिक अत्याचार केल्याची धक्कादायक घटना छत्तीसगडमधील कबीरधाम जिल्ह्यात उघडकीस आली आहे. आरोपी महिलेने पीडित मुलाला हॉटेलमध्ये बोलावून त्याला इमोशनल ब्लॅकमेल केले आणि त्याच्यासोबत शारीरिक संबंध ठेवले. याप्रकरणी पोलिसांनी संबंधित महिलेला अटक केली आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ख्याती विश्वकर्मा (वय २५) असे अटक करण्यात आलेल्या महिलेचे नाव आहे. पीडित अल्पवयीन मुलगा आणि ख्याती यांची ओळख इंस्टाग्रामवर झाली होती. सुरुवातीला कधीतरी बोलणे व्हायचे नंतर या मैत्रीचे रूपांतर भेटीगाठींमध्ये झाले.

हॉटेलमध्ये बोलावले अन्...

पीडित मुलाने दिलेल्या फिर्यादीनुसार, १ एप्रिल रोजी ख्यातीने त्याला एका हॉटेलमध्ये भेटण्यासाठी बोलावले होते. तिथे पोहोचल्यानंतर महिलेने त्याला विविध प्रलोभने दाखवली आणि भावनिक दबाव टाकून त्याच्यावर लैंगिक अत्याचार केले. इतकेच नव्हे तर, या घटनेबाबत कोणालाही सांगितल्यास गंभीर परिणाम भोगावे लागतील अशी धमकीही तिने मुलाला दिली. या प्रकारामुळे पीडित मुलगा प्रचंड मानसिक दडपणाखाली होता. भीतीपोटी शांत राहिलेल्या पीडित मुलाने दोन दिवसांनंतर पोलीस ठाणे गाठून आपबिती सांगितली. पोलिसांनी तातडीने कारवाई करत ख्याती विश्वकर्माविरुद्ध 'पॉक्सो' कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला आणि तिला अटक केली.

प्रेमविवाह झाला असूनही कृत्य सुरूच

तपासामध्ये समोर आले की, आरोपी महिलेने प्रेमविवाह केला होता. लग्नापूर्वीपासूनच ती या अल्पवयीन मुलाच्या संपर्कात होती. लग्नानंतरही तिने मुलाशी असलेले संबंध तोडले नाहीत आणि त्याला जाळ्यात ओढून हे कृत्य केले. सध्या तिची रवानगी न्यायालयीन कोठडीत करण्यात आली आहे.

## १ व १० वरील उर्वरित

### सुनेत्रा पवारांविरोधात आकाश

विलिनीकरणाचा मुद्दा चर्चेत आला. शरद पवारांची राष्ट्रवादी सत्तेत सामील होणार होती, अशीही चर्चा आहे. त्यामुळे काँग्रेसमध्ये अस्वस्थता आहे. त्यातच शरद पवारांना राज्यसभेवर पाठवण्यात आले. त्यासाठी काँग्रेसमधील अनेक नेते तयार नव्हते. आता काँग्रेसने थेट राष्ट्रवादी विरोधातच भूमिका घेतली आहे.

आता काँग्रेसनेही उमेदवार जाहीर केल्याने राजकारण तापण्याची चिन्हे आहेत. काँग्रेसने धनगर समाजातील उमेदवार सुनेत्रा पवारांविरोधात उतरवला आहे. बारामती मतदारसंघात धनगर मतदारांची संख्या मोठी आहे. त्यामुळे काँग्रेसकडून मोरेंचे नाव निवडले गेल्याची चर्चा आहे.

### सर्व पक्षांनी सुनेत्रा पवारांना

(शरदचंद्र पवार गट) बारामती पोटनिवडणूक लढवणार नसेल तर काँग्रेस महायुतीच्या विरोधात उमेदवार देणार असल्याचे यापूर्वीच स्पष्ट करण्यात आले आहे. याबाबत दिल्लीतील नेत्यांची देखील परवानगी मिळाल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे बारामतीमधून काँग्रेसकडून उमेदवार निश्चित करण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात पोहोचली आहे.

एकीकडे काँग्रेसने निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतल्याचे स्पष्ट केले असताना दुसरीकडे ओबीसी आंदोलक लक्ष्मण हाके यांनी देखील आपण उमेदवारी अर्ज दाखल करणार असल्याचे सांगितले आहे. ते उद्या उमेदवारी अर्ज दाखल करणार असून विविध राजकीय पक्षांचा पाठिंबा असल्याचा दावा त्यांनी केला आहे.

### 'सीडीआर लीकची चौकशी

अशोक खरात प्रकरणातील सीडीआर लीकची चौकशी केली जाईल आणि कठोर कारवाई केली जाईल. कॉल डेटा रेकॉर्ड मिळवण्याचा अधिकार कोणालाही नाही. केवळ अधिकृत एजन्सीच ते मिळवू शकतात. हा डेटा कसा आणि कोणाकडून लीक झाला, याची राज्य सरकार चौकशी करेल, असेही ते म्हणाले. संवेदनशील प्रकरणांमध्ये केवळ तक्रारी पुरेशा नसतात. ठोस पुराव्यांच्या आधारे कारवाई केली जाईल. मुख्यमंत्र्यांनी असेही सांगितले की, ईडी अशोक खरातच्या पूर्वीच्या मालमत्तेच्या नोंदींची चौकशी करेल. एका महिलेवर तीन वर्षे बलात्कार केल्याच्या आरोपाखाली खरातला १८ मार्च रोजी अटक करण्यात आली होती. त्यानंतरच्या तपासात लैंगिक अत्याचार आणि जमीन व इतर मालमत्तेशी संबंधित आर्थिक अनियमितता यासह अनेक गुन्हे उघडकीस आले.

### बंगालमध्ये परिवर्तनाची लाट

उद्योग, कला किंवा संस्कृती, असे कोणतेही क्षेत्र असो, बंगाल त्यात नेहमीच अग्रेसर होते. मात्र, त्यानंतरच्या काळात, आधी डाव्यांच्या राजवटीत आणि नंतर तृणमूल काँग्रेसच्या राजवटीत या विकासाची झळाळी हळूहळू क्षीण होत गेली. पूर्वी बंगालमधील लोकांचे उत्पन्न राष्ट्रीय सरासरीपेक्षा अधिक होते; परंतु आता परिस्थिती इतकी खालावली आहे की, येथील सामान्य लोकांचे उत्पन्न राष्ट्रीय सरासरीपेक्षाही खाली घसरले आहे. देशातील इतर राज्ये वेगाने प्रगती करत असताना, तृणमूल काँग्रेसने बंगालला मात्र मागे ढकलले, अशी टीकाही पीएम मोदींनी केली.

### नागभीड तालुक्यात वाघाचा

जवळ वाघ दिसल्याने अक्षय घाबरून गेला आणि तात्काळ गावाकडे परतत ही माहिती ग्रामस्थांना दिली. गावकऱ्यांनी लगेचच ही बाब वनविभाग व पोलिसांना कळविली. माहिती मिळताच वनविभागाचे कर्मचारी आणि नागभीड पोलीस घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी परिसरात रात्री उशिरापर्यंत शोधमोहीम राबविली. मात्र रात्री सुमारे ९ वाजेपर्यंत हरिदास कुबडे यांचा कुठेही मागमूस लागला नाही. त्यामुळे वाघाच्या हल्ल्याचा संशय अधिक बळावला.

दरम्यान, रविवारी सकाळी पुन्हा वनविभाग आणि पोलिसांनी संयुक्तपणे शोधमोहीम सुरू केली. शोधमोहीम दरम्यान शेताजवळील एका नाल्यात मानवी अवयवांचे तुकडे आढळून आले. प्राथमिक पाहणीमध्ये वाघाने हल्ला करून शेतकऱ्याचे शरीर फस्त केल्याचे स्पष्ट झाले. मृतदेहाचे अवशेष अत्यंत विदारक अवस्थेत असल्याने ग्रामस्थांमध्ये भीती आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

वनविभागाच्या प्राथमिक अंदाजानुसार त्या परिसरात किमान चार ते पाच वाघ असल्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. त्यामध्ये वाघाची जोडी आणि तीन बछडे असल्याचेही सांगितले जात आहे. त्यामुळे या परिसरातील शेतकरी आणि ग्रामस्थांना जंगलाच्या परिसरात जाण्याबाबत सावधगिरी बाळगण्याचे आवाहन वनविभागाकडून करण्यात आले आहे. घटनास्थळी पोहोचलेल्या वन परिशेत्र अधिकारी बगमारे यांनी मृतदेहाचे अवशेष तात्काळ नागभीड येथील ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठविले. या घटनेबाबत पुढील तपास वनविभाग आणि नागभीड पोलीस करीत आहेत.

### जालन्यात रहस्यमय प्रकार

पाहिल्याचा दावा करत व्हिडिओ चित्रीकरणही केले आहे. या 'लाव्हा सदृश' पदार्थामुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून, नागरिकांनी खबरदारीचा उपाय म्हणून त्या ठिकाणापासून दूर राहणे पसंत केले. दरम्यान, हा प्रकार नेमका कशामुळे घडला याबाबत अद्याप स्पष्टता आलेली नाही. विद्युत गळतीमुळे जमिनीत उष्णता निर्माण होऊन काही रासायनिक प्रतिक्रिया झाली असावी, किंवा इतर कोणते कारण असू शकते, असा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे.

महावितरणच्या अधिकाऱ्यांकडून या घटनेचा सखोल तपास सुरू असून, लवकरच वस्तुस्थिती समोर येईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. तोपर्यंत नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता सतर्क राहण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. दरम्यान, निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल यांना विचारले असता त्यांनी अतिरिक्त उष्णता निर्माण झाल्यामुळे असा प्रकार घडला असावा असे सांगितले.

### '...नाहीतर तुम्ही नरकात जगाल'

यांनी आपला अल्टिमेटम पुन्हा एकदा स्पष्ट केला. त्यांनी इराणला चर्चेसाठी १० दिवसांची मुदत दिली होती, ज्याची वेळ आता संपत आली आहे.ट्रम्प यांनी आपल्या पोस्टमध्ये लिहिले होते, 'लक्षात ठेवा, मी इराणला डील करण्यासाठी किंवा होर्मुझची सामुद्रधुनी उघडण्यासाठी १० दिवसांचा वेळ दिला होता. आता वेळ संपत चालली आहे. इराणवर संकट कोसळण्यापूर्वी आता फक्त ४८ तास शिल्लक आहेत. देवाचा विजय असो! - राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड जे. ट्रम्प.'

मंगळवारी होणार मोठा हल्ला?

ट्रम्प यांनी आपल्या खास शैलीत इराणला इशारा दिला असून, इराणमधील वीज प्रकल्प (इंदै ईंत्हे) आणि पुलांवर समन्वित हल्ले करण्याचे संकेत दिले आहेत. त्यांनी म्हटले की, 'मंगळवार हा 'पॉवर प्लांट डे' आणि 'ब्रिज डे' असेल. असे काही यापूर्वी कधीही घडले नसेल!' एकीकडे ट्रम्प यांनी ४८ तासांची मुदत दिली असतानाच, इराणने मात्र मागे हटण्याचे कोणतेही संकेत दिलेले नाहीत. रविवारी इराणने कुवेत, संयुक्त अरब अमिराती (ळैं) आणि बहरीनमधील ऊर्जा प्रकल्पांवर हल्ले केल्याचे वृत्त आहे.

अमेरिकन वैमानिकाची सुटका

डोनाल?ड ट्रम?प यांच?या स्फोटक पोस्ट सोशल मीडियावर पोस?ट करण?याच?या काही तास आधी ट्रम्प यांनी एका धाडसी मोहिमेची माहिती दिली. अमेरिकन सैन्याने इराणच्या हद्दीत शिरून एका जखमी इ-१५ वैमानिकाला सुखरूप बाहेर काढल्याचा दावा त्यांनी केला आहे. ही मोहीम अत्यंत धोकादायक होती आणि अमेरिकन सैन्याने इराणच्या रडार यंत्रणेला चकवा देऊन ही कामगिरी फत्ते केल्याचे ट्रम्प यांनी सांगितले. या कारवाईत हवाई दलाचा अधिकारी गंभीर जखमी झाल्याची पुष्टीही त्यांनी केली.

### दोन अमेरिकन विमानांसह

पाडल्याचे म्हटले होते; परंतु आता आयआरजीसीने चार विमाने नष्ट केल्याचा दावा केला आहे.

विमानाचे अवशेष दाखवणारे फोटो शेअर इराण संसदेचे सभापती मोहम्मद बाकर गालिबाफ यांनी 'एक्स'वर एका अमेरिकन विमानाचे कथित अवशेष असल्याचा फोटो शेअर केला आहे. अमेरिकेच्या बचाव मोहिमेत सहभागी असलेले विमान पाडल्याचा जो दावा इराणने केला होता, त्याच्याशी संबंधित हा फोटो असल्याचे सांगितले जात आहे.

### जमिनीच्या तुकड्यासाठी बाप-

येथे विवाह आटोपून सर्वजण आनंदात वर्ध्याकडे परतले. रात्री उशिरा महिलाश्रम परिसरातील हनुमान मंदिर जवळ ते उतरले पण इथेच मृत्यू दबा धरून बसला होता.

**'वेट ॲण्ड वॉच'चा सैतानी खेळ-** प्रभाकर यांचा १७ वर्षीय पुतण्या आधीपासूनच दबा धरून उभा होता. वरात पोहोचताच त्याने क्षणाचाही विलंब न करता रितेशवर चाकूने जीवघेणा हल्ला चढविला. मुलावर वार होत असल्याचे पाहताच वडील प्रभाकर त्याला वाचवण्यासाठी धावले, पण संतापलेल्या आरोपीने त्यांच्यावरही निर्दयी वार केले. काही क्षणांतच आनंदाचा जल्लोष आक्रोशात बदलला.

रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या बाप-लेकाला पाहून परिसरात एकच आरडाओरडा माजला. जखमी अवस्थेत दोघांना रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. एकाच क्षणात घर उजडले, नात्यांचा अंत झाला.

**आरोपीकडून चाकू जप्त-** या घटनेतील अल्पवयीन आरोपीने जणू विवेक गमावून पाठीवर, डोक्यावर आणि चेहऱ्यावर वार करत निर्दयता दाखवली. घटनेची माहिती मिळताच पोलिस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल, अपर पोलिस अधीक्षक सदाशिव वाघमारे, उपविभागीय अधिकारी प्रमोद मकेश्वर यांनी घटनास्थळी धाव घेत तपास सुरू केला. आरोपीला ताब्यात घेऊन हत्येसाठी वापरलेला चाकू जप्त करण्यात आला आहे.

### अंजनगावात जादूटोण्याचा प्रयत्न

प्रकार सुरू असल्याचे लक्षात येताच तो घाबरून गेला आणि तात्काळ चौकिदाराने पोलीस ठाण्यात धाव घेतली.

चौकीदाराच्या माहितीवरून अंजनगाव सुर्जी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. मात्र पोलिस येण्यापूर्वीच तांत्रिकासह आरोपी तेथून पसार झाले होते. घटनास्थळी पोलिसांना खोदलेला खड्डा सोबत लिंबू, मिरची, हळद, कुंकू, बाहुल्या, हार-फुले तसेच खड्डा खोदण्यासाठी लागणारे टिकास, फावडे आदी जादूटोण्याचे साहित्य आढळून आले.

या घटनेचे गांभीर्य ओळखून पोलीस निरीक्षक सुरज बोंडे यांनी तात्काळ शोधमोहीम राबवली. अवघ्या २४ तासांत चिखलदरा तालुक्यातून सर्व आरोपींना ताब्यात घेण्यात आले. अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये रविंद्र मारोती जामकर (वय २९, रा. जनुना, ता. अचलपूर), सुधाकर सुरेश कोळे (वय ३८, रा. जनुना, ता. अचलपूर) तांत्रिक राजाराम गंगाराम सावळकर (वय ५२, रा. चौऱ्यामल, ता. चिखलदरा), मनोहर लक्ष्मण येवले (वय ४२, रा. जनुना) या सर्वांविरुद्ध महाराष्ट्र जादूटोणा प्रतिबंधक कायदा तसेच भारतीय न्याय संहितेतील कलम ३(२), ३(३) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अंजनगाव सुर्जी तालूक्यात या आधीही पळसखेड परिसरातील एका मंदिरात असा प्रयोग झाला होता. या घटनेला काही महिने जात नाही तर पुन्हा अंजनगाव सुर्जी शहराच्या जवळच हा प्रकार घडल्याने शहरासह तालुक्यात दहशत व भिंतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

काही मांत्रिक हे प्रत्यक्ष धन शोधन्याच्या किंवा श्रीमंत करण्याच्या विचाराने प्रत्यक्ष घटनास्थळी पुजा अर्चा - तंत्र मंत्राचे प्रयोग करतात.परंतू तालुक्यामध्ये सुरक्षित स्थळी बसून भक्तांना तंत्रा मंत्राच्या अधाराने श्रीमंत करणे,धन शोधून देने,गृह शांती करणे असे प्रकार घडत असल्याची चर्चा तालुक्यात असुन यामध्ये गाडगेबांबाच्या तालुक्यातील काही तथाकथीत महाराज,बुवा,गुरुजी,भोंदु, असल्याची चर्चा आहे. पोलीस प्रशासनाने वेळीच लक्ष दिले नाही तर तालुक्यात मोठी घटना घडण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

'सर्व आरोपींना अटक करण्यात आली असून सखोल चौकशी सुरू आहे. अशा प्रकारच्या अंधश्रद्धाजन्य कृत्यांना अजिबात सहन केले जाणार नाही,' ही घटना अंधश्रद्धेविरुद्ध जनजागृतीची गरज अधोरेखित करत असून नागरिकांनी अशा प्रकारांपासून दूर राहण्याचे आवाहन करण्यात येत आहे,अशी ठाम भूमिका पोलीस निरीक्षक सुरज बोंडे यांनी व्यक्त केली.

### समृद्धी महामार्गावरही वन्यजीवांच

वन्यजीवांना भरधाव वाहनांची झळ बसत आहे. परिणामी बिबट, हरिण, ससा यांसारख्या प्राण्यांचे अपघाती मृत्यू वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. वनविभागाच्या अधिकाऱ्यांकडून वेळोवेळी सूचना देण्यात येत असल्या, तरी प्रत्यक्षात वाहनचालकांकडून वेगमर्यादेचे पालन होत नसल्याचे दिसून येते. तसेच, काही ठिकाणी आवश्यक असलेली अंडरपास, फेन्सिंग किंवा चेतावणी फलक अपुरे असल्याचीही चर्चा आहे. समृद्धीच्या वेगात निसर्गाचा श्वास गुदमरू नये, यासाठी तातडीने ठोस उपाययोजना करण्याची गरज निर्माण झाली आहे. अन्यथा विकासाच्या या महामार्गावर निरपराध वन्यजीवांचे बळी वाढत राहण्याची भीती नाकारता येत नाही.

### सिपना नदीत दोन सख्या

पोलिसांनाही याची माहिती देण्यात आली. पोलिसांनी व स्थानिकांच्या मदतीने दोघींचे मृतदेह बाहेर काढले आणि धारणी येथील उपजिल्हा रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठवले. या प्रकरणी पोलिसांनी पंचनामा करून अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. आनंद गिरी यांच्या कुटुंबावर मोठे दुःख ओढवले असून गावात शोककळा पसरली आहे.

### अमरावती महानगरपालिकेच्या

मनोगतात अधिकारी व कर्मचारी वर्गाच्या सहकार्याबद्दल समाधान व्यक्त केले. महानगरपालिकेची प्रतिमा उंचावण्यासाठी सर्वांनी समन्वयाने कार्य करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. सुरू करण्यात आलेले विविध प्रकल्प नवीन आयुक्त वर्षा लड्डा यांच्या नेतृत्वात पूर्णत्वास जातील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यानंतर सौम्या शर्मा चांडक यांच्या निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले. त्यांच्या कार्यकाळातील योगदानाचा आढावा घेत त्यांना निरोप देण्यात आला.

उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी त्यांच्या कार्यपद्धतीचे कौतुक करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमास अकोला जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख, उपायुक्त नरेंद्र वानखडे, उपायुक्त योगेश पिठे, सहाय्यक आयुक्त श्रीकांतसिंह चौव्हान, नंदकिशोर तिखिले, भुषण पुसतकर, मनोज शहाळे, धनंजय शिंदे, मंगेश कडू, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. विशाल काळे, सिस्टीम मॅनेजर अमित डेंगरे, शिक्षणाधिकारी डॉ. प्रकाश मेश्राम, उद्यान अधीक्षक अजय विंचुरकर, भांडार अधीक्षक मंगेश जाधव, कार्यालय अधीक्षक गुलशन मिरानी, उपअभियंता विवेक देशमुख, हेमंत महाजन, शरद तिनखेडे, सहाय्यक निवडणूक अधिकारी अक्षय निलंगे, वैद्यकीय अधिकारी डॉ.संदिप पाटबागे, मा.आयुक्त यांचे स्वीय सहाय्यक चेतन मेश्राम यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

### जागेच्या वादातून चौघांकडून

यांच्या तक्रारीवरून हिंगणघाट पोलिसांनी संबंधित चौघांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे. पोलिसांनी घटनेची गंभीर दखल घेतली असून आरोपींवर कडक कारवाई होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### सिपना महाविद्यालयाच्या खो-खो

करून दिलेल्या सोयीसुविधांमुळेच आम्ही हा टप्पा गाठू शकलो. २०० हून अधिक कलर कोट खेळाडू ही आमच्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे.' अशी महाविद्यालय प्रशासनाने माहिती दिली आहे.

या सर्व यशस्वी खेळाडूंनी आपल्या यशाचे श्रेय सिपना शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष तथा माजी राज्यमंत्री जगदीश गुप्ता, माजी सचिव प्राचार्य डॉ. रवींद्र कडू, सचिव प्रशांत तायडे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेश जयपुरकर (माजी प्र-कुलगुरू संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ) तसेच शारीरिक शिक्षण संचालक डॉ. प्रशांत गावंडे यांना दिले आहे.

तसेच विदर्भ खो-खो असोसिएशनचे माजी अध्यक्ष प्रा. सुहास पांडे, माजी राष्ट्रीय तथा विद्यापीठ वरिष्ठ खेळाडू राहुल रेवस्कर, पुरुषोत्तम मडावी, गौरव ठाकूर, दीपेश चंदेल, किरण माहुरे, शुभम सपकाळ, विशाल घोरपडे आणि आपल्या पालकांच्या पाठिंब्यामुळेच हे यश संपादन करता आल्याचे खेळाडूंनी सांगितले.

या ऐतिहासिक कामगिरीबद्दल चिखलदरा परिसरातील क्रीडाप्रेमींकडून खेळाडूंचे आणि मार्गदर्शकांचे भरभरून कौतुक होत आहे.

### 'भारत-अमेरिका कृषी करार भारतीय

चंद्रकांत बानुबाकोडे, अनिल वानखडे, विनोदराव जोशी, किशोर काळे, सुधाकर वानखेडे, नई मिर्झा, नितीन गादे, अशोकराव पाटील कोकाटे, अनिकेत वाक्पांजर, सुनील घटाळे, शाहीर धम्मा खडसे, सुनील मेटकर, बाबुराव पांडे, राहुल मंगळे, उमेश बनसोड, धीरज बनकर, लताताई सोनारकर, जे. एम. कोठारी, निळकंठ ढोके, प्रा. प्रफुल कडू यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांची उपस्थिती लक्षणीय होती.

यावेळी १३ एप्रिल २०२६ रोजी अमरावती जिल्हाधिकारी कार्यालयासमोर भव्य धरणे आंदोलन करण्याची घोषणा करण्यात आली. शेतकरी, शेतमजूर व कामगारांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले. तसेच राज्यव्यापी स्वाक्षरी मोहीम राबवून शेतकऱ्यांच्या मागण्या राष्ट्रपतींपर्यंत पोहोचवण्याचा निर्णय घेण्यात आला.

आज भारतीय शेतीवर परकीय दबाव वाढत असल्याची जाणीव स्पष्ट होत आहे. या करारामुळे स्थानिक शेतकऱ्यांचे नुकसान होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. त्यामुळेच शेतकरी संघटनांनी संघर्षाचा मार्ग स्वीकारत आंदोलनाची हाक दिली आहे. हा लढा केवळ कराराविरोधात नसून, भारतीय शेतीच्या अस्तित्वासाठी आहे.

### पोकलॅंडने जंगलात रस्ता?

आणणे टाळण्याच्या सूचना नोटीसमध्ये नमूद करण्यात आल्या आहेत. दरम्यान, या घटनेमुळे तिवसा परिसरात खळबळ उडाली असून वनविभागाने अशा प्रकारांविरुद्ध कठोर पावले उचलण्याचा इशारा दिला आहे. पुढील तपास वर्तुळ अधिकारी एस. डब्ल्यू. घोडमारे यांच्या देखरेखीखाली सुरू आहे.

# अजितदादांना श्रद्धांजली म्हणून बारामतीची पोटनिवडणूक लढवणार नाही

## शरद पवारांच्या भेटीनंतर शशिकांत शिंदेंची माहिती

**बारामती-** आज शशिकांत शिंदे यांनी सिल्वर ओक या शरद पवारांच्या निवासस्थानी जाऊन त्यांची भेट घेतली. बारामती



आणि राहुरी या ठिकाणी पोटनिवडणूक पार पडणार आहे. त्याबाबत शशिकांत शिंदे यांनी शरद पवारांशी चर्चा केली. ज्यानंतर शशिकांत शिंदेंनी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्ष बारामतीची पोटनिवडणूक लढणार नाही हे पुन्हा एकदा जाहीर केले आहे. २८ जानेवारीला अजितदादांचा अपघाती मृत्यू झाला. बारामती या ठिकाणीच त्यांचं विमान कोसळलं आणि त्यांचा मृत्यू झाला. यानंतर बारामती या ठिकाणी पोटनिवडणूक पार पडणार आहे. २३ एप्रिलला ही निवडणूक होणार आहे.

# लक्ष्मण हाके बारामतीची पोटनिवडणूक लढवणार

## बिनविरोधची आशा मावळली?

**बारामती -** बारामती विधानसभा पोटनिवडणुकीत आता रंगत वाढली असून, लक्ष्मण हाके यांनी निवडणूक लढवण्याची घोषणा केल्याने राजकीय समीकरणे बदलण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. यामुळे सुनेत्रा पवार यांची बिनविरोध निवड होण्याची शक्यता आता मावळली असल्याचे दिसून येत आहे.

अजित पवार यांच्या निधनानंतर ही पोटनिवडणूक बिनविरोध होईल, अशी सुरुवातीला चर्चा होती. राष्ट्रवादी काँग्रेसकडून सुनेत्रा पवार यांना उमेदवारी देण्याचा निर्णय



झाल्यानंतर विरोधकही उमेदवार देणार नाहीत, असा अंदाज वर्तवला जात होता. मात्र, आता परिस्थितीत मोठा बदल झाला आहे.

लक्ष्मण हाके यांनी निवडणूक रिंगणात उतरण्याचा निर्णय घेतल्याने बारामतीत थेट लढत होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. हाके यांच्या उमेदवारीमुळे स्थानिक पातळीवर राजकीय वातावरण तापू लागले आहे. त्यांनी मतदारांच्या प्रश्नांवर आवाज उठवण्याचा निर्धार व्यक्त करत, ही निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतल्याचे सांगितले. दरम्यान, काँग्रेसकडूनही ही निवडणूक लढवली जाणार असल्याची माहिती समोर येत आहे. त्यामुळे बारामतीत बहुरंगी लढत होण्याची शक्यता असून, मतदारांमध्ये उत्सुकता वाढली आहे.

बारामती हा राष्ट्रवादीचा बालेकिल्ला मानला जात असला, तरी या वेळी परिस्थिती वेगळी असू शकते. स्थानिक मुद्दे, सहानुभूतीची लाट आणि विविध पक्षांची भूमिका यावर निकाल अवलंबून राहणार आहे. लक्ष्मण हाके यांच्यामुळे बारामती पोटनिवडणूक आता अधिकच चुरशीची होणार असून, सुनेत्रा पवार यांच्या बिनविरोध निवडीची शक्यता मावळली असल्याचे सांगण्यात आले.

# संक्षिप्त

## सुप्रीम कोर्टाला हवेत माकड पळवून लावणारे शंभर कर्मचारी

**मुंबई-** सुप्रीम कोर्टातील न्यायाधीश यांच्या बंगल्यात माकडाने उच्छाद मांडल्याने अनेक न्यायाधीश त्रस्त झाले आहेत. सुप्रीम कोर्टाने एक



टेंडरची नोटीस जारी केली आहे. या नोटिसीत ऑनलाइन बोलीची उल्लेख करण्यात आला आहे. यात माकडांना पळवण्यासाठी १०० प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे, असे म्हटले आहे. ऑनलाइन बोली यासाठी लावण्यात आली आहे. कारण, इच्छुक एजन्सी आपला प्रस्ताव पोर्टलवर जमा करू शकतील.नोटिसीत गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस पोर्टलद्वारे एका नोटिसीत सुप्रीम कोर्टाने म्हटले की, बाजारातून वेंडर आणि एजन्सींना ऑनलाइन बोली लावण्यासाठी आमंत्रित केले जात आहे. या एजन्सींजने माकडांना पळवून लावण्यासाठी प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावी. हे काम दोन वर्षांच्या कालावधीसाठी देण्यात येईल.

## त्रिभाषेत इंग्रजी 'परदेशी' सीबीएसई शाळांत सूत्र लागू करताना पर्यायांवरच गदा

**पुणे-** इंग्रजीचा समावेश परदेशी भाषा विभागात केल्याने केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाशी (सीबीएसई) संलग्न इंग्रजी शाळांत शिकणाऱ्यांना अन्य परकीय भाषा शिकण्याचा पर्याय बंदच होण्याची शक्यता आहे. मुळात इंग्रजी ही देशात भाषिक व्यवहारांसाठी अधिकृत भाषा असताना, तिला परदेशी भाषा विभागात टाकण्याचे प्रयोजन काय, असाही प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होत आहे.नव्या राष्ट्रीय शिक्षण धोरणावर आधारित शिक्षण आराखड्यानुसार, 'सीबीएसई'ने इयत्ता सहावीपासून तीन भाषा शिकवण्याचा निर्णय घेतला आहे. विद्यार्थ्यांना शिकवल्या जाणाऱ्या तीन भाषांपैकी दोन भाषा भारतीय असणार आहेत.'महाराष्ट्रात हे सूत्र लागू करताना मुळात विद्यार्थी इंग्रजी माध्यमाच्या शाळेत असेल, तर इंग्रजी ही माध्यम भाषा असेलच. राज्यात मराठी सक्तीची असल्याने मराठी ही दुसरी भाषा असेल. आता उरलेली तिसरी भाषा भारतीयच असावी लागणार असल्याने हिंदी, संस्कृतसह अन्य भारतीय भाषांचा त्यासाठी पर्याय असेल. अशा वेळी फ्रेंच, जर्मन, जपानी आदी परकीय भाषा शिकण्याचा पर्याय विद्यार्थ्याला उपलब्ध असणार नाही, कारण या गटातील इंग्रजी ही भाषा तो शिकतच असेल,' असे निरीक्षण शिक्षणतज्ज्ञांनी नोंदवले.

## तामिळनाडूत एआय ने बदलला प्रचाराचा चेहरा!



**तामिळनाडू-** तामिळनाडूचे राजकारण नेहमीच भावना आणि प्रभावशाली नेतृत्वाभोवती फिरत आले आहे. पण, २०२६ च्या या विधानसभा निवडणुकीने प्रचाराची सर्व जुनी समीकरणे मोडीत काढली आहेत. एम. करुणानिधी आणि जे. जयललिता यांसारख्या दिग्गज नेत्यांना पडद्यावर पुन्हा 'जिवंत' करून त्यांच्याकडून डिजिटल प्रचार करून घेतला जात आहे. चला तर मग टेक्नॉलॉजीच्या अँगलने तामिळनाडू विधानसभेच्या प्रचारात कोणते डिजिटल प्रयोग सुरू आहेत या तंत्रज्ञानामुळे एम. करुणानिधी आणि जयललिता यांचे हुबेहूब डिजिटल अवतार मतदारांशी थेट संवाद साधत आहेत. २०२६ च्या या विधानसभा निवडणुकीने प्रचारात तामिळनाडूच्या राजकारणाचे दोन दिग्गज स्तंभ म्हणजेच एम. करुणानिधी आणि जे. जयललिता यांचे डिजिटल अवतार सध्या प्रचारात मुख्य आकर्षण ठरत आहेत.

# १०० कमांडो, १२ लढाऊ विमाने अन् प्रचंड गोळीबार

**तेहरान-** अमेरिकेच्या स्पेशल ऑपरेशन फोर्सेसनं धाडसी मोहीम यशस्वी केली आहे. इराणमध्ये बेपत्ता झालेल्या हवाई दलाच्या अधिकाऱ्याची सुटका करण्याची मोहीम स्पेशल फोर्सेसने फत्ते करुन दाखवली. या साहसी मोहिमेत सहभागी झालेल्या बचाव पथकातील एक अधिकारी जखमी झाला. त्याला उपचारांसाठी कुवेतला पाठवण्यात आले आहे.शुक्रवारी इराणने अमेरिकेचे एफ-१५ ई स्ट्राईक ईगल विमान पाडले होते. या विमानात असलेल्या दोघांनी योग्य वेळी स्वत:ला इजेक्ट केले. त्यामुळे त्यांचा जीव वाचला. दोघेही इराणमध्ये सुरक्षित उतरले. यातील पायलटची सुटका अमेरिकेने आधीच केली. पण वेपन्स ऑफिसर शत्रू देशात अडकला. जवळपास एक दिवस तो शत्रू राष्ट्रात लपून राहिला. या कालावधीत इराणी सैन्य त्याचा शोध घेत होते. त्यासाठी जंग जंग पछाडण्यात आले. स्थानिकांना बक्षिसाचे आमिष दाखवण्यात आले. या भागात एफ-१५ ई विमान कोसळले, त्या परिसरात सरकारविरोधात रोष आहे. त्यामुळे वेपन अधिकाऱ्याला लपण्यात मदत झाली. त्याच्यापर्यंत पोहोचण्यासाठी अमेरिकन सैन्याने ताकद पणाला लावली. शेकडो कमांडो या मोहिमेत सहभागी झाले होते. सोबतच डझनभर लढाऊ विमाने, हेलिकॉप्टर्स, सायबर अधिकारी, गुप्तचर यंत्रणा यांचा वापर या धाडसी मोहिमेत करण्यात आला.

# युद्धाच्या पार्श्वभूमीवर उद्योगांना सवलतींचा 'बूस्टर'!

## एमआयडीसीतील भूखंड शुल्काबाबत मोठा निर्णय

**पुणे-** पश्चिम आशियातील युद्धामुळे राज्यातील उद्योग अडचणीत आले आहेत. या पार्श्वभूमीवर सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांना (एमएसएमई) पाठबळ देण्याचे पाऊल राज्य सरकारने उचलले आहे. एमएसएमई क्लस्टर म्हणजेच सामायिक सुविधा केंद्रांना भूखंड शुल्कात २० टक्क्यांची सवलत सरकारने जाहीर केली आहे. याचबरोबर त्यांना १० टक्के प्राधान्यक्रम शुल्कही आकारण्यात येणार नाही.

राज्य सरकारने एमएसएमई सामायिक सुविधा केंद्रांना भूखंड शुल्कात २० टक्के सवलत जाहीर केली आहे. यामुळे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या (एमआयडीसी) भूखंड वितरणात या केंद्रांना यापुढे २० टक्के शुल्क सवलत लागू होईल. उद्योगांना भूखंड वितरित करताना संबंधित उद्योगाच्या प्राधान्यानुसार प्राधान्यक्रम शुल्क आकारण्यात येते.

हे शुल्क १० टक्के असून, यापुढे या केंद्रांसाठी हे शुल्क आकारले जाणार नाही. हे फायदे दोनशे चौरस मीटरपर्यंतच्या भूखंडांसाठी लागू असणार आहे. या निर्णयामुळे लघुउद्योगांना एकत्र येऊन सामायिक सुविधा केंद्र स्थापन करणे सोपे होणार आहे, अशी माहिती उद्योग विभागातील सूत्रांनी दिली.

सामायिक सुविधा केंद्रांसाठी अंतर्गत डांबरी रस्ते एमआयडीसी बांधून देईल, असेही सरकारने जाहीर केले आहे. याचबरोबर अंतर्गत रस्त्यांसाठीच्या जागेसाठी कोणतेही शुल्क आकारण्यात येणार नाही. विशेष म्हणजे, नवीन औद्योगिक क्षेत्रांची रचना करताना एमएसएमईसाठी स्वतंत्र भूखंड नियोजन केले जाणार आहे. यामुळे आगामी काळात होणाऱ्या औद्योगिक क्षेत्रांमध्ये एमएसएमईला भूखंड मिळणे अधिक सोपे होणार आहे, असे उद्योग विभागातील सूत्रांनी सांगितले.

**सामायिक सुविधा केंद्रे**

एमएसएमई क्षेत्रातील उद्योगांकडून सामायिक सुविधा केंद्रे सुरू केली जातात. या केंद्राच्या माध्यमातून या उद्योगांना विविध सुविधा पुरविल्या जातात. त्यात केंद्राच्या सहभागी सदस्यांचा समावेश असतो. प्रत्येक सूक्ष्म अथवा लघुउद्योगाला आपल्या व्यवसायासाठी सर्व सुविधा उभारणे शक्य नसते. त्यामुळे काही उद्योग एकत्र येऊन या सामायिक सुविधा केंद्रांची स्थापना करतात.

**राज्यातील एमएसएमई**

**सूक्ष्म उद्योग** – ७० लाख ३१ हजार ४८१

**लघुउद्योग** – ७४ हजार ९९


**मध्यम उद्योग** – ६ हजार ८८९

# आधी पत्नी फरार, आता मुलगा 'नॉट रिचेबल'!

## भोंदूबाबा अशोक खरात प्रकरण

**नाशिक –** संपूर्ण महाराष्ट्रात काही दिवसांपासून चर्चेचा विषय झालेल्या नाशिकमधील भोंदू बाबा अशोक खरात प्रकरणात दररोज नव्या घडामोडी घडत आहेत. या प्रकरणाचा तपास करण्यासाठी राज्य शासनाने स्थापन केलेल्या विशेष पथकाकडून (एसआयटी) खराताविरुध्दच्या काळ्या कारनाम्यांविषयी पुरावे गोळा करण्यासह त्याला साथ देणाऱ्यांचीही चौकशी करण्यात येत आहे.

असे असले तरी अद्याप या चौकशीची व्याप्ती मर्यादित स्वरुपाची असल्याचा आक्षेप विरोधकांकडून घेतला जात असताना विशेष तपास पथकासाठी धक्कादायक अशी घडामोड नाशिकमध्ये घडली आहे. त्यामुळे अनेक प्रश्न उभे राहत आहेत.सिन्नर तालुक्यातील मिरगाव येथील श्री शिवनिका संस्थानचा अध्यक्ष असलेल्या अशोक खरातने अनेक महिलांचे लैंगिक शोषण करण्यासह काही शेतकरी, जमीन मालक, गुंतवणूकदारांनाही फसविले असल्याचे पुढे येत आहे. त्यामुळे हे प्रकरण वेगवेगळे वळण घेत आहे. प्रारंभी केवळ महिलांच्या



लैंगिक शोषणाचा मुद्दा असलेल्या प्रकरणात दररोज नवनवीन विषयांची भर पडत आहे. खरातबरोबरच त्याचे नातेवाईक, त्याचे कुटुंबातील सदस्यांची चौकशी करण्यात येत आहे.

शिर्डीतील जमीन फसवणूक प्रकरणात अशोक खरातची पत्नी कल्पना खरातविरुध्दही गुन्हा दाखल असल्याने तिला ताब्यात घेण्यासाठी एसआयटीचे पथक नाशिक येथील त्यांच्या घरी गेले असता ती पथकाच्या हातावर तुरी देत पसार झाली. परंतु, त्याचवेळी खरातचा मुलगा हर्षवर्धन खरात याला एसआयटीने चौकशीसाठी ताब्यात घेतले. एसआयटीकडून त्याची चौकशी करण्यात आली. परंतु, या चौकशी दरम्यान हर्षवर्धन फारच त्रोटक माहिती देत असल्याचे अधिकाऱ्यांच्या लक्षात आले. चौकशी करुन त्यास सोडून देण्यात आले.एसआयटीकडून हर्षवर्धन खरातला सोडण्यात आले असले तरी गरज भासेल त्यानुसार त्याची पुन्हा चौकशी होणे निश्चित होते. परंतु, नंतर हर्षवर्धन खरातच्या मुलाचा फोनच लागत नसल्याचे आढळून आले. हर्षवर्धन खरातचा मोबाईल बंद असल्याचे आढळून आल्यावर तपास यंत्रणांनी खरातच्या नाशिक येथील निवासस्थानी शोध घेतला असता हर्षवर्धन घरीही नसल्याचे आढळले. त्यामुळे हर्षवर्धन खरात नेमका गेला कुठे, असा प्रश्न उपस्थित होत आहे. हर्षवर्धनचा ठावठिकाणा समजत नसल्याने सर्वांनाच धक्का बसला आहे.

# राज्य सरकारने बनवलेल्या एक्स्प्रेसवेवर वेगळा टोल

## वार्षिक फास्टॅग फक्त एनएचएआयच्या मार्गावरच चालणार

**मुंबई -** केंद्र सरकारने महामार्गावरील प्रवास स्वस्त करण्यासाठी सुरू केलेल्या वार्षिक फास्टॅगच्या किमतीत १ एप्रिल २०२६ पासून वाढ करण्यात आलेली असताना हा पास केवळ भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण अर्थात एनएचएआयच्या अखत्यारीत येणाऱ्या राष्ट्रीय महामार्गांवरच वैध असल्याची माहिती समोर आली आहे. म्हणजेच राज्य सरकारद्वारे चालवल्या जाणाऱ्या हायवेवर हा वार्षिक फास्टॅग चालणार नाही. या रस्त्यांवरून जाताना वाहनचालकांना वेगळे पैसे द्यावे लागतील.

देशातील अनेक महत्त्वाच्या महामार्गांवर वार्षिक फास्टॅग पास चालणार नाही. यामध्ये उत्तर प्रदेशातील आग्रा-लखनऊ द्रुतगती मार्ग, पूर्वांचल द्रुतगती मार्ग, बुंदेलखंड द्रुतगती मार्ग, यमुना द्रुतगती मार्ग, गंगा द्रुतगती मार्ग यांचा समावेश आहे, तर महाराष्ट्र राज्यातील प्रसिद्ध मुंबई-नागपूर द्रुतगती मार्ग, मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग यांचा समावेश आहे. हरयाणातील ट्रान्स-हरयाणा द्रुतगती मार्ग, कर्नाटकातील बंगळूरू-म्हैसूर द्रुतगती मार्गांचा समावेश आहे. हे सर्व महामार्ग राज्य सरकारकडून चालवले जातात. वार्षिक फास्टॅग पाससाठी वैध असलेल्या महामार्गांमध्ये दिल्ली-कोलकाता (एनएच-१९), आग्रा-मुंबई (एनएच-३), नॉर्थ-साऊथ कॉरिडोर (एनएनच-४८), पोरबंदल-सिलचर (एनएच-२७), श्रीनगर-कन्याकुमारी (एनएच-४४), दिल्ली-मुंबई द्रुतगती मार्क, ईस्टर्न पेरिफेरल रोड, दिल्ली-मेरठ द्रुतगती मार्ग, अहमदाबाद-वडोदरा द्रुतगती मार्ग यांचा समावेश आहे.

# महिला सुरक्षेवरून राहुल गांधी यांची टीका

**नवी दिल्ली -** केंद्र सरकारकडून महिलांसाठी सुरू करण्यात आलेल्या वन स्टॉप सेंटर (ध्एण) योजनांवरील त्रुटींवर काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी गंभीर प्रश्न उपस्थित केले आहे. महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न हा केवळ योजनांचा विषय नसून सरकारची मूलभूत जबाबदारी आहे, मात्र प्रत्यक्षात महिलांना मदत मिळत नसल्याचा आरोप त्यांनी केला. राहुल गांधी यांनी आपल्या WhatsApp Channel वर याबाबत पोस्ट केली आहे.

गांधी यांनी म्हटले की, हिंसाचारातून पळून आलेल्या महिलांना वन स्टॉप सेंटरमध्ये तातडीची मदत मिळायला हवी, पण अनेक ठिकाणी त्यांना बंद दरवाजोचा दिसतात. 'महिलांना मदतीसाठी दार ठोठावे लागते, पण सरकारनेच ती दारे बंद ठेवली आहेत,' असा आरोप त्यांनी केला. केंद्रांमध्ये कर्मचाऱ्यांची कमतरता का आहे, देशभरातून



येणाऱ्या तक्रारींकडे दुर्लक्ष का केले जाते, असे प्रश्नही त्यांनी उपस्थित केले.

# महाराष्ट्रात मेघगर्जनेसह पाऊस,

## हवामान खात्याकडून'ऑरेंज अलर्ट'

**मुंबई-** महाराष्ट्रात गेल्या अनेक दिवसांपासून हवामान झपाट्याने बदलतं आहे. त्यामुळे हवामान विभागाकडून महाराष्ट्रात अनेक भागांत वादळी वाऱ्यासह पावासचा अंदाज वर्तवला आहे. यामुळे, रविवारी, ५ एप्रिलदरम्यान, अनेक भागांत विजांच्या कडकडाटासह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. वारांवर बदलत्या हवामानामुळे अधिकाऱ्यांनी नागरिकांना आवश्यक खबरदारी घेण्याचा सल्ला दिला आहे.

मुंबई, ठाणे, रायगड, सिंधुदुर्ग, रत्नागिरी आणि पालघरसह कोकणातील काही भागांत दिवसभर उष्ण आणि दमट वातावरण राहण्याची शक्यता आहे.५ एप्रिल रोजी, मुंबईत कमाल तापमान ३० ते ३४ अंश सेल्सिअस दरम्यान नोंदले जाण्याची शक्यता आहे, तर किमान तापमान २४ ते २७ अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याची शक्यता आहे. दरम्यान, मराठवाड्यातील हिंगोली, नांदेड आणि परभणीसारख्या जिल्ह्यांमध्ये मेघगर्जनेसह वादळ आणि मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. त्यामुळे पिकांचे संरक्षण करून आवश्यक उपाययोजना करण्याचा सल्ला शेतकऱ्यांना देण्यात आला आहे.

उत्तर महाराष्ट्रातील जळगाव आणि नाशिक जिल्ह्यांमध्ये अलर्ट नाही. पण चंद्रपूर, भंडारा, गोंदिया आणि नागपूर जिल्ह्यांमध्ये ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. वीजांसह पावसाची शक्यता असल्याचा हवामान विभागाचा अदांज असून वादळाच्या वेळी नागरिकांना मोकळ्या जागेवर जाणे टाळून निवारा घेण्याचे आवाहन केले आहे. दरम्यान, पश्चिम महाराष्ट्रात सध्या कोणताही अलर्ट नसला तरी बदलत्या वाऱ्यांमुळे काही ठिकाणी हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे.



# गडचिरोलीत खाणीसाठी सव्वालाख झाडांवर कुऱ्हाड?

## जिथे वनराई बांधणार तिथे आधीच झाडे अस्तित्वात

**गडचिरोली-** जिल्ह्यातील भामरागड राखीव जंगलातील ९३७ हेक्टर सलग वनक्षेत्र खाण प्रकल्पासाठी वळवण्यास केंद्र सरकारच्या वन सल्लागार समिती या वैधानिक समितीने तत्त्वत: मंजुरी दिली आहे. या निर्णयामुळे सुमारे १,२३,००० झाडे तोडली जाण्याची शक्यता असून या भागात उत्खननाचा मार्ग मोकळा झाला आहे. हा प्रकल्प Lloyds Metals And Energy Limited या कंपनीमार्फत राबवला जाणार असल्याचे कळते आहे.

भामरागड परिसरातील हे जंगल ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प आणि इंद्रावती व्याघ्र प्रकल्प यांना जोडणाऱ्या महत्त्वाच्या वन्यजीव मार्गात येते. या जंगलात गवा, अस्वल, बिबट्या, वाघ, धोले तसेच मोठी खार यांसारखे दुर्मिळ प्राणी आढळतात. या परिसरात १० किलोमीटरच्या आत ४० गावे असून सुमारे १५,००० आदिवासी नागरिक वास्तव्यास आहेत. गोंड आणि माडिया समाजाच्या या नागरिकांना वन हक्क कायदा २००६ अंतर्गत हक्क प्राप्त आहेत.या जंगलतोडीच्या बदल्यात भरपाई



म्हणून वनरोपण करण्याची अट ठेवण्यात आली आहे. मात्र हे वनारोपण गडचिरोलीत न करता सुमारे १००० किलोमीटर दूर रत्नागिरी जिल्ह्यात करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. एकूण १०१२.९५ हेक्टर क्षेत्र २३ वेगवेगळ्या तुकड्यांमध्ये विभागून हे वनरोपण करण्यात येणार आहे. या तुकड्यांचा विस्तार ९ गावांमध्ये आहे.विशेष म्हणजे, या भरपाईसाठी निवडलेल्या जमिनीपैकी मोठा भाग आधीच वनक्षेत्र असल्याचे सरकारी आकडेवारीतून स्पष्ट झाले आहे. सुमारे १५० हेक्टर क्षेत्र अतिदाट जंगल, ५८३ हेक्टर मध्यम दाट जंगल आणि १४४ हेक्टर खुल्या जंगलाच्या स्वरूपात आहे. त्यामुळे प्रत्यक्षात नवीन वननिर्मिती कितपत होणार, याबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत.

गडचिरोलीतील जंगल हे कोरड्या पानगळीच्या प्रकारातील असून तेथे सरासरी १००० मिमी पाऊस पडतो. याउलट रत्नागिरीतील सह्याद्री पर्वतरांगांमध्ये जंगल असून तेथील पर्यावरण पूर्णपणे वेगळे आहे. ही भरपाई जमीन सह्याद्री व्याघ्र प्रकल्प परिसरालगत असून पश्चिम घाट पर्वतरांग या जागतिक वारसा क्षेत्राच्या परिसरात येते. त्यामुळे पर्यावरणीय संतुलनाच्या दृष्टीनेही या निर्णयावर आक्षेप घेतले जात आहेत.या प्रकरणी पर्यावरण तज्ज्ञ शरदचंद्र लेले यांनी तीव्र टीका केली आहे. एकसंध ९३७ हेक्टर जंगल नष्ट करून वेगवेगळ्या तुकड्यांमध्ये विभागलेल्या आणि आधीच वनक्षेत्र असलेल्या जमिनीवर भरपाई देणे योग्य ठरत नसल्याचे त्यांनी म्हटले आहे. तसेच अशा प्रकल्पांसाठी स्थानिक ग्रामसभेची संमती आवश्यक असल्याचाही त्यांनी मुद्दा उपस्थित केला आहे.

सदर प्रकल्पाला १२ मे २०२५ रोजी तत्त्वत: मंजुरी देण्यात आली होती. त्यानंतर २३ मार्च २०२६ रोजी भरपाई वनरोपणाच्या जागेत बदल करण्यास मंजुरी देण्यात आली. वन्यजीव संवर्धनासाठी सुमारे १२०४.२० लाख रुपयांचा आराखडा तयार करण्यात आला असून त्यातील ६१० लाख रुपये कंपनीकडून तर उर्वरित रक्कम राज्य वन विभागाकडून खर्च केली जाणार आहे.दरम्यान, कंपनीने सर्व आवश्यक वैधानिक परवानग्या मिळाल्याचा दावा करत मंजूर आराखड्यानुसार वनरोपण केले जाईल आणि त्याची दीर्घकालीन देखभाल केली जाईल, असे स्पष्ट केले आहे. मात्र या निर्णयामुळे पर्यावरण, वन्यजीव संवर्धन आणि आदिवासी हक्क याबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले असून पुढील काळात या मुद्द्यावर वाद वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ सोमवार, ६ एप्रिल २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# अवकाळी पाऊस व गारपीटीमुळे कांदा बिजवाई पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान

## किन्हीराजा परिसरातील सुमारे १००० एकर क्षेत्र बाधित; पंचनामे करून तातडीने मदत देण्याची शेतक-यांची मागणी

■ प्रतिनिधी | किन्हीराजा ■

मालेगांव तालुक्यातील किन्हीराजा गावासह परिसरातील मैराळडोह, एरंडा, सोनाला, रामरावाडी आणि पिंपळशेंडा या गावांमध्ये मोठ्या प्रमाणावर घेतल्या जाणाऱ्या कांदा बिजवाई पिकाला नुकत्याच झालेल्या सततच्या अवकाळी पावसामुळे आणि गारपीटीमुळे मोठ्या प्रमाणात फटका बसला आहे.

सतत तीन दिवस झालेल्या अवकाळी पावसामुळे आणि एका दिवशी झालेल्या गारपीटीमुळे या पिकाचे मोठे नुकसान झाले असून शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. परिसरात सुमारे १००० एकर क्षेत्रावर कांदा बिजवाई उत्पादन घेतले जात आहे. हे पीक अत्यंत खर्चिक असून त्यामध्ये शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात भांडवली गुंतवणूक केली आहे. परंतु नैसर्गिक आपत्तीमुळे या पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने शेतकऱ्यांच्या अपेक्षांना मोठा धक्का बसला आहे.

अवकाळी पावसाचे जोराचे थेंब आणि काही काळ पडलेल्या गारांमुळे कालावधी पूर्ण झालेल्या कांदा फुलातील बी खाली पडले असून मोठ्या प्रमाणात बी जमिनीत



मिसळून गेले आहे. तसेच पिकाच्या परिपक्वतेची प्रक्रिया सुरू असलेल्या कांद्याचेही नुकसान झाले असून अनेक ठिकाणी कांदा मोडून खाली पडल्यामुळे बी परिपक्व होण्याची प्रक्रिया पूर्ण होणार नाही, अशी स्थिती निर्माण झाली आहे. यामुळे अपेक्षित उत्पादन मिळणे कठीण झाले असून शेतकऱ्यांना मोठ्या आर्थिक नुकसानीचा सामना करावा लागत आहे.

कांदा बिजवाई हे पीक अत्यंत खर्चिक असून त्यासाठी बियाणे, मजुरी, औषधे आणि पाणी व्यवस्थापन यासाठी मोठा खर्च करावा लागतो. परंतु या पिकासाठी पीक संरक्षण विमा योजना लागू नसल्यामुळे शेतकऱ्यांना विम्याचा कोणताही लाभ मिळणार नाही, ही बाब अधिक चिंताजनक ठरत आहे. त्यामुळे शेतकरी सध्या पूर्णपणे शासनाच्या मदतीवर अवलंबून आहेत.

सदर नुकसानीमुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडले असून त्यांनी शासनाकडे तातडीने खालील मागण्या केल्या आहेत. नुकसानीचे तातडीने पंचनामे करावेत, प्रभावित क्षेत्राचे योग्य सर्वेक्षण करावे, शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत द्यावी, कांदा बिजवाई पिकाला भविष्यात पीक विमा संरक्षण उपलब्ध करून द्यावे.

'कांदा बिजवाई हे पीक अतिशय खर्चिक आहे. या पिकासाठी आम्ही मोठ्या प्रमाणात गुंतवणूक केली आहे. परंतु सतत तीन दिवस झालेल्या पावसामुळे आणि गारपीटीमुळे पिकाचे मोठे नुकसान झाले आहे. फुलातील बी खाली पडल्यामुळे आणि कांदा मोडल्यामुळे उत्पादन मिळण्याची शक्यता कमी झाली आहे. या पिकाला विमा नसल्यामुळे आम्हाला कोणतीही भरपाई मिळणार नाही. त्यामुळे शासनाने तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्यावी.'

**गणेशराव घुगे,** शेतकरी किन्हीराजा

### परिसरातील शेती अर्थव्यवस्थेवर परिणाम होण्याची शक्यता

किन्हीराजा आणि परिसरातील गावांमध्ये कांदा बिजवाई हे उत्पन्न देणारे महत्वाचे पीक आहे. या पिकाच्या नुकसानीमुळे स्थानिक शेती अर्थव्यवस्थेवर मोठा परिणाम होण्याची शक्यता असून अनेक शेतकरी आर्थिक अडचणीत येण्याची भीती व्यक्त केली जात आहे.शेतकरी आणि ग्रामस्थांनी शासनाकडे या परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन तातडीने मदत देण्याची मागणी केली आहे.

# निसर्गाच्या भरोशावर आधुनिक शेतीचा प्रयोग

## सोमठाण्यातील शेतकरी नारायण शिंदे यांचा कोथिंबीर पिकातून उत्पन्नाचा प्रयत्न

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

तालुक्यातील सोमठाणा येथील आदर्श शेतकरी व सामाजिक कार्यकर्ते नारायण शिंदे यांनी आधुनिक शेतीचा अवलंब करत कमी कालावधीत येणाऱ्या भाजीपाला पिकांवर भर देत उत्पन्न वाढीचा यशस्वी प्रयोग हाती घेतला आहे. शेतीविषयक सखोल ज्ञान आणि मेहनतीच्या जोरावर त्यांनी यावर्षी वीस गुंठे क्षेत्रात कोथिंबीर पिकाची लागवड केली असून या पिकातून चांगल्या उत्पन्नाची अपेक्षा व्यक्त केली आहे. नारायण शिंदे हे केवळ शेतकरी नसून सामाजिक कार्यातही सक्रिय असून गावातील विविध कार्यक्रमांमध्ये पुढाकार घेतात. त्यांचे स्वतःचे कृषी सेवा केंद्र असून त्यामार्फत ते शेतकऱ्यांना शेतीविषयक मार्गदर्शन करतात. आपल्या शेतात त्यांनी बाराही महिने विविध पिकांचे नियोजन करून शेतीतून सातत्याने उत्पन्न मिळविण्याचा प्रयत्न सुरू ठेवला आहे.

यावर्षी त्यांनी कोथिंबीर पिकासाठी सुमारे १५ किलो बियाण्यांचा वापर केला असून या पिकातून अंदाजे १५ ते २० क्विंटल उत्पादन मिळण्याची शक्यता आहे. सध्याच्या बाजारभावानुसार या उत्पादनातून एक ते दीड लाख रुपयांपर्यंत उत्पन्न मिळण्याची अपेक्षा त्यांनी व्यक्त केली आहे. यासोबतच त्यांनी मेथी व इतर भाजीपाला पिकांचाही समावेश करून शेतीत विविधता आणली आहे. मात्र, शेती पूर्णतः निसर्गावर अवलंबून असल्याने हवामानातील बदलांचा थेट परिणाम उत्पादनावर होतो. मागील काही दिवसांतील वातावरणातील बदलामुळे शेतकऱ्यांमध्ये अनिश्चिततेचे वातावरण निर्माण झाले आहे.



उत्पादनात घट किंवा वाढ होणे हे निसर्गाच्या लहरीपणावर अवलंबून असल्याचे शिंदे यांनी नमूद केले. निसर्गाची साथ मिळाली तर शेतकरी राजा आहे आणि तो राजाच राहील,असा आशावाद व्यक्त करत नारायण शिंदे यांनी शेतकऱ्यांनी आधुनिक तंत्रज्ञानासोबत नवनवीन पिकांचे प्रयोग करणे गरजेचे असल्याचे सांगितले. शेतीतून बाराही महिने उत्पन्न मिळवण्यासाठी नियोजनबद्ध शेती आणि मेहनत यालाच पर्याय नसल्याचे त्यांनी अधोरेखित केले. सोमठाणा येथील आदर्श कुटुंबातील नारायण शिंदे यांनी समाजकार्याबरोबरच शेतीतही आदर्श निर्माण केला असून त्यांच्या या प्रयोगशील वृत्तीमुळे इतर शेतकऱ्यांनाही प्रेरणा मिळत आहे.

# केशव जोगदंड यांचा निरोप सोहळा



**मालेगाव :** सार्वजनिक बांधकाम उपविभाग मालेगाव येथील उपविभागीय अभियंता केशव श्रीधर जोगदंड यांनी तब्बल ३८ वर्षे प्रामाणिकपणे सेवा बजावल्यानंतर दि. ३१ मार्च २०२६ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्ती स्वीकारली. त्यांच्या उल्लेखनीय सेवेला मानाचा मुजरा देण्यासाठी दि. १ एप्रिल रोजी विश्रामभवन वाशिम येथे भव्य गुणगौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता शुभम जोशी यांनी भूषविले यावेळी कंत्राटदार संघटनेचे अध्यक्ष विरेंद्र देशमुख गणेश रिठोड संचित शिंदे उपविभागीय अभियंता वाशिम मंगरूळपीर येथील उपविभागीय अभियंता तसेच विभागातील सर्व शाखा अभियंते व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शेतकऱ्याचा पोरगा झाला पोलीस; मेहनतीच्या जोरावर केले यश संपादन

■ प्रतिनिधी | मंगरुळपीर ■

वाशिम जिल्ह्याच्या वेशीवर असलेल्या मंगरूळपीर तालुक्यातील भुर या छोट्याशा गावातील तरुणांने महाराष्ट्र पोलीस मध्ये नांदेड जिल्ह्यात पोलीस कॉन्स्टेबल म्हणून यश संपादन केले आहे. शेतकरी कुटुंबातील असलेल्या विकास लक्ष्मण पुरी या तरुणाने अभ्यासाच्या व मेहनत करून हे यश संपादन केलेले आहेत.घरची परिस्थिती हालाखीची असल्यामुळे विकास या तरुणांनी घरची शेती पाहत गावातील शेतकऱ्यांचे शेती काम केलेत . याच्यातून मिळालेल्या पैशावर घरचा गाडा चालवला व आपल्या शिक्षणाला जिवंत ठेवायचे म्हणून



कोरोना काळात बी कॉम पूर्ण केले. काही दिवसानंतर आपले शिक्षण पूर्ण व्हावे तसेच आपल्याला सरकारी नोकरी लागावी यासाठी विकास धावपळ करत होता यातच याचे मोठे भाऊ आकाश यांनी पुण्यातील नोकरी सोडून घरची शेती व लहान भावाच्या शिक्षणाची जबाबदारी आपल्या खांद्यावर घेऊन लहान भावाच्या सरकारी नोकरीचे स्वप्न पूर्ण करण्याकरिता जीवाचे रान करून भावाला पुढील शिक्षणासाठी लातूर येथे पाठवण्यात आले. या गरिबीची जाण व शेतात उत्पन्न होत नसलेल्या शेतकऱ्याची व्यथा डोळ्यासमोर दिसत असताना विकास खूप मेहनत व शिक्षण घेत पहिल्या प्रयत्नातच पोलीस कॉन्स्टेबल ची नोकरी चे यश संपादन केले. यातच कर्मवीर स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र लातूर यांचे संचालक गुरुवर्य रमेश भारती यांच्या मार्गदर्शन व नियोजनामुळे आज रोजी वाशिम जिल्ह्याच्या वेशीवर असलेल्या भुर या छोट्याशा गावातील तरुण पोलीस दलात दाखल झाला याचा आनंद ग्रामस्थांना एवढा झाला की गावातून याची वाजत गाजत व गुलाल उधळत मिरवणूक काढण्यात आली. गावातील सर्व तरुण व ज्येष्ठ नागरिक तसेच महिला व तरुणी यांनी या मिरवणुकीत मोठ्या उत्साहाने सहभाग घेऊन या तरुणाचे स्वागत केले. गरीब घरातील तरुण पोलीस दलात दाखल झाला.

# आत्मबोधाने मनाचा गुंता सुटतो

## ह.भ.प. सुशीलबुवा देशपांडे यांचे प्रतिपादन

■ प्रतिनिधी | कारंजा ■

माणसाच्या मनात दररोज असंख्य विचार येत असतात. त्यात सकारात्मक आणि नकारात्मक अशा दोन्ही प्रकारच्या विचारांचा समावेश असतो. हे विचार एकमेकांत गुंतून मनाचा मोठा गुंता तयार होतो आणि हा गुंता केवळ गुरूच्या ज्ञानानेच सुटू शकतो. गुरूची कृपा आणि अनुज्ञा लाभली की माणसाला आत्मबोध होतो आणि त्यानंतर मनातील सर्व गुंता दूर होतो, असे प्रतिपादन ह.भ.प. डॉ. सुशीलबुवा देशपांडे यांनी केले.

येथील गुरुमंदिर संस्थेच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित



कीर्तनात ते बोलत होते. यावेळी त्यांनी संत ज्ञानेश्वर महाराजांच्या 'इवलेसे रोप लाविले द्वारी' या अभंगाचे अत्यंत रसाळ आणि गूढार्थपूर्ण निरूपण केले. अभंगावर भाष्य करताना त्यांनी सांगितले की, संतांचे कार्य हे भगवंतापेक्षाही मोठे मानले जाते. संत ज्ञानेश्वर हे संतांमधीलही श्रेष्ठ संत होते.

# पंचाळा येथे अखंड हरिनाम सप्ताह व श्रीमद् भागवत महापुराण कथा

■ प्रतिनिधी | वाशिम ■


पंचाळा संस्थान तालुका जिल्हा. वाशिम येथे दि.३ एप्रिल पासून दि.१० एप्रिल पर्यंत अखंड हरिनाम सप्ताह श्रीमद् भागवत कथा व महापुराण कथा वाचनास सुरुवात झाली आहे,या निमित्त विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून महापुराण कथाची सांगता १० एप्रिल रोजी होणार असून या निमित्त भव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे,

तरी या महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन आयोजकाच्या वतीने करण्यात आले आहे. सालाबादप्रमाणे यावर्षीही पंचाळा येथे अखंड हरिनाम सप्ताह श्रीमद भागवत महापुराण कथेचे आयोजन करण्यात आले आहे, आळंदी



येथील सुप्रसिद्ध भागवतकार ह.भ.प ज्ञानेश्वर महाराज टेकाळे ( शास्त्री )यांच्या रसाळ वाणीतून कथा वाचन केल्या जात असून आयोजित भागवत कथेस परिसरातील गावातील भाविक भक्त कथा श्रवणासाठी या ठिकाणी मोठया प्रमाणात गर्दी करीत आहे, या सप्ताह मध्ये नामवंत कीर्तनरुपी सेवेचे आयोजन केले आहे, ३ एप्रिल रोजी धोंडबारावजी गहुले( हिंगोली )तर ४ एप्रिल रोजी ह. भ. प. हनुमान महाराज पढेल ( नागठाणा ), ५ एप्रिल ह. भ. प. समाधान महाराज सोळंके ( चांडस )तर ६ एप्रिल रोजी ह. भ. प. योगेश महाराज उंडाळ ( बोराळा ) ७ एप्रिल रोजी ह. भ. प. संतोष महाराज वाबळे (नांदुरा देवी ) तर ८ एप्रिल रोजी. ह. भ. प.रामकिसन महाराज कराळे ( दिग्रस ) तर ९ एप्रिल रोजी. ह. भ. प.ओम महाराज वानखेडे ( सवना ) आणि १० एप्रिल २०२६ रोजी ह. भ. प. ज्ञानेश्वर महाराज टेकाळे यांचे काल्याचे कीर्तन होणार आहे, व त्यानंतर दुपारी १२ वाजता महाप्रसाद वाटप केल्या जाणार आहे, तरी पंचक्रोशीतील भक्तांनी हरी कीर्तनाचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन पंचाळा ग्रामवासीय यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# महेंद्र ताजणे यांना 'सावित्रीबाई फुले' राज्यस्तरीय काव्यपुरस्कार



■ प्रतिनिधी | वाशिम ■

विनोदिनी आत्माराम जाधव फाऊंडेशन, वेंगुर्लेच्या वतीने दिला जाणारा सन २०२४-२५ चा प्रतिष्ठित 'क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले राज्यस्तरीय काव्यपुरस्कार' वाशिम येथील सुप्रसिद्ध कवी महेंद्र ताजणे यांना जाहीर झाला आहे.

त्यांच्या 'खूप काही आणखी' या गाजलेल्या काव्यसंग्रहासाठी हा बहुमान देण्यात येणार असल्याची घोषणा फाऊंडेशनचे अध्यक्ष सुनील जाधव आणि संस्थापक इंजि. अनिल जाधव यांनी केली आहे. महेंद्र ताजणे हे गेल्या २० वर्षांपासून आंबेडकरवादी चळवळीत सक्रिय असून, वाशिम येथील ३३ व्या अस्मितादर्श साहित्य संमेलनाचे ते मुख्य आयोजक होते. त्यांचे 'अस्वस्थ वर्तमानाच्या कविता', 'ग्लोबल महासत्तेचा इस्कोट', 'महाबोधीवृक्ष युगानुयुगाचा' हे काव्यसंग्रह प्रसिद्ध आहेत. त्यांचा 'खूप काही आणखी' हा संग्रह मानवी जाणिवांच्या कक्षा रुंदावणारा आणि धम्म संस्कृतीची मूल्ये संवर्धित करणारा आहे. या पुरस्काराचे वितरण ३ मे रोजी वेंगुर्ला येथे मान्यवरांच्या उपस्थितीत दिमाखात पार पडणार आहे.

# मालेगाव येथे मनसेची तालुकास्तरीय बैठक

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची तालुकास्तरीय बैठक आज मालेगाव येथील विश्रामगृहात उत्साहात पार पडली. या बैठकीचे आयोजन मनसेचे जिल्हाध्यक्ष राजू पाटील किडसे यांच्या अध्यक्षतेखाली तसेच तालुकाध्यक्ष ज्ञानेश्वर गवळी आणि जिल्हा उपाध्यक्ष आतिश भाऊ डहाळे यांच्या नेतृत्वात करण्यात आले.

बैठकीत पक्ष संघटन वाढ, आगामी काळातील पक्षबांधणी, तसेच तालुक्यात मनसेची ताकद अधिक मजबूत करण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी जिल्हाध्यक्ष राजू पाटील किडसे यांनी 'गाव तिथे शाखा' हा उपक्रम प्रभावीपणे राबविण्याचे आवाहन पदाधिकारी व कार्यकर्त्यांना केले. प्रत्येक गावात मनसेची शाखा स्थापन करून पक्षाची भूमिका



तळागाळापर्यंत पोहोचविण्यासाठी सर्वांनी एकजुटीने काम करावे, असे त्यांनी सांगितले.

याच बैठकीत मनसेच्या कृषी सेनेच्या तालुका अध्यक्षपदी रवी भाऊ पवार यांची नियुक्ती करण्यात आली. त्यांच्या निवडीबद्दल उपस्थितांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या. बैठकीस जिल्हा उपाध्यक्ष आतिश भाऊ डहाळे, तालुकाध्यक्ष ज्ञानेश्वर गवळी, उपतालुका अध्यक्ष रामेश्वर वाघ, तालुका अध्यक्ष राजूभाऊ हिंगणे, उपतालुका अध्यक्ष बाविस्कर, मालेगाव शहराध्यक्ष सुभाष गावणे, विद्यार्थी सेनेचे उपजिल्हाध्यक्ष अनिकेत शेटे, वाहतूक सेनेचे उपजिल्हा संघटक विनोद वानखेडे यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. तसेच आकाश पवार, प्रभाकर भालेराव, गौरव पवार, अजय गिरे, मंगेश चव्हाण, विठ्ठल देशमुख, कुणाल गवळी, अनिल डाखोरे, संकेत बाजार, शंतनू पळसकर, श्रीधर काका शेळके यांच्यासह विविध गावांतील कार्यकर्त्यांनी बैठकीस उपस्थित राहून पक्षवाढीसाठी सक्रिय सहभाग नोंदविला.

# स्व. शांतताई शिंदे यांच्या जयंती निमित्त वाशिम येथे भव्य रक्तदान शिबिर संपन्न



■ प्रतिनिधी | वाशिम ■

महिला समुपदेशन केंद्र शहर पोलीस स्टेशन वाशिम व गौरीशंकर विद्यालय नालंदा नगर वाशिम यांच्या संयुक्त विद्यमानाने १ एप्रिल रोजी शांती निकेतन महिला विकास समिती द्वारा संचालित महिला समुपदेशन केंद्र शहर पोलीस स्टेशन वाशिम यांच्या संयुक्त विद्यमानाने गौरीशंकर विद्यालय नालंदा नगर वाशिम येथे स्वर्गीय शांताताई शिंदे यांच्या जयंती निमित्ताने समाजोपयोगी उपक्रम म्हणून रक्तदान शिबिराचे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.


एखाद्या महान व्यक्तीची आठवण जपण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे समाजासाठी काहीतरी चांगले कार्य करणे. या भावनेतून हे रक्तदान शिबिराचे आयोजित करण्यात आले होते. या शिबिराचा मुख्य उद्देश गरजू लोकांना वेळेवर रक्त उपलब्ध करून देणे आणि समाजामध्ये रक्तदानाबद्दल जागरूकता निर्माण करणे हा होता. कार्यक्रमाची सुरुवात स्वर्गीय शांतताई शिंदे यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले.यामध्ये कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. संजय शिंदे -सचिव (शिंदे गुरुजी विद्या प्रसारक मंडळ वारला )हे उपस्थित होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून श्री.दिलीप गवई सर, डॉ. पल्लवी कड मॅडम ( स्त्रीरोग तज्ञ), डॉ. वृषाली देशमुख मॅडम उपस्थित होते.डॉ. पल्लवी कड मॅडम यांनी त्यांच्या भाषणातून रक्तदानाचे फायदे व मानवी जीवनात रक्तदानाचे असलेले महत्त्व सांगितले तर डॉ. देशमुख यांनी रक्तदान केल्याने गरजू व्यक्तीचा जीव कसा वाचविला जाऊ शकतो हे स्पष्ट केले.

# ८ एप्रिल पर्यंत अधिकारी आणि कर्मचा-यांसाठी 'महा-साधना सप्ताह'

■ प्रतिनिधी | वाशिम ■

भारत सरकार, क्षमता विकास आयोग आणि कर्मयोगी भारत यांच्या संयुक्त विद्यमाने ८ एप्रिल पर्यंत साधना सप्ताह आयोजित करण्यात आला आहे. सर्व शासकीय विभागात काम करणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना कार्यक्षम बनविणे, भविष्यातील आव्हानांसाठी तयार करणे आणि तंत्रज्ञानाची सवय दैनंदिन कामकाजात करुन सक्षम करणे हा या सप्ताहाचा मुख्य उद्देश आहे.

महा-साधना सप्ताहात टेक लर्निंग वीक अंतर्गत अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना किमान ४ तासांचे अभ्यासक्रम iGOT कर्मयोगी भारत पोर्टलवर लॉग इन करुन पूर्ण करावयाचे आहे. यामुळे अधिकारी आणि कर्मचारी




iGOT कर्मयोगी भारत पोर्टलवर वेगवेगळे अभ्यासक्रम उपलब्ध असून ते अभ्यासक्रम शिकतील. यामध्ये विविध शासकीय कार्यालयात काम करणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी महासाधना सप्ताहात सहभाग नोंदविणे गरजेचे राहील.या सप्ताहाच्या अनुषंगाने विविध शासकीय कार्यालये, यामध्ये कार्यरत अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी ग्उध्ऊ कर्मयोगी भारत पोर्टलवर लॉग इन करुन त्यांना नेमून दिलेले अभ्यासक्रम या काळात पूर्ण करणे गरजेचे राहील. पूर्ण केलेल्या अभ्यासक्रमाचा एकूण कालावधी किमान ४ तास असणे अनिवार्य आहे. विशेष म्हणजे साधना सप्ताह कार्यक्रमात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या (iGOT) पोर्टलवरील आकडेवारीच्या आधारे विभागांना महाराष्ट्रात मे महिन्यात होणाऱ्या 'ऊंण्प-वारी २.०' मध्ये प्रशस्तीपत्रक देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

साधना सप्ताह हा ग्उध्ऊ कर्मयोगी भारत अंतर्गत राबविला जाणारा एक विशेष प्रशिक्षण कार्यक्रम आहे. यामध्ये शासनाच्या विविध विभागांतील काम करणारे अधिकारी आणि कर्मचारी आपल्या स्वत:च्या कामाशी संबंधित नवीन कौशल्ये, तंत्रज्ञान आणि कार्यालयीन कामकाज सुकर होण्याच्या पध्दती शिकतात. शासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता वाढविणे, डिजिटल गव्हर्नन्स आणि नवतंत्रज्ञानाचा वापर वाढविणे, सतत शिक्षण घेत राहणे, वेळ व्यवस्थापन ही सप्ताह आयोजित करण्यामागची मुख्य उद्दिष्टे असल्याने या सप्ताहात प्रत्येकाने स्वयंस्फूर्तीने सहभागी व्हावे.तसेच अद्यापही अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सहभाग नोंदविला नसल्यास या साधना सप्ताहात सहभागी व्हावे असे आवाहन करण्यात आले आहे.

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक १२९ ■ सोमवार, ६ एप्रिल २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


## वर्ध्यात बाप-लेकाची निर्घृण हत्या : जमिनीच्या तुकड्यासाठी नात्यांचा बळी

### थरकाप उडवणारी घटना

**वर्धा जनमाध्यम :** ढोल-ताशांच्या गजरात निघालेली वरातष्ठ हास्य, जल्लोष आणि मंगल वातावरणष्ठ पण काही क्षणांतच त्या आनंदावर मृत्यूची सावली कोसळली,

वर्धा शहरातील महिलाश्रम परिसरात जमिनीच्या वादातून घडलेल्या दुहेरी हत्येने संपूर्ण जिल्हा सुन्न झाला आहे. एका अल्पवयीन पुतण्याने संतापाच्या भरात स्वतःच्या काका आणि चुलत भावालाच चाकूने ठार मारत नात्यांचा चिरफाड केला.

या हृदयद्रावक घटनेत रितेश प्रभाकर भलमे (२५) आणि प्रभाकर फुलचंद भलमे (५४, रा. बरबडी) यांचा जागीच मृत्यू झाला. एका घरातील दोन आधारस्तंभ गमावल्याने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

म्हसाळा येथील गजानन वाल्के यांच्या कुटुंबातील लग्न समारंभासाठी प्रभाकर भलमे आपल्या मुलगा रितेशसह गेले होते. वायगाव येथे विवाह आटोपून सर्वजण आनंदात वर्ध्याकडे परतले. रात्री उशिरा महिलाश्रम परिसरातील हनुमान मंदिर जवळ ते उतरलेष्ठ पण इथेच मृत्यू दबा धरून बसला होता



**'वेट अॅण्ड वॉच'चा सैतानी खेळ**

प्रभाकर यांचा १७ वर्षीय पुतण्या आधीपासूनच दबा धरून उभा होता. वरात पोहोचताच त्याने क्षणाचाही विलंब न करता रितेशवर चाकूने जीवघेणा हल्ला चढविला. मुलावर वार होत असल्याचे पाहताच वडील प्रभाकर त्याला वाचवण्यासाठी धावले, पण संतापलेल्या आरोपीने त्यांच्यावरही निर्दयी वार केले. काही क्षणांतच आनंदाचा जल्लोष आक्रोशात बदलला,

रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या बाप-लेकाला पाहून परिसरात एकच आरडाओरडा माजला. जखमी अवस्थेत दोघांना रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. एकाच क्षणात घर उजडलेष्ठ नात्यांचा अंत झाला,

**सैतान संचारला : आरोपीकडून चाकू जप्त**

या घटनेतील अल्पवयीन आरोपीने जणू विवेक गमावून पाठीवर, डोक्यावर आणि चेहऱ्यावर वार करत निर्दयता दाखवली. घटनेची माहिती मिळताच पोलिस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल, अपर पोलिस अधीक्षक सदाशिव वाघमारे, उपविभागीय अधिकारी प्रमोद मकेश्वर यांनी घटनास्थळी धाव घेत तपास सुरू केला. आरोपीला ताब्यात घेऊन हत्येसाठी वापरलेला चाकू जप्त करण्यात आला आहे.

**ऑनलाइन खरेदीतून आणले शस्त्र**

चौकशीत आरोपीने धक्कादायक खुलासा केला काही दिवसांपूर्वी त्याने मीशो वरून चाकू मागवला होता! गेल्या पाच वर्षांपासून जमिनीच्या वादावरून दोन्ही कुटुंबांत तणाव होता. तक्रारीही दाखल झाल्या होत्या, मात्र हा वाद इतक्या भीषण टोकाला जाईल, याची कुणालाच कल्पना नव्हती.

प्रभाकर भलमे हे स्टेशनरी दुकान चालवत होते, तर रितेश नुकताच नोकरीला लागला होता. आरोपी बँड पथकात काम करत असल्याची माहिती आहे.

## कमळाच्या सावलीत ठेकेदारीचा काळा खेळ; सेलूत 'लक्ष्मीचे कमळ' बनले लुटीचे साधन

### निकृष्ट कामातून जनतेच्या पैशांची उघड उधळपट्टी वरिष्ठ मात्र गप्प !

**सेलू / अभय बेदमोहता** - समाजसेवेच्या नावाखाली राजकारणात प्रवेश करून जनतेचा विश्वास जिंकण्याऐवजी, काही मंडळींनी पक्षाचे 'पांघरूण' घेत स्वतःच्या तिजोऱ्या भरण्याचा उद्योग सुरू केल्याचे धक्कादायक वास्तव सेलू परिसरात समोर येत आहे. भारतीय जनता पक्षच्या नावाचा वापर करत काही कार्यकर्ते ठेकेदारीच्या माध्यमातून कोट्यवधींची उलाढाल करत असल्याचा गंभीर आरोप नागरिकांमधून होत आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित कार्यकर्त्यांना प्रत्यक्ष कामाचा कोणताही अनुभव नसतानाही पक्षाचे वजन वापरून शासकीय निविदा आपल्या नावावर खेचून आणल्या जात आहेत. निविदा मिळाल्यानंतर प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी फिरकण्याचीही तसदी घेतली जात नाही.

उलट, ही कामे कमिशन घेऊन दुसऱ्यांकडे सोपवली जातात आणि स्वतः मात्र घरबसल्या ठेकेदारी करत आरामात 'थंडा फराळ' घेतल्याचे चित्र आहे.

**?वाघाचे कातडे पांघरलेले 'कागदी वाघ'**

?जेव्हा या निकृष्ट दर्जाच्या कामांची पोलखोल जनमाध्यम वर्तमानपत्रातून होते, तेव्हा हे तथाकथित ठेकेदार सुधारणा करण्याऐवजी उलट 'आक्रमक' होतात. बातमी देणारा पत्रकार कोण? जिल्हा प्रतिनिधी कोण? संपादक कोण? याची विचारपूस करून त्यांना नोटिसा देण्याची किंवा मॅनेज करण्याची भाषा वापरली जाते. वाघाचे कातडे पांघरून फिरणाऱ्या या ठेकेदारांनी हे विसरू नये की, एखादा पत्रकार विकला गेला तरी सत्याचा आवाज उठवणारे शेकडो पत्रकार आजही मैदानात आहेत.

?जनतेच्या कररूपातून जमा झालेला कष्टाचा पैसा निकृष्ट कामांमुळे पाण्यात जात असताना, असा प्रश्न सामान्य नागरिक विचारत आहेत. या ठेकेदारांना राजकारणी आणि अधिकाऱ्यांचा पाठिंबा असल्यानेच आपले कोणी 'बाल बांका' करू शकत नाही, अशी दर्पोक्ती ते उघडपणे करत आहेत. ?केवळ नोटिसा किंवा इशारे देऊन हे प्रकार थांबणारे नाहीत. जोपर्यंत भ्रष्ट ठेकेदारी करणाऱ्या या कार्यकर्त्यांवर कठोर कायदेशीर कारवाई होऊन गुन्हे दाखल होत नाहीत, तोपर्यंत 'जनमाध्यम' स्तब्ध बसणार नाही, शासकीय पैशांची ही लूट थांबणार नाही. पक्षाचा वापर स्वतःच्या तिजोऱ्या भरण्यासाठी करणाऱ्या अशा लोकांमुळे प्रामाणिक कार्यकर्त्यांचीही बदनामी होत आहे, अशी भावना नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

## युद्धाच्या सावटात सेवाग्रामातून मानवतेचा नवा श्वास

**सेवाग्राम जनमाध्यम :** जगभर वाढत्या युद्धजन्य वातावरणात आणि सामाजिक उन्मादाच्या छायेत मानवतेचा मार्ग हरवत असताना सेवाग्रामच्या भूमीत आशेचा किरण उजळला आहे. सर्व सेवा संघाच्या कार्यालय परिसरात ४ दिवसीय सर्वोदय शिक्षण शिबिराचा भावपूर्ण प्रारंभ झाला.




५ ते ८ एप्रिलदरम्यान होणाऱ्या या शिबिरात देशातील १३ राज्यांतून ११० हून अधिक युवक सहभागी झाले आहेत. सर्वोदय विचार, भारतीय संविधान, मानवतेचे मूल्य आणि सांस्कृतिक जाणीव यांचा संगम साधत सामाजिक कार्यकर्त्यांची नवी पिढी घडवण्याचा या शिबिराचा उद्देश आहे.

उद्घाटन प्रसंगी सर्व सेवा संघाचे अध्यक्ष चंदन पाल यांनी अत्यंत संवेदनशील शब्दांत मनोगत व्यक्त केले. आज जग युद्ध आणि द्वेषाच्या उंबरठ्यावर उभे आहे. अशा वेळी सत्याग्रह, सर्वोदय आणि स्वराज यांचे विचारच मानवतेला नवी दिशा देऊ शकतात, असे ते म्हणाले. त्यांच्या या विचारांनी उपस्थित युवकांच्या मनात प्रेरणेची ठिणगी पेटवली.

या प्रसंगी मोहम्मद शेख हुसैन, अरविंद अंजुम, भूपेश भूषण, अविनाश काकडे, विजय तांबे, प्रा. नूतन माळवी यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

शिबिर संयोजक अविनाश काकडे यांनी सांगितले की, हे शिबिर केवळ प्रशिक्षण नसून सामाजिक जाणीवेची एक चळवळ आहे. सेवाग्रामच्या या प्रेरणादायी वातावरणात युवा शक्तीला नवा विचार आणि दिशा मिळणार असल्याची भावना व्यक्त होत आहे.

## अतिक्रमणावर बुलडोझर... पण धाडसाचा फुगा एका दिवसातच फुटला

### सिंदीत कारवाई की दिखावा : नागरिकांचा संताप उसळला

**सिंदी रेल्वे जनमाध्यम :** अतिक्रमणाच्या विळख्यात अडकलेल्या सिंदी शहराला अखेर २५ वर्षांनंतर प्रशासनाची आठवण झालीष्ठ पण तीही केवळ एका दिवसापुरतीच! नगरपालिकेने मोठ्या गाजावाजात मुख्य रस्त्यांवरील अतिक्रमणावर बुलडोझर फिरवला, मात्र दुसऱ्याच दिवशी कारवाईला ब्रेक लागला आणि तब्बल १९ दिवस उलटूनही पुढे एक पाऊलही पडले नाही.

या अर्धवट कारवाईमुळे शहरात संशयाचे ढग दाटले आहेत. कोठे माशी शिंकली? असा प्रश्न नागरिक आता उघडपणे विचारत आहेत.

पहिल्याच दिवशी काही निवडक दुकानांवर कारवाई झाली, तर इतर अतिक्रमण मात्र जशास तसेच राहिले. त्यामुळे बाधित व्यावसायिकांमध्ये प्रचंड रोष निर्माण झाला आहे.





पालिकेला आमचेच पाडायचे होते का? असा प्रश्न करत ते प्रशासनाच्या धोरणावर ताशेरे ओढत आहेत.

दरम्यान, शहरातील मुख्य बाजारपेठेकडे जाणारा एकमेव रस्ता अतिक्रमणामुळे अक्षरशः गुदमरला आहे. दोन्ही बाजूंनी उभ्या दुकानांमुळे आणि ग्राहकांच्या वाहनांच्या गर्दीमुळे वाहतुकीचा खेळखंडोबा होत आहे. एखादे मोठे वाहन आले की संपूर्ण रस्ता ठप्प अशी भयावह परिस्थिती दररोज निर्माण होते.

मात्र केवळ बुलडोझर फिरवून प्रश्न सुटणार नाही, तर शहरात शिस्त लावणे आणि ती काटेकोरपणे पाळणे गरजेचे असल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत.

### महामार्गावरही अतिक्रमणाचा फास... निर्णय कधी?

शहरातून जाणाऱ्या महामार्ग क्रमांक ३५३ आयवर दररोज होणारी वाहतूक कोंडी ही देखील गंभीर समस्या बनली आहे. या संदर्भात मुख्याधिकाऱ्यांनी सांगितले की, संबंधित विभागाशी पत्रव्यवहार सुरू असून लवकरच अतिक्रमणाबाबत निर्णय होईल, अशी अपेक्षा आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या सूचनेनुसार अतिक्रमण हटविण्याची मोहीम पारदर्शक पद्धतीने राबवली जात आहे. सण-उत्सवाच्या पार्श्वभूमीवर धार्मिक कार्यक्रमांना अडथळा येऊ नये म्हणून कारवाई तात्पुरती थांबवली होती. पुढील आठवड्यात पोलीस बंदोबस्तात उर्वरित अतिक्रमण हटवले जाईल. कोणावरही अन्याय होणार नाही, असे मुख्याधिकारी पौर्णिमा गावित यांनी 'जनमाध्यम'शी बोलताना स्पष्ट केले.

## राष्ट्रवादीचा 'गेम प्लॅन' तयार; बूथ जिंकूनच सत्ता मिळवण्याचा मंत्र

### शरद पवार गटाची आक्रमक मोर्चेबांधणी; निवडणुकीपूर्वी संघटन मजबुतीचा निर्धार

**वर्धा जनमाध्यम :** आगामी निवडणुकांचा रणसंग्राम डोळ्यासमोर ठेवत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार गट)ने वर्धा विधानसभा क्षेत्रात जोरदार मोर्चेबांधणी सुरू केली आहे. पक्षाच्या पदाधिकाऱ्यांची आढावा बैठक वर्धा येथील पक्ष कार्यालयात पार पडली असून, बूथ जिंकला तरच सत्ता मिळेल हा स्पष्ट संदेश कार्यकर्त्यांना देण्यात आला.

जिल्हाध्यक्ष अतुल वांदिले यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत संघटन बळकट करण्याचा ठाम निर्धार व्यक्त करण्यात आला. यावेळी माजी जिल्हाध्यक्ष सुनिल राऊत, प्रवक्ते नितेश कराळे, प्रदेश संघटक अभिजित फाळके आणि समीर देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती.



बैठकीत वर्धा शहर व तालुक्यातील संघटनात्मक ताकदीचा बारकाईने आढावा घेण्यात आला. बूथ कमिट्यांची उभारणी, प्रत्येक घरापर्यंत पोहोच आणि तळागाळातील कार्यकर्त्यांना सक्रिय करण्यावर भर देण्यात आला. कार्यकर्ता मजबूत तर पक्ष मजबूत या भूमिकेतून आगामी निवडणुकांसाठी सज्ज होण्याचे आवाहन करण्यात आले.

पक्षाच्या वतीने जिल्हाभर संपर्क दौरे आणि आढावा बैठकींची मालिकाच राबवण्यात येणार असून, वर्ध्यातील राजकीय समीकरणे बदलण्याची तयारी सुरू असल्याचे स्पष्ट संकेत या बैठकीतून मिळाले.

या बैठकीला सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाध्यक्ष धनराज तेलंगे, अल्पसंख्यांक जिल्हाध्यक्ष नावेद शेख, ओबीसी जिल्हाध्यक्ष प्रशांत घवघवे, युवक जिल्हाध्यक्ष प्रणय कदम, युवक प्रदेश संघटक संदीप किटे यांच्यासह अंबादास वानखेडे, दशरथ ठाकरे, संदीप भांडवलकर, मिलिंद हिवलेकर, खलील खतीप, प्रवीण पेठे, विनोद पांडे, नितीन देशमुख, नगरसेविका दिपाली आडेपवार, रामभाऊ पवार व शहरातील अनेक पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी ३५ हजार कोटी रुपयांची विकास कामे होणार- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

नाशिक जनमाध्यम — प्रभू श्रीरामांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या नाशिक–त्र्यंबकेश्वर नगरीत पुढील वर्षी होणारा सिंहस्थ कुंभमेळा भव्य-दिव्य करण्यासाठी तब्बल ३५ हजार कोटी रुपयांच्या विकासकामांचा डंका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वाजवला. अखिल भारतीय संत समितीच्या बैठकीत त्यांनी हा कुंभमेळा अविस्मरणीय ठरेल अशी ग्वाही दिली.

तपोवनातील स्वामी नारायण मंदिरात झालेल्या बैठकीत संत-महंतांच्या उपस्थितीत मुख्यमंत्री बोलत होते. भाविकांना स्वच्छ, निर्मळ आणि प्रवाही गोदावरी नदीत स्नान करता यावे, यासाठी मोठ्या प्रमाणावर उपाययोजना सुरू आहेत, असे त्यांनी सांगितले. त्र्यंबकेश्वरमध्ये गोदावरीचा प्रवाह बारमाही ठेवण्यासाठी प्रयत्न, कुशावर्तासाठी जलशुद्धीकरण प्रकल्प, घाटांचे विस्तार, रस्त्यांचे रुंदीकरण, मंदिर संवर्धन, तसेच ओझर विमानतळ विस्तार अशी कामे युद्धपातळीवर सुरू असल्याचा दावा त्यांनी केला.

**प्रयागराजच्या धर्तीवर विकास-** कुंभमेळ्याचे नियोजन अधिक काटेकोर करण्यासाठी प्रयागराजच्या धर्तीवर नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा विकास प्राधिकरण स्थापन करण्यात आल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. मागील वेळेपेक्षा दहा पट अधिक भाविक येण्याचा अंदाज व्यक्त करत प्रशासन सज्ज असल्याचे सांगण्यात आले.

**साधूग्रामसाठी कायमस्वरूपी जमीन मोठा निर्णय-** साधूग्रामसाठी कायमस्वरूपी जमीन अधिग्रहणाचा निर्णय घेतल्याची घोषणा करत साधू-संतांच्या सूचनांचा आदर ठेवूनच नियोजन होईल, असा शब्द मुख्यमंत्री यांनी दिला.

**संस्कृती, अध्यात्म आणि राजकारणाचा संगम-** कुंभमेळा हा केवळ स्नानाचा नाही, तर आत्मशुद्धीचा आणि विचारांच्या आदान-प्रदानाचा सोहळा आहे, असे सांगताना त्यांनी भारतीय संस्कृतीच्या टिकून राहण्याचे श्रेय संत परंपरेला दिले. वारकरी संप्रदायाचा उल्लेख करत त्यांनी आक्रमणांतही परंपरा जिवंत ठेवणारी हीच शक्ती असल्याचे नमूद केले.

**भोंदूगिरीवर कडक कारवाईची गर्जना**

याचवेळी महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य विधेयकाचा उल्लेख करत 'समाजातील गैरप्रकारांना आळा बसेल, भोंदूगिरी करणाऱ्यांना सोडले जाणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला.

## एका हातात बिअर, दुसऱ्या हातात तलवार; हिंगणघाटात गुन्हेगारीचा उघड उन्माद

### खाकीचा धाक संपला? नांदगाव चौकात दहशत माजवणाऱ्यावर गुन्हा दाखल

**हिंगणघाट जनमाध्यम:** शहरात गुन्हेगारी प्रवृत्ती किती बेलगाम झाली आहे, याचे धक्कादायक चित्र समोर आले आहे. डाव्या हातात बिअरची बाटली आणि उजव्या हातात तलवार घेऊन एका व्यक्तीने भर चौकात दहशत माजवल्याची घटना ४ रोजी नांदगाव चौकात घडली. या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

या घटनेतील आरोपी अविनाश मनोहर नवरखेडे (रा. शास्त्री वॉर्ड, हिंगणघाट) याने खुलेआम तलवार फिरवत नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण केले. नागरिकांमध्ये प्रचंड घबराट पसरली होती. मात्र, पोलिस येत असल्याची चाहूल लागताच आरोपीने घटनास्थळावरून पळ काढला.

**खाकी'चा धाक कुठे हरवला?-** तालुक्याचे मुख्य ठिकाण असलेल्या हिंगणघाटमध्ये अशा प्रकारे गुन्हेगार उघडपणे दहशत माजवत असतील, तर कायद्याची भीती उरली आहे का, असा प्रश्न नागरिक विचारत आहेत.

शहरात आधीच अवैध दारू, गांजा आणि एमडीसारख्या अंमली पदार्थांचा सुळसुळाट असल्याचे चित्र आहे. त्यातच आता तलवारबाजी करत फिरणारे गुन्हेगार उघडपणे फिरू लागल्याने कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न अधिकच गंभीर बनला आहे. या प्रकरणी हिंगणघाट पोलिस ठाणे येथे आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, त्याचा शोध सुरू आहे.

## जागेच्या वादातून रक्तरंजित संघर्ष : चौघांकडून वृद्धावर हल्ला

**हिंगणघाट जनमाध्यम :** जागेच्या किरकोळ वादाने थेट हिंसाचाराचे रूप घेतल्याची धक्कादायक घटना हिंगणघाट तालुक्यातील छोटी वणी येथे उघडकीस आली आहे. संगनमत करून चौघांनी एका वृद्धावर बेदम मारहाण केल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, किसन महादेव कानकाटे (वय ७५, रा. छोटी वणी) हे आपल्या जागेच्या वादातून संबंधितांशी बोलणी करत असताना अचानक वाद चिघळला. या वादाचे रूपांतर थेट हल्ल्यात झाले. वासुदेव चिंदूजी चिडे, सिता वासुदेव चिडे, अरविंद वासुदेव चिडे आणि कमलाकर लक्ष्मण चिडे (सर्व रा. छोटी वणी) यांनी संगनमत करून किसन कानकाटे यांच्यावर मारहाण केल्याचा आरोप आहे. या मारहाणीत वृद्ध किसन कानकाटे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरू असल्याची माहिती आहे. घटनेमुळे गावात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. या प्रकरणी जखमी किसन कानकाटे यांच्या तक्रारीवरून हिंगणघाट पोलिसांनी संबंधित चौघांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे. पोलिसांनी घटनेची गंभीर दखल घेतली असून आरोपींवर कडक कारवाई होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## समृद्धी महामार्गावरही वन्यजीवांचे बळी; विकासाच्या वेगाला निसर्गाची किंमत

**वर्धा जनमाध्यम :** वेग, विकास आणि आधुनिकतेचे प्रतीक ठरलेला समृद्धी महामार्ग आता वन्यजीवांसाठी धोक्याचा सापळा ठरत असल्याची चिंताजनक बाब समोर येत आहे. अलीकडेच अज्ञात वाहनाच्या धडकेत बिबट्याचा मृत्यू झाल्याच्या घटनेने हा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.



नागपूर ते मुंबई जोडणारा हा महामार्ग वेगवान प्रवासासाठी ओळखला जातो; मात्र त्याच वेगाने धावणाऱ्या वाहनांमुळे जंगल परिसरातून ये-जा करणाऱ्या प्राण्यांचे जीव धोक्यात येत आहेत. उन्हाळ्यात पाणी व भक्ष्याच्या शोधात रस्ते ओलांडणाऱ्या वन्यजीवांना भरधाव वाहनांची झळ बसत आहे. परिणामी बिबट, हरिण, ससा यांसारख्या प्राण्यांचे अपघाती मृत्यू वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. वनविभागाच्या अधिकाऱ्यांकडून वेळोवेळी सूचना देण्यात येत असल्या, तरी प्रत्यक्षात वाहनचालकांकडून वेगमर्यादेचे पालन होत नसल्याचे दिसून येते. तसेच, काही ठिकाणी आवश्यक असलेली अंडरपास, फेन्सिंग किंवा चेतावणी फलक अपुरे असल्याचीही चर्चा आहे.

समृद्धीच्या वेगात निसर्गाचा श्वास गुदमरू नये, यासाठी तातडीने ठोस उपाययोजना करण्याची गरज निर्माण झाली आहे. अन्यथा विकासाच्या या महामार्गावर निरपराध वन्यजीवांचे बळी वाढत राहण्याची भीती नाकारता येत नाही.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## 'नाटो' नावापुरती?

पोहायला न येणाऱ्या एखाद्याने पाण्याच्या खोलीचा अंदाज न घेता त्यात उतरावे आणि नाकातोंडात पाणी जाऊ लागल्यास काठावर बसलेल्या मित्रांनी मदत केली नाही म्हणून त्रागा करावा, अशी स्थिती आज अमेरिकन राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची झाली आहे. इस्त्रायलच्या रेट्यावरून 'रेजिम चेंज'च्या नावाखाली अमेरिकेने इराणविरोधात युद्ध पुकारले; पण अयातुल्ला खोमेनींच्या हत्येनंतर इराणने होर्मुझची सामुद्रधुनी बंद करण्याचा निर्णय घेत अमेरिकेच्या आखातातील मित्र देशांमध्ये तुफानी हल्ले केले. तेव्हापासून युरोपियन राष्ट्रांकडून अमेरिकेने हे युद्ध आटोपते घ्यावे, असा सल्ला ट्रम्प यांना दिला जात होता. अहंकारग्रस्त ट्रम्प यांनी त्याला केराची टोपली दाखवतानाच युरोपियन देशांची हेटाळणी केली; पण इराणवर आक्रमक प्रहार करूनही होर्मुझची सामुद्रधुनी अमेरिका आणि इस्त्रायलला खुली करता आली नाही. परिणामी, जागतिक तेल व्यापाराचे चक्र कोलमडले. तेलाच्या किमती शंभर डॉलरच्या पुढे गेल्या. महागाईचा भडका उडाला. याच्या झळा खुद्द अमेरिकेला बसू लागल्या. याविरोधात अमेरिकन जनतेतून प्रचंड असंतोष व्यक्त होऊ लागला, तेव्हा ट्रम्प यांनी युरोपियन देशांना मदतीचे आवाहन केले; पण एकाही युरोपियन देशांनी सकारात्मक प्रतिसाद दिला नाही. ब्रिटनचे पंतप्रधान कीर स्टार्मर यांनी, तर 'हे युद्ध आमचे नाही' अशी थेट भूमिका घेतली. अमेरिकेसाठी हा मोठा धक्का होता. यामुळे संतप्त झालेल्या ट्रम्प यांनी 'ज्या मित्रराष्ट्रांच्या सुरक्षेसाठी अमेरिका लढते, ती राष्ट्रे संकटाच्या वेळी अमेरिकेच्या पाठीशी उभी राहणार नाहीत का,' असा सवाल उपस्थित करत 'नाटो'मधून बाहेर पडण्याचा इशारा दिला. यामुळे जागतिक राजकारणात खळबळ माजली असून, दशकांपासून चालत आलेली पाश्चात्त्य देशांची सुरक्षा व्यवस्था कोसळण्याची भीती व्यक्त होत आहे. जगातील सर्वात शक्तिशाली लष्करी संघटना म्हणून ओळखल्या जाणाऱ्या 'नाटो'च्या भवितव्याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.दुसऱ्या महायुद्धानंतर सोव्हिएत महासंघाचा वाढता प्रभाव आणि विस्तार रोखण्यासाठी पश्चिमेकडील लोकशाही राष्ट्रांनी एकत्र येऊन दि. ४ एप्रिल १९४९ रोजी 'उत्तर अटलांटिक करार संघटने'ची (नाटो) स्थापना केली होती. वॉशिंग्टन येथे झालेल्या या करारावर सुरुवातीला अमेरिका, ब्रिटन, फ्रान्स, कॅनडा आणि इटलीसह १२ देशांनी स्वाक्षऱ्या केल्या होत्या. शीतयुद्धाच्या काळात निर्माण झालेल्या छोट्या-मोठ्या संघटना पुढे अस्तंगत झाल्या; पण ७५ वर्षे उलटूनही 'नाटो' अस्तित्व टिकवून आहे. युक्रेन युद्धानंतर फिनलंड आणि स्वीडन हे दोन सदस्यही या संघटनेत समाविष्ट झाले. 'नाटो'ची स्थापना एका विशिष्ट तत्त्वावर झाली असून या तत्त्वाचा उल्लेख वॉशिंग्टन कराराच्या पाचव्या कलमामध्ये आहे. हे तत्त्व आहे सामूहिक सुरक्षिततेचे. त्यानुसार संघटनेच्या सदस्य देशांपैकी कोणत्याही देशावर हल्ला, आक्रमण किंवा लष्करी कारवाई झाल्यास तो सर्व सदस्य देशांवर हल्ला मानला जातो आणि सर्व 'नाटो' सदस्य देश सामूहिकरीत्या आक्रमणाचा प्रतिकार करतात. यासाठी प्रत्यक्ष युद्धात सामील होतात.अमेरिकेने या देशांना शस्त्रास्त्रे पुरवण्याबरोबरच त्यांच्या भूमीवर स्वतःचे सैन्य देखील तैनात केले आहे. अमेरिकेचे लष्करी तळही तेथे आहेत. अमेरिकेवर ११ सप्टेंबर २००१ रोजी भीषण दहशतवादी हल्ला झाला तेव्हा अमेरिकेने दहशतवादाविरुद्ध आंतरराष्ट्रीय युद्ध सुरू केले. त्यावेळी सामूहिक सुरक्षेच्या तत्त्वाचा प्रथम वापर झाला. त्यानुसार अफगाणिस्तानमध्ये 'नाटो'च्या फौजा घुसल्या होत्या. तथापि, या कारवाईला पूर्णतः अपयश आले. शीतयुद्धोत्तर काळात 'नाटो'चा विस्तार हा प्रामुख्याने पश्चिम युरोपकडून पूर्व युरोपकडे व्हायला सुरुवात झाली. सोव्हिएत महासंघाचे भाग असणाऱ्या देशांना 'नाटो'ने सदस्य बनवण्यास सुरुवात केली. युक्रेनचे 'नाटो' सदस्य बनण्यासाठीचे प्रयत्न रशियाला चिथावणी देणारे ठरले आणि चार वर्षांपूर्वी त्यांच्यात संघर्षाचा भडका उडाला. 'नाटो'च्या घटनेनुसार, प्रत्येक सदस्य देशाने जीडीपीच्या दोन टक्के निधी या संघटनेला देणे बंधनकारक आहे; पण कोव्हिड संकटानंतर पश्चिम युरोपियन देश ही रक्कम देण्यास चालढकल करू लागले. त्यावेळीही ट्रम्प यांनी या संघटनेतून बाहेर पडण्याचा इशारा दिला होता. आज पुन्हा 'नाटो' त्याच वळणावर येऊन ठेपली आहे.आता प्रश्न केवळ पैशांचा नसून लष्करी सहकार्याचा आहे. ट्रम्प यांच्या या भूमिकेमुळे या लष्करी आघाडीचे स्वरूप कायमचे बदलणार आहे. पश्चिमी देशांच्या लष्करी वर्चस्वाच्या इतिहासातील ही सर्वात मोठी उलथापालथ ठरू शकते. अमेरिकेने नेतृत्व सोडल्यास किंवा लष्करी सहभाग कमी केल्यास युरोपच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर येईल. रशिया-युक्रेन युद्धावरही याचे परिणाम दिसून येतील. दशकांपासून युरोपची सुरक्षा व्यवस्था अमेरिकेची लष्करी शक्ती, गुप्तचर यंत्रणा आणि औद्योगिक पुरवठा साखळीवर अवलंबून आहे. अमेरिकेने 'नाटो'मधून माघार घेतल्यास युरोपीय देशांना स्वतःच्या पायावर उभे राहण्याशिवाय पर्याय उरणार नाही. युक्रेन युद्धामुळे आधीच युरोपला संरक्षण त्रुटींची जाणीव झाली आहे.आता अमेरिकेची भूमिका मर्यादित झाल्यास युरोपला तातडीने प्रगत तंत्रज्ञान आणि विश्वासार्ह भागीदारांची गरज भासणार आहे. अभ्यासकांच्या मते, भारतासाठी ही एक मोठी संधी ठरू शकते. भारताने फ्रान्स, जर्मनी, स्पेन आणि इटली यांसारख्या देशांकडून नेहमीच प्रगत शस्त्रास्त्रांची आयात केली आहे; मात्र आता हे समीकरण बदलत आहे. गेल्या काही वर्षांत भारतीय दारूगोळा आणि स्फोटकांची युरोपातील निर्यात मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. लोकशाही व्यवस्था आणि युरोपशी जुळणारे हितसंबंध यामुळे भारत हा नैसर्गिक भागीदार ठरत आहे. सायबर संरक्षण, सागरी सुरक्षा आणि प्रगत प्रणालींमधील सहकार्यामुळे ही धोरणात्मक गुंतवणूक अधिक व्यापक होत आहे. अमेरिकेने 'नाटो'मधून पाऊल मागे घेतले, तर तो शीतयुद्धानंतरचा सर्वात मोठा बदल असेलच, शिवाय त्याच वेळी तो भारतासाठी जागतिक महासत्ता म्हणून उदयाचा क्षण ठरू शकतो. आखातातील युद्धानंतर नवी विश्वरचना आकाराला येण्याची भाकिते केली जात आहेत. त्यामध्ये 'नाटो' केवळ नावापुरती उरेल की पूर्णपणे विखुरली जाईल, याचे उत्तर येणारा काळच देईल.

# शेजारची सत्तांतरे आणि आपण

**शेजारच्या बांगलादेश आणि नेपाळमध्ये 'जेन झी'ने केलेल्या हिंसक आंदोलनानंतर निवडणुका होऊन सत्तांतर झाले. ही नवी सरकारे अद्याप रुळत असताना भारताशी त्यांचे संबंध कसे असतील, याचा ऊहापोह..**




भारताचे निकट शेजारी असलेल्या बांगलादेश आणि नेपाळ या देशांमध्ये नुकत्याच निवडणुका होऊन नवी सरकारे सत्तेवर आल्यानंतर भारताच्या राजकीय वर्तुळात समाधानाचे वातावरण आहे. बांगलादेशात तत्कालीन पंतप्रधान शेख हसीना विद्यार्थी आंदोलनात पदच्युत झाल्यानंतर आलेले महंमद युनुस यांचे कार्यवाहक सरकार आणि नेपाळात के. पी. शर्मा ओली यांचे सरकार भारतविरोधी वातावरण भडकवूनच आपली सत्ता भक्कम करण्याचा प्रयत्न करीत होते. दोन्ही देशांत प्रस्थापित सरकारांविरुद्ध तरुण जेन झी पिढीने अत्यंत हिंसक आंदोलने केली व या सरकारांना पदभ्रष्ट केले.

बांगलादेशात शेख हसीना यांच्या सरकारने भारताशी चांगले संबंध ठेवले असले तरी या सरकारविरुद्ध देशात असंतोष होता. या असंतोषाचे रूपांतर विद्यार्थी आंदोलनात होऊन शेख हसीना यांना ऑगस्ट २०२४ मध्ये सत्ता सोडावी लागली. त्यानंतर तेथे महंमद युनुस यांचे हंगामी सरकार आले. पण या सरकारने सत्तेवर आल्यापासून भारतविरोधी धोरण राबविण्यास सुरुवात केली. खरे तर युनुस यांचे सरकार ही एक तात्पुरती व्यवस्था होती व त्याच्यावर फक्त देशात निवडणुका घेण्याची जबाबादारी होती. पण या सरकारने निवडणुका घेण्यास टाळाटाळ करून धोरणविषयक निर्णय घेण्यास सुरुवात केली. त्यामुळे या सरकारविरोधातही देशात वातावरण निर्माण होऊ लागले व निवडणुकांसाठी युनुस सरकारवर दबाव वाढू लागला. त्यामुळे गेल्या फेब्रुवारीत देशात निवडणुका घेण्यात आल्या. त्यात बांगलादेश नॅशनालिस्ट पार्टी (बीएनपी) ही बहुमत मिळवून सत्तेवर आली. या पक्षाचे नेते तारीक रहमान हे पंतप्रधान झाले.

नेपाळमध्येही पंतप्रधान के. पी. शर्मा ओली यांच्याविरुद्ध जेन झी पिढीचे असेच हिंसक आंदोलन झाले आणि ओली यांनाही पदभ्रष्ट व्हावे लागले. तेथेही त्यामुळे हंगामी कार्यवाहू सरकार आले. या सरकारने मात्र निवडणुका घेण्याचे आपले कर्तव्य पार पाडले. या निवडणुकीत तरुणांच्या राष्ट्रीय स्वतंत्र पार्टीला दोन तृतीयांश बहुमत मिळाले व या पक्षाचे तरुण नेते बालेन्द्र शहा यांची पंतप्रधानपदी निवड झाली.

बांगलादेश आणि नेपाळ या आपल्या दोन्ही निकट शेजारी देशांत नि:पक्षपाती आणि शांततापूर्ण वातावरणात निवडणुका झाल्याबद्दल भारत सरकारने समाधान व्यक्त केले आणि नव्या पंतप्रधानांना त्यांच्या निवडीबद्दल शुभेच्छा दिल्या.या दोन्ही देशांतील नव्या सरकारांची भारतविषयक धोरणे अद्याप स्पष्ट व्हायची असली तरी तेथील भारतविरोधी सरकारांना या निवडणुकीत तेथील जनतेने पराभूत व पदभ्रष्ट केल्यामुळे भारत सरकारमध्ये समाधानाचे वातावरण आहे. नव्या सरकारच्या प्रमुखांनी निवडणूक प्रचाराच्या काळात भारतासंबंधी काहीही अनुचित व दोन्ही देशांच्या संबंधांना बाधा येईल अशी विधाने केली नाहीत किंबहुना त्यांच्या निवडणूक प्रचारात भारत हा मुद्दा फारसा आला नाही.

दोन्ही देशांतील निवडणुका आधीच्या सरकारांचा भ्रष्ट कारभार, मंत्र्यांचा भ्रष्टाचार आदी मुद्द्यांवरच लढल्या गेल्या, ही पण भारताच्या दृष्टीने समाधानाची गोष्ट होती. बांगलादेशात निवडणुकीतील एक प्रमुख पक्ष जमाते इस्लामी हा पाकिस्तानवादी व भारतविरोधी मानला जातो, पण या पक्षानेही निवडणूक प्रचारासाठी भारतविरोधाचा वापर केला नाही, हे महत्त्वाचे. अर्थात या दोन्ही देशांतील निवडणुकीच्या काळात भारताने सर्व पक्षांशी संपर्क ठेवला व आपण कोणत्याच एका पक्षाच्या पारड्यात वजन टाकणार नसून तेथील जनतेचा जो काही कौल असेल तो आपण मान्य करणार असल्याचे संकेत दिले. त्यामुळे निवडणुकीनंतर या देशांतील नवी सरकारे आणि भारत सरकार यांच्यात सुरळीत व निरपेक्ष संपर्क होऊ शकला आणि 'नवी पाटी, नवे राज्य' या पद्धतीने संबंध सुरू करता आले.

बांगलादेशात निवडणुकीच्या तोंडावरच बीएनपीच्या नेत्या व पंतप्रधान तारीक यांची आई बेगम खालेदा झिया यांचे निधन झाले. त्यांच्या अंत्यविधीसाठी भारतातर्फे परराष्ट्रमंत्री जयशंकर यांना पाठवून भारताने बीएनपीचे नवे नेते तारीक रहमान यांना अनुकूल संदेश दिला होता. त्यामुळे पुढे तारीक हे पंतप्रधान झाल्यावर दोन्ही देशांच्या सरकारात सुसंवाद सुरू झाला होता. त्यानंतर लगेच पश्चिम आशियात इराणविरुद्धचे युद्ध सुरू होऊन इंधनतेलाची टंचाई सुरू झाली तेव्हा बांगलादेशने भारताकडे इंधन तेल पुरवठ्याची मागणी केली. भारत व बांगलादेश यांच्यात २०१५ सालापासून तेलपुरवठ्याचा करार झाला आहे. भारत नुमालीगढ रिफायनरीमधून दोन्ही देशांत असलेल्या पाइपलाइनमधून बांगलादेशला तेलपुरवठा करीत असे. पण युनुस महंमद यांनी भारतविरोधी धोरण अवलंबल्यानंतर हा तेलपुरवठा बंद करण्यात आला होता. आता तारीक यांच्या विनंतीनंतर भारताने जगात तेलटंचाई असतानाही दोन्ही देशांच्या मैत्रीखातर हा पुरवठा पुन्हा सुरू केला आहे. भारताने मार्च महिन्यात बांगलादेशला पाच हजार टन डिझेल पुरवले आहे व आणखीही पुरविण्याची तयारी दाखवली आहे.

युनुस महंमद यांच्या काळात त्यांच्या हंगामी सरकारने बांगलादेश मुक्तिलढ्याचा इतिहास मिटवून पाकिस्तानशी सुरक्षा संबंध वाढविण्याच्या हालचाली सुरू केल्या होत्या. पण तारीक रहमान यांनी पंतप्रधानपद स्वीकारल्यानंतर २५ मार्चच्या बांगलादेश मुक्तिलढ्याच्या वर्धापनदिनानिमित्त पाकिस्तानने केलेल्या अत्याचारांचा पाढा वाचला आणि हे अत्याचार बांगलादेशी जनता कधीच विसरू शकत नाही, असे सांगून त्यांचे सरकार पाकिस्तानशी अंतर ठेवणार असल्याचे संकेत दिले. हा दिवस बांगलादेशच्या नवी दिल्लीतील उच्चायुक्तालयात साजरा करण्यात आला. यावेळी भारताचे परराष्ट्र राज्यमंत्री किर्तीवर्धन सिंग हे उपस्थित होते. त्यावेळी बांगलादेशचे उच्चायुक्त रियाझ हमीदुल्ला यांनी बांगलादेश मुक्तिवाहिनीला भारतीयांनी केलेल्या भरभरून मदतीची आठवण काढली व ही मदत बांगलादेश कधीच विसरू शकत नाही, असे सांगत भारत व बांगलादेश संबंधाची भावी दिशाच स्पष्ट केली.

बांगलादेशच्या जनतेने काही विशिष्ट अपेक्षा ठेवून आपल्या पक्षाला बहुमत दिले आहे, याची जाणीव तारीक रहमान यांना आहे. विशेषत: महंमद युनुस यांच्या अल्प कारकिर्दीत बांगलादेशच्या कुंठीत झालेली आर्थिक प्रगती आपल्याला पुन्हा मार्गावर आणावी लागणार आहे, याचे भान त्यांना आहे. त्यासाठी भारताची मदत लागणार आहे, हे ते जाणून आहेत. युनुस यांच्या काळात बांगलादेशातील महिला रोजगाराचे प्रमुख साधन असलेले तयार कपड्यांचे कारखाने बंद पडले होते. ते सुरू करणे आवश्यक आहे.

युनुस सरकारने अदानी वीज कंपनीकडून वीज घेणे बंद केले होते, तसेच त्यांची वीजबिले थकवली होती. आता हा वीजपुरवठा सुरू करण्याच्या हालचाली सुरू आहेत. असे असले तरी दोन्ही देश अकारण एकमेकांच्या खूप जवळ येण्याचा प्रयत्न करीत नाहीत. सध्या व्यावहारिक पातळीवरच देवाणघेवाण सुरू आहे. कारण बांगलादेशाच्या जनतेतील भारतविरोधी भावना अद्याप पुरेशी शांत झालेली नाही. त्यातच शेख हसीना यांना भारताने आश्रय दिल्याचा राग बांगलादेशी जनतेच्या मनात आहे. तारीक सरकारलाही आपण भारताकडे झुकतो आहोत, असे दिसू द्यायचे नाही. शिवाय तिस्ता नदीच्या पाणीवाटपाचा प्रश्न भारताच्या अंतर्गत राजकारणामुळे भिजत पडला आहे. गंगा पाणीवाटपाच्या कराराचेही नूतनीकरण व्हायचे आहे. त्यामुळे दोन्ही देशांनी धीमी वाटचाल सुरू केली आहे. भारतासाठी मुख्य प्रश्न सुरक्षेचा आहे.

बांगलादेश सरकार चीनशीही चांगले संबध ठेवत आहे. चीनच्या बेल्ट अँड रोड प्रकल्पात हा देश सामील आहे. शिवाय चीन बांगलादेशला लष्करी साहित्याचा पुरवठाही करीत आहे. त्यामुळे भारताच्या सुरक्षा चिंतांचे निराकरण बांगलादेशला करावे लागणार आहे, पण भारताने इतक्यात या विषयाला हात न घातला आधी आर्थिक संबंध सुरळीत करणे आवश्यक आहे. बांगलादेशचा सर्वात मोठा व्यापारी भागीदार भारत आहे. त्यामुळे भारताने सध्या विस्कळीत झालेले आर्थिक संबंध सुरळीत करून मग सुरक्षा संबंधांकडे वळणे योग्य ठरेल. पण नव्या बांगलादेश सरकारने भारताला अनेक सकारात्मक संकेत दिले आहेत, त्यामुळे नवीदिल्लीची चिंता काहीशी कमी झाली आहे.

नेपाळमध्ये आलेल्या बालेन्द्र शहा सरकारचे भारत सरकारने स्वागत केले आहे. पण दोन्ही देशांच्या संबंधांबाबत शहा सरकारने अद्याप निश्चित असे काही संकेत दिलेले नाहीत. पण काही नकारात्मक संकेत नाहीत, ही पण एक समाधानाचीच बाब म्हणावी लागेल. भारत व नेपाळमध्ये लिपुलेखचा सीमावाद निर्माण करून के. पी. शर्मा ओली सरकारने दोन्ही देशांच्या संबंधात विष पेरून ठेवले आहे. ते कसे दूर करायचे याचा विचार बालेन्द्र शहा सरकारला करावा लागेल. पण हा विषय सध्या बाजूला ठेवून या नव्या सरकारला भारताशी सुरळीत संबंध ठेवावेच लागतील, अशी परिस्थिती आहे.

बालेन्द्र शहा हे इंजिनीअर आहेत व लोकप्रिय गायक आहेत. त्यांचे शिक्षण भारतात बंगळुरू येथे झाले आहे. त्यांची बहीणही भारतात बंगळुरू येथेच राहते. बालेन्द्र हे नेपाळमधील माधेशी समाजाचे आहेत. हा समाज भारताशी जवळीक असलेला आहे व या समाजाचे भारतात विवाहसंबंध होत असतात. शहा यांनी जनकपूर येथून आपला प्रचार सुरू केला होता व त्यांनी रामनवमीच्या दिवशी पंतप्रधानपदाची शपथ घेतली. आदी गोष्टींमुळे त्यांचे भारताशी सांस्कृतिक संबंध स्पष्ट होत असले तरी सुदृढ राजकीय संबंधांसाठी तेवढे पुरेसे नाही. दोन्ही देशांतील दृढ आर्थिक संबंध हाच खरा दोन्ही देशांतल्या संबंधांचा पाया आहे.

नेपाळ हा लँडलॉक्ड देश आहे व तो त्याच्या गरजांसाठी बराचसा भारतावर अवलंबून आहे. मध्यंतरीच्या काळात भारतावरचे हे अवलंबित्व कमी करण्यासाठी नेपाळने चीनशी संबंध वाढवले होते. पण ते आर्थिकदृष्ट्या फारसे किफायतशीर ठरले नाही. त्यामुळे नव्या पिढीच्या या नव्या सरकारशी भारताला नव्या दृष्टिकोनातून संबंध प्रस्थापित करावे लागतील. या सरकारपुढे महत्त्वाचा प्रश्न अर्थात देशांतर्गत कारभाराचा आहे. दीर्घकाळ नेपाळमध्ये स्थिर राजकीय परिस्थिती नव्हती. सरकारे सतत बदलत होती. भ्रष्टाचार मोठ्या प्रमाणात वाढला होता. सरकार दरबारी चीनचे वर्चस्व वाढले होते. त्यामुळे बालेन्द्र सरकारला आधी या समस्या दूर कराव्या लागतील. त्यांचे सरकार चीन व भारत यांच्याशी सारख्या अंतरावरील संबंध ठेवण्याची भाषा करीत असले तरी भारताशी अधिक जवळचे संबंध ठेवणे नेपाळच्या हिताचे ठरले आहे. त्यामुळे आता हे नवे सरकार नेमके काय करते, याकडे बारकाईने लक्ष ठेवावे लागेल.

(साभार मटा)

**-दिवाकर देशपांडे**

## 'सारे जहाँ से अच्छा हिन्दोस्ताँ हमारा'

आज संपूर्ण जग एका अनिश्चिततेच्या गर्तेत अडकले आहे. अमेरिका, इस्त्रायल आणि इराण यांच्यातील वाढत्या संघर्षाने केवळ सीमेवरच ठिणग्या पडल्या नाहीत तर यामुळे जागतिक अर्थव्यवस्थेचा कणा मोडायला सुरुवात झाली आहे. विशेषतः आखाती देशांमध्ये जिथे भारतीय गुंतवणूकदारांनी आणि बड्या हस्तींनी आपले 'दुसरे घर' शोधले होत.आज तिथे भयाण शांतता आणि आर्थिक मंदीचे सावट आहे. या पार्श्वभूमीवर, मुहम्मद इक़बाल यांनी लिहिलेली कविता आणि लतादीदींच्या सुरेल मधुर आवाजात गायलेल्या'सारे जहाँ से अच्छा हिन्दोस्ताँ हमारा' ओळी केवळ कानाला सुखावत नाहीत, तर त्या वास्तवाचा आरसा बनून समोर येत आहेत.सौदी अरेबिया, शारजा, कुवेत आणि दुबई यांसारख्या शहरांमध्ये आज युद्धजन्य परिस्थितीमुळे घबराट पसरली आहे. तेथील रिअल इस्टेट मार्केटला मोठा तडा गेला असून घरांच्या आणि फ्लॅट्सच्या किमतीत ४० ते ५० टक्क्यांपर्यंत घट झाली आहे. ज्या उद्योजकांनी आपले साम्राज्य तिथे वस्तिारले होते, ते आता आपला व्यवसाय गुंडाळण्याच्या विचारात आहेत. भविष्यातील असुरक्षितता आणि ठप्प झालेले उद्योगधंदे यामुळे तिथे राहणे आता 'आल्हादायक' राहिलेले नाही. महागाईने उच्चांक गाठला असून, सामान्य माणसाच्या हातात शिल्लक राहणारी पुंजी आता संपुष्टात येत आहे. देशातील अनेक बड्या राजकारण्यांनी, सिनेकलावंतांनी आणि खेळाडूंनी परदेशात आपले कायमचे पत्ते शोधले होते. मात्र, आज जेव्हा जगावर युद्धाचे संकट ओढवले आहे, तेव्हा याच लोकांना पुन्हा मायभूमीची ओढ लागली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकारने सत्तेत आल्यापासून राजकीय स्थैर्य, मजबूत अर्थव्यवस्था आणि जागतिक संघर्षातही जपलेली आपली तटस्थता यामुळे भारताकडे पाहण्याचा जगाचा दृष्टिकोन पूर्णपणे बदलला आहे.

**अविनाश देशपांडे**

संवाद

## वाढदिवस साजरा करण्यातील विकृती !

हल्लीच्या पिढीवर पाश्चिमात्य संस्कृतीचा मोठा प्रभाव असलेला पाहायला मिळतो. वाढदिवशी जागी होणारी ही विकृतीही त्याचाच एक भाग आहे. वाढदिवस कसा साजरा करावा याविषयीचे सर्वांगसुंदर ज्ञान आपल्या ऋषी मुनींनी जगाला दिले आहे; मात्र इंटरनेटच्या युगात वावरणाऱ्या आजच्या पिढीला त्याचा मागमूसही नाही. हिंदू धर्मानुसार वाढदिवसाच्या दिवशी दिवे विझवायचे नसतात, तर एक नवीन दिवा लावून पुढील जीवन तेजोमय करण्याचा संकल्प करावा. ज्याचा वाढदिवस आहे त्याचे औक्षण करावे. या दिवशी जेष्ठ मंडळी, नातेवाईक यांचा आशीर्वाद घ्यावा आणि समवयस्कांच्या शुभेच्छा घ्याव्यात. या दिवशी भेटवस्तू स्वीकारायच्या नसतात तर दानधर्म करायचा असतो. वाढदिवसाच्या शुभेच्छा सुद्धा सूर्योदयानंतरच द्याव्यात. ज्याचा वाढदिवस आहे त्याचे येणारे जीवन आनंदमय, भरभराटीचे आणि निरोगी जावे हा उदात्त हेतू यामागे दडलेला आहे. याउलट मध्यरात्री १२ वाजता दिवे विझवून, केकवर सूरी फिरवून, केकने एकमेकांची तोंडे रंगवून आणि मद्याचे पेले रिझवुन आपण कोणत्या आयुष्याची सुरुवात करत आहोत याचा विचार आजची तरुण पिढी करणार आहे का ?

**मोक्षदा घाणेकर**

## उन्हाळ्यातील वाढते जलसंकट आव्हानच !

राज्यात इंधन आणि गॅस टंचाईच्यापठोपाठ आता पाण्याचेही संकट उभे ठाकताना दिसत आहे. राज्यात उन्हाची तीव्रता दिवसेंदिवस वाढत चालली आहे. मार्चच्या मध्यापासूनच उन्हाच्या झळांनी नागरिक वैतागले आहे. विदर्भासह संपूर्ण राज्यातच तापमानाने उच्चांक गाठण्यास सुरुवात झाली आहे. जसजसे ऊन वाढत जाईल तसतसे जनतेच्या तोंडचे पाणी पळण्यास आरंभ होईल आणि जलटंचाईचे संकट खोलवर होत जाईल. पिण्याच्या पाण्याचा पुरवठा सुरळीतपणे होण्यासाठी शासन आणि प्रशासनाची धावपळ आता सुरु झाली आहे. मागीलवर्षी संपूर्ण राज्यात समाधानकारक पर्जन्यवृष्टी झाली होती. तरीही पाण्याचे दुर्भिक्ष संपण्यास तयार नाही. आणि ते कसे संपणार पावसाचे पाणी अडवण्याची किंवा ते नीटपणे साठवून ठेवण्याची अक्षम यंत्रणाच आपल्याकडे अद्याप कार्यान्वित नसल्यामुळे हजारो गॅलन पाणी नदी-नाल्यांद्वारे समुद्राला जाऊन मिळते. म्हणजेच पावसाचे पाणी अक्षरशः वाहून जाते.शेती आणि औद्योगिक क्षेत्रांपेक्षा पेयजलाला अधिक प्राधान्य देण्याचे सरकारचे धोरण राहिले आहे. वाढत्या उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर त्यात आता काटेकोरपणा आणणे आवश्यक ठरणार आहे. राज्यातल्या काही जिल्ह्यांत एक दिवसाआड पाणीपुरवठा केला जातो.या संकटाचा सामना करण्यासाठी राज्यसरकार आणि महानगरपालिका प्रशासन यांच्यात योग्य तो समन्वय साधला जाण्याची अपेक्षा आहे. तरच उन्हाळ्यातील वाढत्या जलसंकटाला सामोरे जाता येईल.

**प्रा. मधुकर चुटे**

## महिलांना सर्वच क्षेत्रात संधी

अलीकडे मुंबई महानगर पालिकेत महिला राज आल्याची बातमी वाचली. मुंबई शहराच्या गेल्या दीडशे वर्षाच्या काळात प्रथमच शहराच्या आयुक्त म्हणून अश्विनी भिडे यांची नेमणूक झाली.आज तेथे भारतीय जनता पक्षाच्या महापौर, विरोधी पक्षाच्या नेत्या तसेच स्थायी समितीचे अध्यक्ष आदी अनेक स्थानावर महिला आहेत. ही खरे तर अभिमानास्पद गोस्ट आहे. या साऱ्या महिला आता मुंबईचा कारभार वेगाने करतील अशी आशा बाळगण्यास हरकत नाही.महिलांना संसदेत ३३ टक्के आरक्षण देण्याचे ठरविले आहे २०२९ च्या लोकसभेत याचे प्रतिबिंब उमटेल. सदस्य संख्याही वाढणार आहे. आज महिला शिक्षण, आरोग्य, राजकारण, अवकाश, रेलवे, व्यवस्था आदी क्षेत्रात वेगाने काम करीत आहेत. आता असे एकही क्षेत्र उरले नाही कि जेथे महिलांनी शिरकाव केलेला नाही.आज अभ्यासात महिला पुढे आहेत. शालेय परीक्षेत देशाच्या महिलाच बाजी मारताना दिसून येतात. अभ्यासातही त्या पुढे आहेत. देशाच्या राष्ट्रपती पदी महिला आहे या सर्वांचा अभिमान आपणा सर्वांना आहे देशात असलेल्या कायद्यामुळे हे शक्य झाले आहे.हे महिलांची जमेची बाजू आहे. तथापि महिलांच्या या कर्तत्वात पुरुषही पुढे पुढे करून काम करीत असल्याचे अनेक ठिकाणी दसून येते. आज कित्येक ग्रामपंचायत क्षेत्रात महिला सरपंच असली तरीही पुरुषाचं कारभार चालवितात असे चित्र दिसून येते.काही पंचायत समितीत व जिल्हा परिषदेत सुद्धा ही स्थिती आहे. अशा ठिकाणी पुरुषांनी भाग न घेता स्त्रियांना वाव देणे जरूर आहे असे केल्यास महिला वेगाने काम करू शकतील.

**शांताराम वाघ**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# जांब बाजारात अवैध धंद्यांना ऊत!

## पोलिसांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह, हप्ता वसुलीचे आरोप

**जनमाध्यम प्रतिनिधी**




पुसद - पुसद ग्रामीण पोलिस स्टेशनच्या हद्दीत असलेल्या मौजा जांबबाजार मध्ये अवैध धंद्यांला ऊत आला असून, सामान्य नागरिकांचे जगणे कठीण झाले आहे. वरळी/मटका,जुगार, गावठी व देशी दारूची अवैध विक्री आणि गुटख्याची तस्करी खुलेआम उघडपणे सुरू असल्याने पोलिस प्रशासनाच्या भूमिकेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाला आहे. विशेषत म्हणजे, ग्रामीण पोलीस स्टेशनच्या ठाणेदारांनी पदभार स्वीकारल्यापासूनच या धंद्यांना 'ऊत 'आल्याची चर्चा परिसरात रंगली आहे.

ग्रामीण पोलिस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या जांबबाजार बीटमधील गावांमध्ये अवैध धंदे ठाणेदार व बीट जमादार नाना यांच्या आशिर्वादाने हे सर्व प्रकार बिनधास्तपणे सुरू असल्याचा थेट आरोप आता स्थानिक नागरिकाकडून होत आहे. पोलीस स्टेशन 'हद्दीत कोणताही अवैध व्यवसाय सुरू नसल्याचे हमीपत्र' देण्याचे आदेश जिल्हा पोलिस अधीक्षकांना दिले असतांनाही, प्रत्यक्षात मात्र परिस्थिती नेमकी उलटी दिसत आहे.

यामागे महीण्या काठी लाखो रुपये 'हप्ता वसुली' मोठ्या प्रमाणात होत असल्याचे बोलले जात आहे. जांब बाजार येथील बीट जमादार नाना हा महिन्याकाठी लाखो रुपये हप्ता अवैध धंदेवाल्याकडून वसुली करून ठाणेदाराकडे जमा करतो आणि त्यातील आपला हिस्सा घेऊन अवैध धंद्याला मूकसंमती देऊन दुर्लक्ष करतो हा बिट जमदार अनेक वर्षापासून पुसद उपविभागात कार्यरत आहे. हा नाना जमादार ड्युटी कमी आणि इतर कामे जास्त करत असतो त्यामुळे जिल्हा पोलिस अधीक्षकांनी संबंधित ग्रामीण पोलीस स्टेशनचे ठाणेदार व बीट जमादार यांची तात्काळ पुसद पोलीस उपविभागातून तात्काळ बदली करण्यात यावी असा सर्वसाधारण नागरीकांकडून सुर निघत आहे, कारण याच्यामुळे अवैध धंद्याला प्रोत्साहन मिळत असल्याने शांतता व कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊन या ठिकाणी गुन्हेगारीला चालना मिळत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. या अगोदर अनेक वेळा दैनिक जनमाध्यम या वृत्तपत्राने वरळी, मटका तसेच गुटखा, देशी दारू या अवैध धंद्याबाबत अनेक बातम्या प्रसिद्ध केल्या आहेत मात्र जांब बांजार येथील अवैध धंद्यावर कोणताही परिणाम झाला नाही उलट जोमात सुरू असून पोलीस जमादाराने धंदे बंद करण्याऐवजी अवैध धंद्यावाल्याकडून वाढून हप्त्याची मागणी होत आहे असे स्थानिक ग्रामस्थांकडून बोलल्या जात आहे. त्यामुळे या सुरू असलेल्या अवैध धंद्याकडे जिल्हापोलीस अधीक्षक कुमार चिंता हे कोणत्या प्रकारे कारवाई करतात याकडे सर्व जांब बाजार बीट परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## महागाव तहसील परिसरातील हनुमान मंदिरात जयंती साजरी



महागाव - तहसील कार्यालयाच्या आवारात असलेल्या संकट मोचन हनुमान मंदिरात हनुमान जन्मोत्सव सोहळा मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. येथे मागील तीस वर्षापासून हनुमान जन्मोत्सव साजरा करण्यात येतो. यावेळी मंदिरात सकाळपासूनच भाविकांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. हनुमान जयंतीनिमित्त विशेष अभिषेक पूजा व धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. दैनिक युवक आधारचे प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत भक्तिमय वातावरणात अभिषेक पूजा पार पडली. सोहळ्यानिमित्त आयोजित महाप्रसादाचा लाभ असंख्य भाविकांनी घेतला. संपूर्ण परिसर "जय हनुमान" च्या घोषणांनी दुमदुमून गेला होता. भक्तांनी मोठ्या श्रद्धेने दर्शन घेत उत्सवात सहभाग नोंदवला. या कार्यक्रमामुळे परिसरात आनंदाचे व धार्मिकतेचे वातावरण निर्माण झाले होते. यावेळी मनोज उर्फ एम डी सूरोशे, दत्ता कदम, विजय वानखेडे सर, बबनराव मोहटे, अजय उंबरकर, बंडू शिवरकर, अनिल बोरकर, रवी इंगळे, चेतन केळकर, संदिप राजनकर, दत्ता नरवाडे, रियांश सुरोशे आदींनी परिश्रम घेतले.

# गांधी चौकातील १६० गाळ्यांचा प्रश्न अंतिम टप्प्यात !

## ८ एप्रिलला लागणार निर्णायक निकाल, व्यापारी व नागरिकांचे लक्ष न्यायालयाकडे

**जनमाध्यम प्रतिनिधी**




वणी - वणी शहरातील मुख्य बाजारपेठ असलेल्या गांधी चौकातील १६० गाळ्यांचा दीर्घकाळ प्रलंबित प्रश्न आता निर्णायक वळणावर आला असून, या प्रकरणावर उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात बुधवारी (ता. ८ एप्रिल) अंतिम सुनावणी होणार आहे. याबाबत न्यायालयाने २६ मार्च रोजी आदेश दिले असून, शहरातील व्यापारी व नागरिकांचे लक्ष आता या निकालाकडे लागले आहे.

गांधी चौकातील गाळ्यांचा प्रश्न मागील तब्बल ११ वर्षांपासून न्यायप्रक्रियेत अडकलेला आहे. ९ डिसेंबर २०१५ रोजी राज्याच्या नगरविकास मंत्र्यांनी हे गाळे रिकामे करून त्यांचे पुनर्मूल्यांकन करावे आणि पुढील ३० वर्षांसाठी लिलावाद्वारे नव्याने भाड्याने देण्याचा निर्णय जाहीर केला होता. त्यानंतर या निर्णयाविरोधात विविध स्तरांवर अपील दाखल होत गेले आणि प्रकरण न्यायालयीन प्रक्रियेत अडकले. सद्यस्थितीत शिवलाल शुघवानी व इतरांनी नागपूर खंडपीठात याचिका दाखल केली आहे. दरम्यान, ही याचिका प्रलंबित असतानाच नगर परिषद कौन्सिलने मुख्याधिकाऱ्यांच्या निरीक्षणाला दुजोरा न देता सभेत विषय क्रमांक ३१ अंतर्गत ठराव मंजूर केला. या ठरावानुसार २०० ते ३०० नवीन गाळे बांधून विद्यमान गाळेधारकांना त्यामध्ये सामावून घेण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला असून, तो न्यायालयात सादर करण्यास मान्यता देण्यात आली. याच पार्श्वभूमीवर याचिकाकर्त्यांनी नव्याने पिटीशन दाखल केल्याने प्रकरणाला नवे वळण मिळाले आहे. प्रतिवादींच्या वकिलांनी सुधारित याचिकेवर उत्तर दाखल करण्यासाठी वेळ मागितला असला,तरी हे जलदगती प्रकरण असल्याने न्यायालयाने सर्व पक्षकारांना अंतिम संधी दिली आहे. न्यायमूर्ती प्रफुल्ल एस. खुबलकर यांच्या न्यायालयात सुरू असलेल्या या प्रकरणावर आता अंतिम सुनावणी होणार असून,तोपर्यंत यापूर्वीचा अंतरिम आदेश कायम राहणार आहे. या निकालामुळे गांधी चौकातील शेकडो व्यापाऱ्यांचे भविष्य ठरणार असून,शहराच्या आर्थिक घडामोडींवरही त्याचा मोठा परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## • वेचक

### पत्रकारिता क्षेत्रातील गौरव : मनोहर बोभाटे यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर पत्रकारिता पुरस्कार जाहीर



राळेगाव - क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले व राष्ट्रनिर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षीप्रमाणे यंदाही समता पर्व प्रतिष्ठान, यवतमाळ यांच्या वतीने विविध सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. गेल्या २२ वर्षांपासून सुरू असलेल्या या समता पर्वात प्रबोधनपर व्याख्याने, सांस्कृतिक लोकधारा, महानाट्य, "यवतमाळ आयडल", अभिनय स्पर्धा आदी उपक्रमांचा समावेश असून देश-विदेशातील अनेक मान्यवरांची उपस्थिती या कार्यक्रमांना लाभत असते. समता पर्वाची स्थापना महाराष्ट्र राज्याच्या सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव मा. डॉ. हर्षदीप कांबळे यांच्या प्रेरणेतून करण्यात आली आहे. यावर्षी ७ एप्रिल ते १४ एप्रिल २०२६ या कालावधीत "समता पर्व २०२६" चे आयोजन करण्यात आले आहे. या निमित्ताने दिनांक १३ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ७.०० वाजता समता पर्व प्रतिष्ठानच्या वतीने दिला जाणारा प्रतिष्ठेचा "डॉ. बाबासाहेब आंबेडकर पत्रकारिता पुरस्कार २०२६" दैनिक पब्लिक पोस्टचे राळेगाव तालुका प्रतिनिधी मनोहर बोभाटे यांना जाहीर करण्यात आला आहे. हा पुरस्कार हरियाणाचे माजी मंत्री तथा खासदार मा. राजकुमार सैनी यांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार असून, या समारंभासाठी मनोहर बोभाटे यांना सहपरिवार उपस्थित राहण्याचे निमंत्रण समता पर्व प्रतिष्ठान, यवतमाळ यांच्या वतीने देण्यात आले आहे. पत्रकारिता क्षेत्रात समाजाभिमुख कार्य करताना सामाजिक परिवर्तनासाठी दिलेल्या योगदानाची दखल घेत हा पुरस्कार जाहीर करण्यात आला असून, यामुळे मनोहर बोभाटे यांच्या कार्याला अधिक प्रेरणा मिळेल, असा विश्वास समता पर्व प्रतिष्ठानच्या वतीने व्यक्त करण्यात आला आहे.

### जिल्ह्यात आठ जणांवर प्रतिबंधात्मक कारवाई

यवतमाळ : जिल्ह्यात कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी पोलीस प्रशासन अलर्ट मोडवर आले आहेत. त्यातूनच दिवसा आणि रात्रीच्या गस्तीत वाढ करण्यात आली आहे. शिवाय सराईत गुन्हेगार, अवैध दारू विक्रेते, मटका बहाद्दर, जुगारी आणि सामाजिक शांतता भंग करणाऱ्यांवर प्रतिबंधात्मक कारवाया करण्याचा सपाटा पोलिसांनी चालविला आहे. त्याचाच एक भाग म्हणून जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यातंर्गत आठ जणांवर प्रतिबंधात्मक कारवाया करण्यात आल्या.

### पूर्ववैमनस्यातून इसमावर लोखंडी कटरने हल्ला

पांढरकवडा : जुन्या वादातून एका ५७ वर्षीय व्यक्तीवर लोखंडी कटरने प्राणघातक हल्ला केला. ही घटना ३ एप्रिल रोजी दुपारी येथील बालाजी ज्वेलर्सजवळील एका बंद दुकानासमोर घडली. या हल्ल्यात व्यक्ती गंभीर जखमी झाला. याप्रकरणी पांढरकवडा पोलिसांनी आरोपीला अटक केली. नरेंद्र जानराव मडावी रा. घोन्सी हे असे गंभीर जखमी असलेल्या व्यक्तीचे नाव आहे. संजय तुकाराम मडावी (४३), रा. इंदिरानगर, पांढरकवडा असे हल्ला करणाऱ्याचे नाव आहे. जुन्या वादातून संजय मडावी याने नरेंद्र मडावी यांना जिवे मारण्याच्या उद्देशाने त्यांच्या गळ्यावर आणि हातावर लोखंडी कटरने दोन ते तीन वेळा वार केले. या हल्ल्यात नरेंद्र मडावी गंभीर जखमी झाल्याने त्यांना तातडीने उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, प्रकृती चिंताजनक असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी यवतमाळ जिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले आहे. याप्रकरणी जखमीचा मुलगा राज मडावी याने दिलेल्या तक्रारीवरून पांढरकवडा पोलिसांनी संजय मडावी विरुद्ध विविध कलमांन्वये गुन्हा दाखल केला आहे. घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी रॉबिन बन्सल, ठाणेदार एल. डी. तावरे यांनी घटनास्थळी भेट दिली. पोलिसांनी हल्ल्यात वापरलेले लोखंडी कटर हस्तगत केले असून आरोपीला ४ एप्रिल रोजी सायंकाळी अटक केली. पुढील तपास साहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप नरसाळे करीत आहे.

## कायद्याच्या प्रक्रियेचा बळी ठरतंय का 'निम्न पैनगंगा' धरण?

# १० एप्रिलला महामार्ग रोकोचा इशारा

**जनमाध्यम प्रतिनिधी**



यवतमाळ - निम्न पैनगंगा धरण प्रकल्पाविरोधात शेतकरी संघटना आक्रमक झाली असून, आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण न करताच प्रकल्प राबविण्याचा आरोप करत १० एप्रिल रोजी राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३६१ वर रास्ता रोको आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे. राष्ट्रीय किसान मोर्चा महाराष्ट्रचे प्रदेशाध्यक्ष दिपक इंगळे यांनी ही घोषणा केली.

इंगळे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात प्रशासनावर गंभीर आरोप करत म्हटले आहे की, प्रकल्पासाठी अद्याप सामाजिक परिणाम मूल्यांकन (SIA) अहवाल तयार करण्यात आलेला नाही, सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) सार्वजनिक करण्यात आलेला नाही, तसेच भूमी अधिग्रहण, पुनर्वसन व पुनर्स्थापन कायदा २०१३ (LARR) अंतर्गत आवश्यक पुनर्वसन प्रक्रिया राबविण्यात आलेली नाही. याशिवाय प्रकल्पग्रस्तांना योग्य मोबदला देण्यात आलेला नसून संबंधित गावांच्या ग्रामसभांची संमतीही घेण्यात आलेली नाही. "कायद्याचे सर्व निकष डावलून प्रशासनाने घेतलेले निर्णय हे अन्यायकारक असून शेतकऱ्यांच्या हक्कांवर गदा आणणारे आहेत," असा आरोप इंगळे यांनी केला. विशेष म्हणजे, नांदेड व यवतमाळ जिल्हाधिकाऱ्यांनी धरण बांधकाम सुरू करण्याचे आदेश दिल्याचा दावा करत त्यांनी प्रशासनाच्या भूमिकेवर सवाल उपस्थित केला आहे.या पार्श्वभूमीवर १० एप्रिल रोजी होणारे महामार्ग रोको आंदोलन निर्णायक ठरण्याची चिन्हे आहेत. आंदोलनादरम्यान कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी प्रशासनावर राहील, असा इशाराही मोर्चाकडून देण्यात आला आहे. तसेच आंदोलन दडपण्यासाठी गुन्हे दाखल करण्याचा प्रयत्न झाल्यास संबंधित अधिकारी व पोलिसांविरोधात कायदेशीर लढा उभारण्यात येईल, असेही स्पष्ट करण्यात आले.दरम्यान, या आंदोलनामुळे परिसरात तणावाची परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता असून प्रशासन सतर्क झाले आहे. मात्र, शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष केल्यास संघर्ष अधिक तीव्र होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# लाडकी बहीण योजनेत त्रुटींचा पाढा..!

## सत्तेतील देवानंद पवारांचा सरकारला घरचा अहेर

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ - महायुती सरकार हे लाडक्या बहिणीच्या नावावर सत्तेच कळस गाठले आहे.सत्तेत बसण्याची चाबी ही लाडकी बहिण ठरली असून मोठ्या गाजावाजा करीत सुरु करण्यात आलेल्या लाडकी बहीण योजनेत अनेक त्रुटी असल्याचे पुन्हा एकदा दिदर्शनात आणून देण्याचा प्रकार देवानंद पवार यांनी पक्षाला घरचा अहेर दिला आहे.

कधी काळी सत्तेच्या विरोधात असलेले आता सत्ताधारी घटकातीलच नेते देवानंद पवार यांनी या योजनेतील अडचणी अधोरेखित करत, तब्बल २० लाख महिलांना इ-केवायसी प्रक्रिये अभावी लाभापासून वंचित राहावे लागत असल्याची कबुली दिली आहे. विशेष म्हणजे सत्तेत असतानाही त्यांनी महिला व बालकल्याण विभागावर अप्रत्यक्षपणे जबाबदारी ढकलत पक्षाला या प्रश्नापासून दूर ठेवण्याचा प्रयत्न केल्याची चर्चा सुरू आहे. महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणा साठी महत्त्वाची योजना म्हणून भाजप, शिवसेना (शिंदे गट) आणि राष्ट्रवादी अजित पवार यांनी या योजनेचा प्रचार केला होता. मात्र, प्रत्यक्षात अंमलबजावणीत अनेक त्रुटी असल्याचे चित्र समोर येत आहे. उपलब्ध आकडेवारीनुसार, राज्यातील कोट्यवधी महिलांना या योजनेचा लाभ दिला जात असला तरी सुमारे ३५ लाख महिला अद्याप विविध कारणांमुळे वंचित आहेत. त्यापैकी सुमारे २० लाख महिलांची ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण न झाल्याने त्यांना लाभ रोखण्यात आल्याचे खुद्द कबुली पवार यांनी स्पष्ट केली. वाशिम जिल्ह्यातील स्थितीही याच समस्येचे उदाहरण ठरत आहे. येथे एकूण ३ लाख २० हजार लाभार्थ्यांपैकी सुमारे ६५ हजार महिलांना लाभ मिळालेला नाही. यामध्ये जवळपास ४० हजार महिलांची ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण न झाल्याचे समोर आले आहे.या पार्श्वभूमीवर देवानंद पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे ई-केवायसी पूर्ण करण्यासाठी विशेष मुदतवाढ देण्याची मागणी केली आहे. सत्तेचा भाग असतानाही अशी मागणी करावी लागत असल्याने ही योजना सक्षम निष्क्रिय झाली असल्याची राजकीय वर्तुळात विविध चर्चांना उधाण आले आहे. उल्लेखनीय म्हणजे, या आधी विरोधी पक्षात असताना देवानंद पवार यांनी अनेक प्रश्नांवर आक्रमक भूमिका घेत आंदोलने केली होती.

त्यावेळी त्यांच्या मागण्यांकडे शासनाने गांभीर्याने पाहत उपाययोजना केल्या होत्या. मात्र, आता सत्तेत राहूनच सरकारच्या धोरणांवर टीका करण्याची वेळ त्यांच्यावर आल्याने त्यांच्या भूमिकेबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

दरम्यान, लाडकी बहीण योजनेतील वंचित महिलांसाठी पवार यांचा हा आवाज खरोखरच संवेदनशील आहे की राजकीय भूमिका सांभाळण्याचा प्रयत्न, याबाबत नागरिक व महिलान मध्ये चर्चा रंगत आहे.

# दोषी ठरलेल्या कनिष्ठ अभियंत्यावर कारवाईचा विलंब!

## निलंबनासाठी तक्रारकर्त्यांचा इशारा

**जनमाध्यम प्रतिनिधी**



महागाव—तालुक्यातील विकास कामांमध्ये झालेल्या अनियमित्येच्या पार्श्वभूमीवर कनिष्ठ अभियंता प्रवीण सलामे यांच्यावर कार्यवाही करण्या साठी मागणी जोर धरू लागली आहे विविध विकास कामाच्या भ्रष्टाचार प्रकरणात सलामे दोषी आढळून आल्या नंतरही जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार पत्की यांच्या कडून अद्याप ही निलंबनाची कारवाई न झाल्याने तक्रारदार त्यामध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार पत्की यांनी या प्रकरणाची चौकशी पूर्ण झाल्या नंतर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल असे संकेत दिले होते मात्र चौकशी अहवाल गेल्या दहा ते पंधरा दिवसा पासून पंचायत समिती स्तरावरून जिल्हा परिषद कडे सादर झाल्या नंतर ही जिल्हा परिषद प्रशासना कडून ठोस निर्णय घेतला गेला नसल्याने निलंबनाची कारवाईला विलंब का असा प्रश्न उपस्थित होत आहे तक्रार कर्त्यांच्या मते पंचायत समितीचा कनिष्ठ अभियंता सलामे यांच्या कामकाजात गंभीर तुरटी आढळून आले असून शासनाच्या निधीचा विविध विकास कामात भ्रष्टाचार झाल्याची पुष्टी एक ते चार प्रस्तावां मध्ये नमूद करण्यात आली आहे त्या मुळे पारदर्शकता राहण्या साठी सलामे यांच्यावर त्वरित निलंबनाची कारवाई आवश्यक आहे तक्रारकर्त्यांनी आता सलामे विरुद्ध कार्यवाही न झाल्यास जिल्हा परिषद कार्यालया समोर आमरण उपोषण करण्याचा इशारा दिला आहे शासनाच्या निधीची अपहार झाल्याचे उघडकीस आल्या नंतरही आतापर्यंत कारवाई का करण्यात आली नाही असा प्रश्न उपस्थित झाला आहे त्यामुळे पारदर्शकता राखण्या साठी कनिष्ठ अभियंता सलामे वर त्वरित निलंबनाची कारवाई करणे आवश्यक आहे दरम्यान जिल्हा परिषद प्रशासनाने या प्रकरणाची तात्काळ दखल घेऊन दोषी आढळणाऱ्या सलामे विरुद्ध निलंबनाची कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी तक्रारकर्त्यातून करण्यात आली आहे जिल्हा परिषद प्रशासनाच्या पुढील निर्णया कडे तक्रारकरत्यांचे लक्ष लागले आहेत येत्या तीन ते चार दिवसात जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडून कार्यवाही न झाल्यास तक्रार करते जिल्हा परिषद कार्यालय समोर आमरण उपोषणास बसणार आहे.

# निवासी अतिक्रमण कायम करण्याच्या निर्णयावर पत्रकार परिषद

## नागरिकांना मोठा दिलासा : मंत्री अशोक उईके

**जनमाध्यम प्रतिनिधी**



राळेगाव - महाराष्ट्र शासनाने निवासी अतिक्रमण कायम करण्याबाबत घेतलेल्या महत्त्वपूर्ण निर्णयाच्या पार्श्वभूमीवर आज राळेगाव येथे पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली. या परिषदेला राज्याचे आदिवासी विकास मंत्री तथा राळेगाव मतदारसंघाचे आमदार प्रा. डॉ. अशोक उईके व भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष ॲड. प्रफुल्ल चौहाण यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलताना मंत्री प्रा. डॉ. अशोक उईके यांनी सांगितले की, राज्यातील गरीब व गरजू कुटुंबांच्या निवाऱ्याचा प्रश्न सोडवण्यासाठी शासनाने ऐतिहासिक निर्णय घेतला असून १ जानेवारी २०११ पूर्वी अस्तित्वात असलेल्या निवासी अतिक्रमण कायम करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या निर्णयामुळे अनेक वर्षांपासून घरकुलाच्या प्रतीक्षेत असलेल्या कुटुंबांना मोठा दिलासा मिळणार आहे. ते पुढे म्हणाले की, ही योजना केवळ निवासी अतिक्रमणांसाठी लागू असून, पात्र लाभार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह वेळेत अर्ज करावा. शासनाने पारदर्शक पद्धतीने ही प्रक्रिया राबवण्याचा निर्णय घेतला आहे. जिल्हाध्यक्ष ॲड. प्रफुल्ल चौहाण यांनीही या निर्णयाचे स्वागत करताना सांगितले की, केंद्र व राज्य सरकार गरीबांच्या पाठीशी ठामपणे उभे आहे. "सर्वांसाठी घर" ही संकल्पना प्रत्यक्षात उतरवण्यासाठी निवासी अतिक्रमण कायम करण्याचा हा निर्णय अत्यंत महत्त्वाचा असून स्थानिक पातळीवर सर्व यंत्रणा याची प्रभावी अंमलबजावणी करतील, असे त्यांनी स्पष्ट केले. या पत्रकार परिषदेत जिल्हा उपाध्यक्ष चित्तरंजन कोल्हे, तालुका अध्यक्ष सौ. छाया ताई पिंपरे, शहर अध्यक्ष शुभम मुके, तालुका उपाध्यक्ष डॉ. कुणाल भोयर तसेच माजी पंचायत समिती सभापती प्रवीण कोकाटे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी उपस्थित पदाधिकाऱ्यांनी नागरिकांना आवाहन केले की, शासनाच्या या योजनेचा लाभ घ्यावा व आपली कागदपत्रे वेळेत सादर करून निवासी अतिक्रमण कायम करून घ्यावे. या पत्रकार परिषदेमुळे अतिक्रमण कायम करण्याच्या निर्णयाबाबत नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण झाली असून, राळेगाव तालुक्यातील अनेक कुटुंबांना याचा प्रत्यक्ष लाभ मिळण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

# गॅस टंचाईवर लक्ष वेधण्यासाठी अनोखे आंदोलन!

## नागरिकांच्या समस्यांकडे प्रशासनाने दखल घ्यावी

**जनमाध्यम प्रतिनिधी**



यवतमाळ – जिल्ह्यात घरगुती गॅस सिलेंडरच्या पुरवठ्यात होत असलेल्या विलंबामुळे नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असून, या प्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी गोधनी शिवार परिसरात अनोख्या पद्धतीने आंदोलन करण्यात आले.

शेतकरी चळवळीचे प्रा. पंढरी पाढे यांनी गळ्यात प्लास्टिकच्या रिकाम्या डबक्या गळ्यात अडकवून सरकारविरोधात घोषणाबाजी केली. "नरेंद्र द्या सिलेंडर" अशा स्वरूपातील घोषणांद्वारे त्यांनी गॅस मिळण्यात होत असलेल्या अडचणींकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. या प्रतीकात्मक आंदोलनातून सामान्य नागरिकांना वेळेत गॅस सिलेंडर मिळत नसल्याची समस्या अधोरेखित करण्यात आली. प्रा. पाढे यांनी जनमाध्यम प्रतिनिधी यांच्याशी संवाद साधून सांगितले की, अनेक ग्रामीण भागात नागरिकांना ४० ते ४५ दिवसांनंतर गॅस सिलेंडर मिळत असून, यामुळे दैनंदिन जीवनावर परिणाम होत आहे. विशेषतः महिलांना स्वयंपाकासाठी मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. ऑनलाईन नोंदणी करूनही वेळेत सिलेंडर मिळत नसल्याच्या तक्रारी वाढत असल्याचेही त्यांनी नमूद केले. या आंदोलनाचा उद्देश कोणत्याही व्यक्ती किंवा संस्थेवर टीका करण्यापेक्षा, नागरिकांच्या मूलभूत गरजांकडे प्रशासनाचे लक्ष वेधणे हा असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.दरम्यान, स्थानिक नागरिकांनीही गॅस पुरवठा सुरळीत करण्यासाठी प्रशासनाने ठोस पावले उचलावीत, वितरण व्यवस्थेत सुधारणा करावी आणि ग्रामीण भागात पुरेसा साठा उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी केली आहे. गॅस सिलेंडरचा प्रश्न हा दैनंदिन जीवनाशी निगडित असल्याने, यावर तातडीने उपाययोजना करणे गरजेचे असल्याची भावना नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

# चालबर्डी येथील रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

## तब्बल ५१ रक्तदात्यांनी केले रक्तदान

**जनमाध्यम प्रतिनिधी**



पांढरकवडा - अमर पाटील चालबर्डीकर व अभि बेले मित्रपरिवार तर्फे रविवार दि.०५ एप्रिल २०२६ रोजी सकाळी १० ते ०४ वाजेपर्यंत समाज मंदिर चालबर्डी येथे आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

उल्लेखनीय म्हणजे ग्रामीण भागातील चालबर्डी सारख्या छोट्याशा गावात झालेल्या या रक्तदान शिबिरात तब्बल ५१ रक्तदात्यांनी रक्तदान केले.जिवन ज्योती ब्लड बँक नागपूर ही ब्लड बँक थैलेसीमिया, शिकलसेल, अनेमिया,पेशंट ला फ्री रक्त पुरावठा करतात आणि पेशंट साठी सध्या रक्ताचा तुटवळा निर्माण झाला आहेत त्यामुळे त्यांना जीवन दान देण्यासाठी पांढरकवडा तालुक्यातील चालबर्डी येथे रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले,या रक्तदान शिबिराचे उद्घाटन सामाजिक कार्यकर्ते अमर पाटील चालबर्डीकर यांच्या हस्ते करण्यात आले त्यावेळीस अभि बेले,साईराम रंगनेनिवार,प्रेम तिरमनवार,रुतेश ध्यावरनेनीवार,अभिनव गोणेवार,अमित गोणेवार,गणेश माडपेल्लीवार,राहुल चंदावार,सचिन कायपेल्लीवार,शुध्दोधन मोडक,शंकर मग्गीडवार,विपीन कडलवार,प्रेमदिप भोंग सह आदी उपस्थित होते.या रक्तदान शिबिरातील रक्त संकलन जिवन ज्योती ब्लड बँक नागपुर येथील डॉ.यश हिंगले,श्रवण येलेकर,अरुण मोरांडे,सुप्रिया डोंगरे,भाविका गाते,धनश्री घुगुसकर,ईशा मॅडम,दिनेश रामटेके,रविंद्र साखरकर,प्रदीप शेंदरे,विवेक यादव यांनी केले.या रक्तदान शिबिरातील रक्तदात्यांना जीवन ज्योती ब्लड बँक नागपुर येथील ग्रुपच्यावतीने प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले,अमर पाटील (चालबर्डीकर) व अभि बेले मित्रपरिवार तर्फे सर्व सहभागी रक्त दात्यांसाठी चहा बिस्कीट,फळ व भोजन व्यवस्था आणी गिप्ट मध्ये (५ लिटर) पाणी साठवण्यासाठी चागल्या दर्जाचे प्लास्टिकचा कॅन देण्यात आले,रक्तदात्यांच्या उत्स्फूर्त सहभागाबद्दल जिवन ज्योती ब्लड बँक नागपुर येथील डॉ.यश हिंगले यांनी रक्तदात्यांचे आभार मानले.

# जुळ्या शहरात खाजगी भूकर मापकांचा सुळसुळाट

## मर्जीप्रमाणे मोजणीच्या नावावर पैसे वसुली

**अचलपूर/ वार्ताहर**

पोट हिस्सा ,हद्द कायम बिनशेती , गुंठेवारी,संयुक्त भूसंपादन मोजणी ,वनहक्क दावे मोजणी ,नगर भूमापन मोजणी गावठाण भूमापन मोजणी, सीमांकन आणि मालकी हक्कासाठी मोठ्या प्रमाणात भूमिअभिलेख कार्यालयात अर्ज येतात.एका मोजणी साठी दीड ते दोन महिन्याचा कालावधी लागतो.यामुळे अचलपूर - परतवाडा जुळ्या शहरात खाजगी भूकर मापकांचा सुळसुळाट मोठ्या प्रमाणात वाढला असून अनेक प्लॉट धारक बांधकाम साठी परस्पर खाजगी भूकर मापकांकाकडून मनमर्जी प्रमाणे फी देऊन सीमा आखणी,मोजणी करीत आहे. यामुळे आजुबाजूला असलेल्या प्लॉट धारकांना याची कोणतीही माहिती न होता त्यांच्या मालकीच्या हद्दीत मोजणी व सीमा आखणी चे प्रकार मोठ्या प्रमाणात समोर येत आहे.यामुळे वादविवादाचे प्रकार वाढत आहे.यावर स्थानिक तहसील कार्यालय,महसूल व भूमी अभिलेख कार्यालय अंकुश लावणार का ? असे अनेक प्रश्न निर्माण झाले आहे.



जुळ्या शहरात मोठ्या प्रमाणात प्लॉट ची विक्री होत आहे. त्या प्लॉट ची भूमिअभिलेख कार्यालयाकडून शासकीय मोजणी होणे आवश्यक आहे . अनेक प्लॉट मध्ये बांधकाम करताना भूमिअभिलेख कार्यालयात सर्व कागदपत्राची पूर्तता,कालावधी याबाबीपासून वाचण्याकरिता अनेक प्लॉटधारक खाजगी भूकर मापकाकडून प्लॉट ची मोजणी करून घेतात. मात्र याची कोणतीही कल्पना आजुबाजूला असलेल्या प्लॉट धारकांना नसते .दुसरीकडे शासकीय मोजणी मध्ये भूमिअभिलेख कार्यालयाकडून आजुबाजूला असलेल्या प्लॉट धारकांना नोटीस द्वारे मोजणीची तारीख, वेळ आणि सूचना दिली जाते .आणि काही आक्षेप असल्यास पुढील प्रक्रिया, दाद संबंधित व्यक्ती तक्रार दाखल करू शकतो .या उलट खाजगी भूकर मापकाकडून काही प्लॉट धारकांचा प्लॉटची मोजणी करताना दुसऱ्या चा प्लॉटमध्ये जागा ताब्यात असल्याचे सांगत लोखंडी रॉड चा साह्याने सीमा आखणी केल्याचे अनेक प्रकार समोर आले आहे. त्यानंतर ती जागा आमची असल्याचे सांगत अनेक खाजगी प्लॉट धारक बाजूला असलेल्या प्लॉट धारकांशी वादविवाद करीत आहे .यामुळे याची कोणतीही माहिती संबंधित विभागाकडे नसल्याने नागरिकांनी न्याय मागावा तरी कुठे ? हा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

> या संबंधीत नागरिकांची तक्रार असल्यास त्यांनी कार्यालयाशी संपर्क साधावा आणि पुढील कारवाई केली जाणार आहे.
>
> **बळवंत अरखराव,**
> उपविभागीय अधिकारी
> अचलपूर .

> खाजगी भूकर मापकाकडून केली जाणारी मोजणी ही शासकीय कामकाजात कोणताही पुरावा म्हणून ग्राह्य धरली जात नाही. यामुळे नागरिकांनी खाजगी प्लॉटची मोजणी करताना शासकीय मोजणी करावी .आणि शासकीय मोजणी तत्काळ व्हावी याला ही प्राधान्य देण्यात आले आहे .यामुळे खाजगी भूकर मापकाकडून होणारी नागरिकांची आर्थिक लुटीचे प्रकाराला आळा बसू शकेल .
>
> **सुदर्शन शहारे** ,तहसीलदार अचलपूर.

> अचलपूर भूमी अभिलेख कार्यालयाकडून कोणतीही खाजगी भूकर मापकाची नियुक्ती करण्यात आलेली नाही .असे प्रकार होत असेल तर नागरिकांनी तक्रार द्यावी.या प्रकरणाची सखोल चौकशी करून कायदेशीर कारवाई करू.
>
> **गजानन डोईफोडे**
> उपअधीक्षक भूमिअभिलेख
> कार्यालय ,अचलपूर.

### ६९ ग्रामपंचायतींमध्ये मंगळवारपासून

# पोटनिवडणुकीसाठी नामांकन प्रक्रिया

**अमरावती/ का.प्र.**

जिल्ह्यातील ६९ ग्रामपंचाय तींमधील रिक्त पदांसाठी होणाऱ्या पोटनिवडणुकीची रणधुमाळी आता रंगू लागली आहे. मंगळवार, ७ एप्रिलपासून नामांकन दाखल करण्याच्या प्रक्रियेला अधिकृत सुरुवात होणार आहे. ९८ सदस्यपदांसह ११ सरपंचपदांसाठी ही निवडणूक होत असल्याने गावपातळीवरील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे.

राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशावरून जिल्ह्यात ६८ ग्रामपंचातींमध्ये ११ थेट सरपंच, ९८ सदस्य अशा १०९ रिक्त जागांच्या पोटनिवडणुकीसाठी मतदारयादी कार्यक्रम लावण्यात आला होता. याची अंतिम मतदारयादी २४ फेब्रुवारीला प्रसिद्ध करण्यात आली. त्यामुळे आयोगाकडून निवडणूक कार्यक्रम लावला आहे. गेल्या दोन ते तीन वर्षांपासून विविध कारणांमुळे रखडलेल्या या निवडणुका अखेर जाहीर झाल्याने इच्छुक उमेदवार आणि त्यांच्या गावपुढाऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. गावागावांत बैठका, गाठीभेटी आणि राजकीय समीकरणांची जुळवाजुळव सुरू झाली आहे. प्रशासनाने जाहीर केलेल्या निवडणूक कार्यक्रमानुसार, ७ एप्रिल ते १३ एप्रिलदरम्यान (११ व १२ एप्रिल सुट्टी वगळता) सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत तहसील कार्यालयात नामांकन अर्ज स्वीकारले जाणार आहेत.



त्यानंतर १५ एप्रिल रोजी अर्जाची छाननी होणार असून, १७ एप्रिलपर्यंत उमेदवारांना अर्ज मा घेण्याची मुदत देण्यात आली आह त्यानंतर १७ एप्रिल रोजीच अंति उमेदवारांची यादी जाहीर करण्या येणार आहे. आवश्यक असल्या २८ एप्रिल रोजी मतदान प्रक्रिया प पडणार असून, मतदान सकाळी ७.३ ते सायंकाळी ५.३० या वेळेत होईल तर २९ एप्रिल रोजी मतमोजणी होऊ निकाल जाहीर केला जाणार आह या निवडणुकीमुळे ग्रामीण भागा पुन्हा एकदा राजकीय वातावर ढवळून निघाले असून, गावपुढाऱ्यां आपापल्या पातळीवर मोर्चेबांधणी सु केली आहे. अनेक ठिकाणी सरपं पदासाठी चुरशीच्या लढती होण्याच शक्यता वर्तवली जात आहे.

# ११३ हेक्टरवर शेतीला अवकाळीचा फटका

**अमरावती/ का.प्र.**

जिल्ह्यात वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाचा जोर कायम असून गुरुवार, शुक्रवारी देखील काही जिल्ह्याला अवकाळी पावसाने झोडपले. यामुळे पुन्हा ११३ हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले असून २१ घरांची पडझड झाली आहे.

जिल्ह्यात ३० मार्चपासून अवकाळी पावसाने सुरुवात केली. जिल्ह्यात दररोज काही भागांमध्ये विजेच्या कडकडाटासह अवकाळी पाऊस बरसत आहे. याचा फटका पिकांना देखील सहन करावा लागत आहे. २ व ३ मार्च रोजी झालेल्या अवकाळी पावसामुळे विविध ठिकाणी नुकसान झाल्याचा प्राथमिक अहवाल प्रशासनाने जाहीर केला आहे. या पावसामुळे काही ठिकाणी घरांचे तसेच शेतीचे नुकसान झाले असून नागरिकांना फटका बसला आहे. जिल्ह्यात एकूण २१ घरांचे नुकसान झाले आहे. यामध्ये धामणगाव रेल्वे तालुक्यात ३, चिखलदरा तालुक्यात १ तर वरुड तालुक्यात सर्वाधिक १७ घरे बाधित झाली आहेत. सुदैवाने या आपत्तीत कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, चिखलदरा तालुक्यात एका बैलाचा मृत्यू झाल्याची नोंद आहे. दरम्यान, पावसाचा मोठा फटका शेती क्षेत्रालाही बसला आहे.जिल्ह्यात एकूण ६ गावांमधील ११३ हेक्टर क्षेत्रातील पिकांचे नुकसान झाले आहे. धामणगाव रेल्वे येथे १२ हेक्टर, अंजनगाव सुर्जी येथे १३ हेक्टर, नांदगाव खंडेश्वर येथे ३ हेक्टर तर चांदूर रेल्वे तालुक्यात सर्वाधिक ८५ हेक्टर क्षेत्र बाधित झाले आहे.

# यंदा ५६ सिंचन प्रकल्पांत ५० टक्यांच्यावर जलसाठा

**अमरावती/ का.प्र.**

मागीलवर्षी झालेल्या समाधानकारक पावसामुळे अप्पर वर्धासह सर्वच सिंचन प्रकल्प ओव्हरफ्लो झाले होते.त्यामुळे उन्हाळ्यात देखील जिल्ह्यातील ५६ सिंचन प्रकल्पांत - ५० टक्यांच्यावर जलसाठा शिल्लक आहे. मागील वर्षीच्या - तूलनेत यंदाच्या जलसाठा ३ टक्यांनी वाढला आहे.

अलीकडे अवकाळी पावसाचे वातावरण असल्याने तापमान - बऱ्यापैकी घटले आहे. त्यामुळे अप्पर वर्धा धरणासह इतर प्रकल्पातील पाणी पातळीत बाष्पीभवनामुळे वेगही मंदावला आहे. परंतु आगामी काळात तापमानात वाढ होण्याची शक्यता आहे. जलसाठ्यातील साठा बघता सद्यातरी चिंतेची बाब नाही. गतवर्षी जिल्ह्यात झालेल्या संततधार तसेच प्रकल्प क्षेत्रातील पावसामुळे १ मोठा प्रकल्प, ७मध्यम आणि ४८ लघु अशा ५६ प्रकल्पातील जलसाठ्यात वाढ झाली. तसेच यातील बरेच प्रकल्प ओव्हरफ्लोही झाले होते. मात्र, यंदा फेब्रुवारी पासूनच उन्हाळ्याची तीव्रता वाढली. बाष्पीभवनामुळे या ५६ प्रकल्पांचा जलसाठा कमी होत गेला. या सर्व प्रकल्पांमध्ये आजघडीला ५१.९४ टक्केच जलसाठा आहे. २०२५ या सर्व प्रकल्पाचा आजच्या दिवशी ४८.९९



टक्के इतका जलसाठा होता. मागील वर्षीच्या तुलनेत यंदा तीन टक्यांनी अधिक जलसाठासिंचन प्रकल्पांमध्ये शिल्लक आहे. जिल्ह्यातील सर्वात मोठे असलेल्या अप्पर वर्धा धरणाचा पाणीसाठा हा ५३.३४ टक्के आहे. तसेच ४८ लघु प्रकल्पात सद्यस्थितीत ५२.३५ टक्के जलसाठा शिल्लक राहिला आहे. त्यामुळे सद्यातरी पाण्याची कमतरता भासणार नसल्याचे दिसून येत आहे.

# शहरात तीन महिन्यांत जीवघेण्या हल्ल्यांच्या १३ घटनांची नोंद

**अमरावती/ का.प्र.**

२०२६ च्या पहिल्या तीन महिन्यांत, अमरावती शहर पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत जीवघेण्या हल्ल्यांच्या १३ घटना घडल्या. या घटनांबाबत प्राप्त झालेल्या तक्रारींच्या आधारे, संबंधित पोलीस ठाण्यांमध्ये गुन्हे दाखल करण्यात आले. येथे लक्षात घेण्यासारखी एक महत्त्वाची बाब म्हणजे, २०२५ च्या पहिल्या तिमाहीत जीवघेण्या हल्ल्यांच्या ८ घटनांची नोंद झाली होती; तर या वर्षी अशा घटनांची संख्या १३ वर पोहोचली आहे. परिणामी, असे म्हणता येईल की, मागील वर्षाच्या तुलनेत या वर्षी जीवघेण्या हल्ल्यांच्या घटनांमध्ये साधारणपणे दीड पटीने वाढ झाली आहे. तथापि, याच कालावधीत हल्ला, लुटमार, चोरी आणि वाहन चोरीच्या घटनांमध्ये काही प्रमाणात घट दिसून आली आहे. याउलट, रस्ते अपघातांची संख्या मात्र मागील वर्षाच्या तुलनेत या वर्षी किंचित अधिक होती.

या संदर्भात, शहर पोलीस आयुक्तालयाने दिलेल्या माहितीनुसार,




जानेवारी ते मार्च २०२५ या कालावधीत जीवघेण्या हल्ल्यांचे ८ गुन्हे, ८९ रस्ते अपघात, लुटमारीचे ६७ गुन्हे, ११९ वाहन चोऱ्या, १५३ हल्ल्याच्या घटना, फसवणूक/बनावटगिरीचे ३७ गुन्हे, ४ दरोडे (शस्त्रधारी लुटमार) आणि विनयभंगाचे ५० गुन्हे दाखल करण्यात आले होते. याच्या अगदी उलट, जानेवारी ते मार्च २०२६ या कालावधीत जीवघेण्या हल्ल्यांचे १३ गुन्हे, १०४ रस्ते अपघात, लुटमारीचे ५२ गुन्हे, ७६ वाहन चोऱ्या, १२९ हल्ल्याच्या घटना, फसवणूक/बनावटगिरीचे ३१ गुन्हे, दरोड्याचा एकही गुन्हा नाही (शून्य दरोडे) आणि विनयभंगाचे ४८ गुन्हे दाखल करण्यात आले. या आकडेवारीच्या आधारे असा निष्कर्ष काढता येतो की, अमरावती शहरातील गुन्हेगारी घटनांवर लक्षणीय प्रमाणात नियंत्रण ठेवण्यात शहर पोलीस आयुक्तालयाला यश मिळाले आहे. ङ आकडेवारी काय सांगते

# मेळघाटातील किशोर बेठेकरची चिलाटीतून थेट ग्रेट ब्रिटन झेप!

## ५५ लाखांची शिष्यवृत्ती; आव्हानावर मात करत मिळविले यश

**अमरावती/ का.प्र.**

मेळघाटातील चिखलदरा तालुक्यातील चिलाटी हे एक अतिदुर्गम भागातील गाव. येथील एक विद्यार्थी खडतर परिस्थितीत शिक्षणाची वाट शोधतो. घरची परिस्थिती गरिबीची. गुरे चारून, शेतातील कामे करून तो आपले शिक्षण पूर्ण करतो. गावात इंटरनेटची सुविधा नाही, मोबाईल नेटवर्कही बेताचेच. घरात कोरकू भाषा, शाळेत मराठी आणि बाहेर व्यवहाराची भाषा हिंदी, अशा आव्हानांचा सामना करत तो शिक्षणाचा प्रवास सुरू ठेवतो. किशोर बेठेकर असे या विद्यार्थ्यांचे नाव. पदवीपर्यंतचे उच्च शिक्षण पूर्ण केल्यानंतर किशोरला ब्रिटनमधील प्रतिष्ठित विद्यापीठात पदव्युत्तर शिक्षणासाठी प्रवेश मिळाला असून ५५ लाख रुपयांची शिष्यवृत्ती मिळाली आहे.

चिलाटी हे महाराष्ट्र आणि मध्यप्रदेश सीमेवरील ४०० लोकसंख्येचे गाव आहे. गावात वीज, रस्ते आणि पिण्याचा प्रश्न कायमचा. किशोर बेठेकरचे वडील लखाजी यांच्याकडे ३ एकर शेती. पण शेतीतून उदरनिर्वाह होत नसल्याने कामासाठी त्यांनाही इतर आदिवासी लोकांप्रमाणेच स्थलांतर करावे लागायचे. किशोरचे प्राथमिक शिक्षण हे जिल्हा परिषदेच्या शाळेत झाले. दहावीपर्यंतचे शिक्षण त्याने मेळघाटातील आश्रमशाळेत






राहून पूर्ण केले. बारावीनंतर पुढे काय, असा प्रश्न त्याच्यासमोर उभा झाला, तेव्हा राजू केंद्रे यांनी किशोरला मार्गदर्शन केले आणि त्याने 'बीएसडब्ल्यू'ला प्रवेश घेतला.

किशोर शिक्षणासोबत गुरे चारण्याचे कामही करायचा. शेतात आई-वडिलांना मदतही करायचा. शाळेत जाण्यासाठी कच्चा रस्ता, पायीच चिखल तुडवत जावे लागत होते. पावसाळ्यात तर पुरामुळे गावाचा संर्पकच तुटतो. त्यामुळे शिक्षणात खंड पडत होता. गावात इंटरनेटची सुविधा नाही, मोबाईल नेटवर्कही कमी. विजेचा लंपडाव. अशा प्रतिकूल परिस्थितीत किशोर याने शिक्षण पूर्ण करण्याची जिद्द कायम ठेवली.

किशोरने २०२०-२२ या कालावधीत मुंबई येथील टाटा सामाजिक विज्ञान संस्थेतून सामाजिक कार्य या विषयात पदवी घेतली. आता त्याला ब्रिटनच्या ब्रिस्टल विद्यापीठात पदव्युत्तर शिक्षणासाठी प्रवेश मिळाला आहे.

परदेश शिक्षण शिष्यवृत्तीमुळे त्याचा उच्च शिक्षणाचा मार्ग सुकर झाला आहे. शिक्षण शुल्कासह विमान प्रवासाचा खर्च, निवास खर्च आणि इतर शैक्षणिक खर्च शासन उचलणार आहे. आदिवासी विकास आयुक्तालयाने किशोरला उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती मंजूर केली आहे. उच्च शिक्षणासाठी परदेशात जाणारा तो आपल्या गावातील आणि परिसरातील पहिलाच विद्यार्थी ठरला आहे. त्याचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे.

# संक्षिप्त

## सूर्यफूल तेलाच्या उत्पादनात घट होण्याची शक्यता

**अमरावती-** भारतात सूर्यफूल तेलाच्या उत्पादनात घट होण्याबाबतच्या चिंता अधिकच गडद झाल्या आहेत. मध्य आशियामध्ये सुरू असलेल्या संघर्षामुळे, पुरवठा साखळीत निर्माण झालेल्या व्यत्ययांमुळे नवीन आर्थिक वर्षात उत्पादनावर प्रतिकूल परिणाम होईल, अशी भीती व्यक्त केली जात आहे. तथापि, एका अहवालानुसार, तेलाचे दर मात्र स्थिर राहण्याची अपेक्षा आहे.एका वृत्तसंस्थेच्या अहवालानुसार, चालू आर्थिक वर्षात सूर्यफूल तेलाच्या उत्पादनात १० टक्क्यांपर्यंत घट होण्याची शक्यता आहे. यामागे प्रामुख्याने दोन कारणे दिली जात आहेत: पहिले म्हणजे मध्य आशियातील संघर्ष आणि दुसरे म्हणजे, वाहतुकीचा खर्च सातत्याने वाढत असल्यामुळे तेलाच्या किमतीत झालेली वाढ. याव्यतिरिक्त, ग्राहकांसाठी पर्यायी तेले म्हणून तांदळाचा कोंडा आणि सोयाबीन तेल उपलब्ध असल्याने, त्याचाही परिणाम शुद्ध केलेल्या सूर्यफूल तेलाच्याउत्पादनावर होण्याची शक्यता आहे.



## प्रा. कुणाल झोटींग यांना पीएच.डी.

**अमरावती-** दारापूर येथील रामकृष्ण कनिष्ठ महाविद्यालयातील प्रा. कुणाल अनिलराव झोटींग यांना संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाकडून भूगोल विषयात पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली. त्यांच्या या यशामुळे शैक्षणिक क्षेत्रात तसेच परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.प्रा. झोटींग यांनी 'पश्चिम विदर्भाच्या अडाण नदी खोऱ्यातील आठवडी बाजार केंद्रांच्या जाळ्यांचे भौगोलिक अध्ययन' या विषयावर संशोधन प्रबंध सादर केला.त्यांनी हे संशोधन कार्य कला व विज्ञान महाविद्यालय, कुऱ्हा येथील भूगोल संशोधन केंद्रामार्फत पूर्ण केले. त्यांच्या संशोधनाला शेंदुरजनाघाट येथील डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी कला महाविद्यालयाचे प्रा. डॉ. तिलकचंद जी. धोटे यांचे मार्गदर्शन लाभले.यशाबद्दल प्रा. झोटींग यांचे विविध क्षेत्रांतून अभिनंदन होत आहे. त्यांचे मार्गदर्शक प्रा. डॉ. तिलकचंद धोटे, प्रा. डॉ. सुनिल आखरे, प्रा. डॉ. नितीन मुंढे, प्रा. डॉ. गेडाम, प्रा. डॉ. ओमप्रकाश मुंदे, प्रा. डॉ. विजय टोम्पे, प्रा. डॉ. अभिजीत दोड, प्राचार्य डॉ. अभ्यंकर, प्रा. डॉ. किशोर ताकसांडे यांनी त्यांचे विशेष कौतुक केले.त्यांच्या यशाबद्दल वडील अनिल झोटींग, आई अलका झोटींग, पत्नी मोनाली झोटींग, मुलगा राजवीर झोटींग यांसह कुटुंबीय व मित्रपरिवाराने अभिनंदन केले.



## तक्षशिला महाविद्यालयात आज पदवी वितरण

**अमरावती-** श्री दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्ट संचलित तक्षशिला महाविद्यालय, दारापूर तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर तक्षशिला महाविद्यालय व तक्षशिला महाविद्यालय, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने शैक्षणिक वर्ष २०२४–२५ चा पदवी वितरण समारंभ सोमवार, ६ एप्रिल रोजी सकाळी १०.०० वाजता आयोजित करण्यात आला आहे.हा समारंभ अजिंठा सेमिनार हॉल, तक्षशिला महाविद्यालय, अमरावती येथे संपन्न होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी किर्ती गवई अर्जुन उपस्थित राहणार असून, दीक्षांत अभिभाषक म्हणून कैलास विजय चव्हाण यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे सचिव डॉ. कमलाकर पायस व डॉ. सचिन पंडित यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे. यासोबतच प्रा. पी.आर.एस. राव हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.या समारंभात पदवीधर विद्यार्थ्यांना अधिकृतरित्या पदव्या प्रदान करण्यात येणार असून, हा क्षण त्यांच्या शैक्षणिक जीवनातील अत्यंत महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे.

## विद्यार्थ्यांने रेखाटले वारे गुरुजींचे हुबेहूब छायाचित्र

**रिद्धपूर-** मोर्शी तालुक्यातील श्रीक्षेत्र रिद्धपूर राजमठ येथे वारे गुरुजींनी सदिच्छा भेट दिली.यावेळी चंफा.चॅरिटेबल ट्रस्ट संचालीत ई.एस.हायस्कुल वर्ग ८ चा विद्यार्थी अंश भागवत वानखडे याने स्वतः रेखाटलेले वारे गुरुजींचे छायाचित्र त्यांना भेट दिले.यावेळी अंश चे मार्गदर्शक कलाशिक्षक एम. पी.जाधव सुद्धा उपस्थित होते. वारे गुरुजी हे हुबेहूब चित्र पाहून भारावून गेले व त्यांनी अंश चे कौतुक करून त्याला पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.अंश चे मार्गदर्शक कलाशिक्षक एम.पी.जाधव यांना सुद्धा नुकताच आदर्श कलाशिक्षक पुरस्कार मिळाला त्याबद्दल वारे गुरुजींनी जाधव यांचे अभिनंदन केले आणि अंश सारख्या विद्यार्थ्यांच्या कलागुणांना आपल्या सारख्या शिक्षकांनी प्रोत्साहन दिले तर त्यांचे उज्वल भविष्य घडल्याशिवाय राहणार नाही असे उदगार त्यांनी यावेळी काढले.हेच ते दत्तात्रय वारे गुरुजी ज्यांनी वाबळेवाडी सारखी आंतरराष्ट्रीय दर्जाची शाळा उभी केली.ज्यांच्या कार्यामुळे सरकारी शाळेला जागतिक दर्जा मिळाला.महाराष्ट्रातील पुणे जिल्ह्यातील जालिंदर नगर येथील जिल्हा परिषदेचे शाळा जगातील 'वर्ल्ड बेस्ट स्कुल' म्हणून गौरवांकीत झाली.यावेळी गावातील पंचक्रोशीतील नागरीक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## मंदा अडसोड यांचा सन्मान

**नांदगाव खंडेश्वर-** स्थानिक नांदगाव हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाच्या वतीने मंदा अडसोड शिक्षकेतर कर्मचारी यांना निरोप देण्यात आला. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष, शाळेचे प्राचार्य म्हणून प्रदीप ठाकरे प्रमुख अतिथी म्हणून व उपमुख्याध्यापिका भारती वाटाणे, सुनिता मोहोड, कृष्णा सरीशे उपस्थित होते. सर्वप्रथम शिक्षण महर्षी भाऊसाहेब देशमुख यांच्या प्रतिमेला हारार्पण व दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी जगदीश गोवर्धन, भारती बडे यांनी मंदा अडसोड यांच्या विषयी व त्यांच्या कार्याविषयी मनोगत व्यक्त केले. विद्यालयाच्या वतीने त्यांना भेटवस्तू सन्मान चिन्ह साडीचोडी देऊन त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. संचालन नमिता कराळे तर आभार स्वाती वाटाणे यांनी केले.



**संयुक्त राष्ट्र संघाने मार्च २०२६ मध्ये 'वर्ल्ड हॅपिनेस इंडेक्स रिपोर्ट' अर्थात जागतिक आनंद निर्देशक अहवाल २०२६ जाहीर केला आहे. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या वतीने २०१३ पासून जगभरात जागतिक आनंद दिन म्हणून साजरा केला जात असतो. त्या पार्श्वभूमीवर दरवर्षी अभ्यासपूर्वक हा अहवाल सादर केली जातो.**

# जीबी संपवण्यालाच बिझी म्हणत राहणे कितपत शहाणपणाचे?

जागतिक आनंद दिन साजरा करण्यामागे तसेच असा जागतिक अहवाल तयार करण्यामागे आनंद हा माणसाचा मूलभूत हक्क आहे, मानवी कल्याणासाठी तो आवश्यक आहे हे गृहीततत्त्व आहे. मानवी जीवनामध्ये आनंदाचे महत्त्व पटवून देणे आणि वाढवणे, आनंदाच्या निर्मितीसाठी जागतिक पातळीवर शांततापूर्ण सहजीवनाच्या भूमिकेला प्रोत्साहन देणे, आणि जगातील अब्जावधी लोकांना कल्याणाचा मार्ग दाखवणे हा यामागील हेतू आहे.याअहवालाने २०२६ साठी मध्यवर्ती संकल्पना 'काळजी घेणे आणि वाटून घेणे' अशी घेतली आहे.

२०२६ चा अहवाल अर्थातच २०२५ या वर्षातील माहितीच्या आधारे तयार केला गेला आहे. या अहवालात १४७ देशांच्या यादीत भारताचे स्थान ११६ वे आहे. गतवर्षी ते ११८ वे होते. खरेतर आपण जनतेच्या आनंदात भर घालण्यासाठी कोणतेही प्रयत्न न करताही आपली दोन अंकांनी प्रगती कशी झाली, याचा विचार करण्यासाठी केंद्र सरकारने समिती नेमली पाहिजे. या यादीत पाकिस्तान आपल्यापुढे १२ अंकांनी म्हणजे १०४ या स्थानावर आहे. तर नेपाळ ९९ व्या स्थानी आहे. या निर्देशांक अहवालानुसार सलग नवव्या वर्षी फिनलँड जगातील सर्वात आनंदी देश ठरला आहे, तर पहिल्या पाचमध्ये फिनलँड पाठोपाठ आइसलँड, डेन्मार्क, कोस्टारिका आणि स्वीडन हे देश आहेत. तर अफगाणिस्तान, सिएरालिओन, मलावी, झिम्बाब्वे, बोत्सवाना हे तळातील पाच देश आहेत.

आनंद या शब्दाबरोबरच समाधान, शांतता, प्रसन्नता या भावना येतात. आनंद केवळ बाह्यरंगावर अवलंबून नसतो तर तो अंतरंगी असण्याला महत्त्व असते. जीवनाची अर्थपूर्णता, जीवनाचे मूल्य याची जाण आनंदासाठी आवश्यक असते. जागतिक आनंद निर्देशांक ठरवत असताना त्या देशाचे दरडोई उत्पन्न (जीडीपी), कौटुंबिक व सामाजिक परिस्थिती, सरासरी आयुर्मान, नागरिक म्हणून उपभोगता येणारे स्वातंत्र्य, सामाजिक औदार्य, भ्रष्टाचाराबद्दलचे लोकमत असे विविध घटक विचारात घेतले जातात. केवळ आर्थिक वाढ अथवा अर्थव्यवस्थेचा फुगवटा नागरिकांच्या मनात आनंद निर्माण करत नसतो. तर त्यामध्ये राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक समन्यायी परिस्थितीही महत्त्वाची असते. आणि सुशासनाचेही महत्त्व असते. असे हा अहवाल दाखवून देतो.

या निमित्ताने आपण या अहवालाकडे अधिक गांभीर्याने पाहिले पाहिजे. भारतीय समाजजीवनात वेगाने बदल होत आहेत. सामाजिक आणि आर्थिक जीवनातील स्तरात्मकता कमालीच्या वेगाने व विषमतेने वाढत आहे. कल्याणकारी व्यवस्था मोडकळीस येत आहे. महागाईपासून बेरोजगारीपर्यंत अनेक समस्यांत वाढ होत आहे. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिस्थितीत आपण देश म्हणून काही धोरणे बदलत आहोत. भारत जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश आहे, पण जगामध्ये सर्वाधिक हातांना काम देणारा देश आपला आहे का, अशा अनेक कारणांमुळे आपला आनंद निर्देशांक इतका खालावतो आहे का, याचा विचार केला पाहिजे. खरा आनंद केवळ स्वतः खिखी करण्यात नसतो. तो इतरांच्या चेहऱ्यावर स्मितरेषा उमटावी असा वर्तन व्यवहार करण्यात असतो.

२०२६ च्या अहवालाचे जे काही निष्कर्ष आहेत. त्यापैकी सर्वात महत्त्वाचा निष्कर्ष म्हणजे समाजमाध्यमांच्या अतिवापरामुळे अनेक देशांतील लोकांचा आनंद झाकोळला आहे आणि मानसिकस्थिती बिघडली आहे हा आहे. जगातील सर्वाधिक लोकसंख्या भारताची आहे त्यामुळे साहजिकच समाजमाध्यमांच्या वापरातही आपण



अग्रभागी आहोत. म्हणूनच आपण व्यक्ती समाज आणि राष्ट्र म्हणून या माध्यमाच्या अतिवापराकडे गांभीर्याने पाहिले पाहिजे असे वाटते.

कारण आधुनिकीकरणाच्या नव्या संकल्पनेत कोट्यवधी लोकांचा 'स्क्रीन टाईम' मोठ्या प्रमाणात वाढत चाललेला आहे. तसेच सतत व्यग्र असल्याच्या, कामाचा ताण असल्याच्या, दमून जात असल्याच्या तक्रारींमध्ये वाढ होत आहे. मात्र या तक्रारींना आपण स्वतः जबाबदार किती? याचा विचार करण्याची गरज निर्माण झाली आहे. 'डेटा दीड जीबी आणि सारा गाव बीझी' ही नवी म्हण आता समाजजीवनात रूढ झाली आहे. परिणामी इंटरनेटचा अतिवापर होत आहे. तो कामापेक्षा बिनकामाचा जास्त आहे. मोबाइलवर गेम खेळणे, रील्स पाहणे, मालिका पाहणे यामध्ये दिवसातील तासनतास वाया घालवले जात आहेत. यात अबाल-वृद्ध -स्त्री-पुरुष अशा साऱ्यांचा समावेश आहे.

आपल्या कुटुंबातील माणसांकडे दुर्लक्ष करून मोबाइलवरील आभासी जीवनात स्वतःला व्यग्र ठेवणे हे गंभीर मानसिक अनारोग्याचे लक्षण आहे. आपल्या स्टेटसचा विचार करण्याऐवजी दुसऱ्याचे स्टेटस पाहण्यात अनावश्यक वेळ खर्च केला जात आहे. स्वतःकडे पाहण्याऐवजी दुसऱ्याच्या आयुष्यात डोकावणे हा प्रकार वाढत आहे.

मोबाइलच्या अतिवापरामुळे एकाकीपणा आणि चिडचिड यामध्ये कमालीची वाढ होत आहे. डोळ्यांसह आरोग्याच्या अनेक तक्रारी निर्माण होत आहेत. व्यायामासाठी वेळ नाही म्हणणारे अनेकजण दिवसातील पाच-सहा तास मोबाइलमध्ये सहजपणे मग्न असतात हे वास्तव आहे. जीबी संपवण्यालाच बिझी म्हणत राहणे शहाणपणाचे नाही. तर ते आपणच आपल्या पायावर कुऱ्हाड मारून घेणे आहे.

कोट्यवधी मानवी तास कौटुंबिक-सामाजिक संवादाऐवजी, श्रमाऐवजी, संपत्तीनिर्मितीऐवजी एकाकीपणा ओढवून घेण्यात आणि माणूस म्हणून खिळखिळे होण्यात खर्च होत असतील तर हे अतिशय उग्र स्वरूपाचे राष्ट्रीय संकट आहे. या साऱ्यातून मोठे प्रश्न निर्माण होत आहेत असे तज्ज्ञ सांगत आहेत. मोबाइलचे व्यसन हा एक वाढता गंभीर आजार होऊन घराघरात शिरले आहे. मानसोपचार तज्ज्ञांकडे येणाऱ्या रुग्णांत स्क्रीनवर अधिक वेळ घालवणाऱ्यांचे प्रमाण अतिशय वाढलेले आहे. तेव्हा प्रत्येकाने या गोष्टीचा अधिक गांभीर्याने विचार केला पाहिजे. दिवसभरातील आपला वेळ नेमका कुठे खर्च होतो? त्यातून निष्पन्न काय होते? आपण खरंच अतिश्रमाने त्रस्त आहोत का? आपण खरे श्रम किती? आणि श्रमपरिहार म्हणून विरंगुळा मिळवण्यासाठी मोबाइलवर घालवलेले तास किती याचा विचार करण्याची गरज आहे. कारण हा धोका व्यक्ती, कुटुंब आणि समाजाला टप्प्याटप्प्याने ग्रासत चालला आहे. जागतिक आनंद अहवाल जेव्हा समाजमाध्यमांमुळे आपण आपला आनंद गमावत आहोत असे सांगतो त्यावेळी त्याकडे गांभीर्याने पाहिले पाहिजे.

**प्रसाद माधव कुलकर्णी**

# फास्टफुडमुळे वाढताहेत कर्करोगाचा धोका

सध्या मुलांमध्ये स्टोन आणि कॅन्सर होण्याचे प्रमाण वाढले आहे. कॅन्सर सारख्या जीवघेण्या आणि असाध्य आजाराचे प्रमाण मुलांमध्ये वाढण्याचे कारण शोधण्यासाठी संशोधकांनी संशोधन केले. या संशोधनाचा अहवाल बमेडमध्ये प्रकाशित करण्यात आला. या अहवालात मुलांमध्ये स्टोन आणि कॅन्सरचे प्रमाण वाढण्यास फास्टफुडला जबाबदार धरण्यात आले आहे. संशोधकांनी असा दावा केला आहे की फास्टफुडमुळेच मुलांमध्ये स्टोन आणि कॅन्सरचे प्रमाण वाढले आहे. हा अहवाल मुलांसह पालकांच्याही डोळ्यात अंजन घालणारा आहे. आहारातील घटकांवर आरोग्य अवलंबून असते. रोजचा आहार चौरस असावा म्हणजे त्यात शरीराला आवश्यक असणाऱ्या सर्व पदार्थांचा समावेश असावा असे आहार शास्त्र सांगते. पण धावपळीच्या सध्याच्या काळात लोकांना स्वयंपाकासाठी आणि जेवणासाठी वेळ नाही मग आधार घेतला जातो तो फास्टफुडचा. अगदी लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वच जण फास्टफुड आवडीने खातात. विशेतः शाळकरी मुलांना तर फस्टफुड म्हणजे पर्वणीच वाटते. घरी तयार केलेली भाजी पोळी खाताना



किरकिर करणारे मुले फास्टफुड मात्र मिटक्या मारत खातात त्यामुळेच झटपट तयार होणारे आणि जिभेला हवेहवेसे वाटणारे हे पदार्थ सध्या भरपूर खपतात. जिभेला हवेहवेसे वाटणारे हे पदार्थ प्रकृतीला मात्र चांगले नसतात.

झटपट तयार होणाऱ्या या फास्टफुडमध्ये साखर आणि मीठ यांचे प्रमाण खूप असते शिवाय ते भरपूर तळलेले देखील असतात. अतीप्रक्रिया केलेल्या या पदार्थात कोणतेही पौष्टिक घटक नसतात त्यामुळे या पदार्थांपासून दूर राहावे असा सल्ला डॉक्टर आणि आहार तज्ज्ञ देत असतात तरी लोक त्यांचे ऐकत नाही. काही वर्षांपूर्वी एका फास्टफुड बनवणाऱ्या जगप्रसिद्ध कंपनीने हे मान्य केले होते की ही कंपनी तयार करीत असलेल्या साठ टक्के पदार्थात आणि शितपेयांमध्ये शरीराला पौष्टिक असे काही नाही. या कंपनीचे नुडल्स आणि कॉफी हे दोन पदार्थ जगप्रसिद्ध आहेत. शिवाय चॉकलेट, केक, पास्ता, केचप, वेफर्स, कुरकुरे यासारखे विविध पदार्थ ही कंपनी बनवते. विशेष म्हणजे हे पदार्थ लहान मुलांमध्ये प्रचंड लोकप्रिय आहेत. पालकही मुलंच्या हट्टापायी हे पदार्थ मुलांना देतात. मुले हे पदार्थ मिटक्या मारत खातात. कंपनीने या पदार्थात कोणतेही पौष्टिक घटक नसल्याचे मान्य करूनही पालक फास्टफुड चा हट्ट सोडत नाही. काही पदार्थात तर शरीरास हानिकारक घटक असतात तज्ज्ञांनी ते संशोधनाअंती सिद्ध करून दाखवले आहे. ज्या फास्टफुड पदार्थात शरीरास हानिकारक घटक असल्याचे सिद्ध झाले ते घटक कंपनीने काढून टाकल्याचे मान्य केले मात्र अजूनही असे अनेक पदार्थ आहेत की ज्यात शरीरास हानिकारक असणारे घटक आहेत व ते पदार्थ बाजारात सर्रास विकले जात आहेत.

काही जगप्रसिद्ध कंपन्यांवर असे आरोप आहेत की त्यांच्या पदर्थात शरीरास हानिकारक घटक आहेत तरीही या कंपन्यांच्या फास्टफुड पदार्थांची लोकप्रियता कमी झाली नाही उलट वाढतच चालली आहे. फास्टफुडमुळे मुलांना अनेक आजरांना सामोरे जावे लागत आहे. अतिप्रमाणात फास्टफुड खाण्यात आल्यास हृदयरोग, मधुमेह आणि स्थूलतेचा धोका आहे. अतिप्रमाणात फास्टफुड खाणाऱ्यांना कर्करोगासारखा असाध्य आजार होऊ शकतो हे आता संशोधनानेच सिद्ध झाले आहे त्यामुळे आतातरी पालकांनी मुलांना फास्टफुड पासून दूर ठेवायला हवे. फास्टफुड ऐवजी दूध, पोळी, पराठे, चटणी, कडधान्यांच्या उसळी, पोहे, उपमा यासारखे पौष्टिक पदार्थ पालकांनी मुलांना खायला द्यावेत. मुलांना चविष्ट पदार्थ देण्याऐवजी पौष्टिक पदार्थ खायला देणे ही पालकांची जबाबदारी आहे.

**श्याम ठाणेदार**

# औषधनिर्मिती क्षेत्रात क्रांतीची चाहूल

डॅनिश औषध कंपनी 'नोवो नॉर्डिस्क'च्या 'सेमाग्लुटाईड' या जगप्रसिद्ध रेणूचे (मॉलिक्युल) पेटंट नुकतेच संपुष्टात आले आहे. ओझेम्पिक, वेगोव्ही आणि रिबेल्सस यांसारख्या अत्यंत लोकप्रिय ब्रँडस्चा आधार असलेल्या या औषधावरील मक्तेदारी संपल्यामुळे आता भारतीय औषध कंपन्यांसाठी या क्षेत्राची दारे सताड उघडी झाली आहेत. यामुळे सन फार्मा, डॉ. रेड्डीज, झायडस, ल्युपिन, नॅटको आणि मॅनकाईंड यांसारख्या दिग्गज भारतीय कंपन्यांसाठी या औषधाची जेनेरिक आवृत्ती बाजारात आणण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. परिणामी, या महागड्या औषधांच्या किमतीत साधारणत: ५० ते ७० टक्क्यांची मोठी घट होण्याची शक्यता आहे. सध्याचा विचार करता या औषधांचा मासिक खर्च ३,००० ते ५,००० रुपयांच्या घरात येऊ शकतो. आरोग्यसेवेचा खर्च प्रामुख्याने खिशातून केला जाणाऱ्या भारतासारख्या देशातील लाखो लोकांसाठी ही बाब दिलासादायक ठरणार आहे.



पेटंट संपुष्टात येणे ही औषधनिर्मिती आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील एक महत्त्वाची कायदेशीर प्रक्रिया आहे. याचा अर्थ एखाद्या विशिष्ट शोधावर किंवा उत्पादनावर असलेल्या कंपनीची एकहाती सत्ता आता संपली आहे. जेव्हा एखादी कंपनी (उदा. नोवो नॉर्डिस्क) अनेक वर्षांचे संशोधन आणि अब्जावधी रुपये खर्च करून एखादे नवीन औषध (उदा. सेमाग्लुटाइड) शोधते, तेव्हा सरकार त्यांना २० वर्षांसाठी 'पेटंट' देते. या काळात इतर कोणालाही त्या औषधाची नक्कल किंवा विक्री करता येत नाही. पेटंट संपल्याच्या दुसऱ्याच क्षणापासून इतर कंपन्या त्याच मूळ मॉलीक्युलचा वापर करून स्वतःची औषधे तयार करू शकतात. याला 'जेनेरिक' औषधे म्हणतात. ही औषधे मूळ औषधाइतकीच प्रभावी असतात; पण त्यांच्या निर्मितीचा खर्च कमी असतो.पेटंट असेपर्यंत संबंधित कंपनी आपल्या मर्जीनुसार किंमत ठरवू शकते; मात्र पेटंट संपल्यावर बाजारात स्पर्धा निर्माण होते. अनेक कंपन्या एकाच वेळी ते औषध विकू लागल्यामुळे त्यांच्या किमतीत ५० ते ८० टक्क्यांपर्यंत घट होऊ शकते. यामुळे सामान्य रुग्णांना महागडी औषधे स्वस्त दरात उपलब्ध होतात.

आर्थिक पाहणी अहवाल २०२५-२६ मध्ये एक धोक्याची घंटा वाजवण्यात आली आहे. भारताचा आजारपणाचा भार आता संसर्गजन्य रोगांकडून असंसर्गजन्य रोगांकडे (एनसीडी) वेगाने सरकला आहे. लठ्ठपणा हा या सर्व आजारांचे मूळ आहे. लठ्ठपणामुळे होणाऱ्या व्याधींवरील उपचारांचा खर्च भारताच्या एकूण सकल देशांतर्गत उत्पादनाच्या (जीडीपी) सुमारे १ टक्क्यांहून अधिक झाला आहे. अशा स्थितीत वेळीच उपाययोजना केल्या नाहीत, तर हा खर्च आगामी दशकांत कित्येक पटीने वाढण्याची भीती आहे. लठ्ठपणा आता केवळ शहरांपुरता मर्यादित राहिलेला नाही, तर तो निमशहरी आणि ग्रामीण भागातही पाय पसरत आहे. बदलती जीवनशैली, अतिप्रक्रिया केलेल्या अन्नाचे वाढते सेवन आणि शारीरिक श्रमाचा अभाव यामुळे भारताचे चयापचय आरोग्य धोक्यात आले आहे. अशा स्थितीत सेमाग्लुटाईडसारख्या औषधांचा वापर वाढताना दिसत आहे.

भारताचे औषध वितरण जाळे हे जगातील सर्वात खोलवर पोहोचलेले जाळे मानले जाते. या जाळ्याचा वापर करून भारतीय कंपन्या हे औषध दुर्गम भागातील रुग्णांपर्यंत पोहोचवू शकतात. यामुळे लठ्ठपणासोबत येणारे उच्च रक्तदाब, कोलेस्टेरॉलचे विकार आणि हृदयविकाराचा धोकाही कमी होण्यास मदत होईल, असा कंपन्यांचा दावा आहे. काही तज्ज्ञांच्या मते, सेमाग्लुटाईडसारखी औषधे शरीरातील इन्सुलिनची संवेदनशीलता सुधारून आणि वजन कमी करून नैसर्गिकरीत्या संप्रेरकांचे संतुलन राखण्यास मदत करतात. यामुळे वंध्यत्वाशी झुंजणाऱ्या लाखो महिलांना एक नवीन वैद्यकीय पर्याय उपलब्ध झाला आहे. असे असले, तरी सेमाग्लुटाईड हे कोणतेही साधे 'डाएट पिल' किंवा सौंदर्य प्रसाधन नाही. हे एक गंभीर वैद्यकीय औषध असून ते केवळ डॉक्टरांच्या सल्ल्यानेच घेणे अनिवार्य आहे. सध्याच्या काळात सोशल मीडियाच्या प्रभावाखाली येऊन अनेक लोक स्वतःहून अशी औषधे घेण्याचा प्रयत्न करतात; पण तसे करणे अत्यंत धोकादायक ठरू शकते. याचे कारण, या औषधाचे काही दुष्परिणामही असू शकतात, ज्याचे निरीक्षण तज्ज्ञ डॉक्टरांकडून होणे गरजेचे आहे. भारतीय औषध कंपन्यांनी या पेटंटच्या आधारावर आपली औषधे बाजारात आणताना याबाबत खबरदारी घेणे गरजेचे आहे.

**प्रा. विजया पंडित**

# गुंतवणूक रणनीतीचा फेरआढावा गरजेचा!

कच्च्या तेलाच्या दराने घेतलेली मोठी उसळी, महागाईचा धोका, रुपयाची घसरण आणि मध्यपूर्वेतील युद्ध संकटामुळे निर्माण झालेली जागतिक अस्थिरता लक्षात घेता निश्चित उत्पन्न देणा-या वित्तीय पर्यायात (फिक्स्ड इन्कम) गुंतवणूक करणा-या व्यक्तींवर आपली संपूर्ण गुंतवणूक रणनीती पुन्हा तपासण्याची वेळ आलेली आहे. सामान्यतः गुंतवणूकदार फिक्स्ड इन्कम मार्पेटमध्ये दोन प्रकारे सहभागी होत असतात. त्यातील पहिला म्हणजे थेट गुंतवणूक. यात ऑनलाइन बाँड प्लॅटफॉर्म्सद्वारे थेट कर्जरोखे खरेदी केले जातात, तर दुसरा प्रकार म्हणजे डेट म्युच्युअल फंड हा आहे. यात म्युच्युअल फंड योजनांच्या माध्यमातून गुंतवणूक केली जाते.

कर्जरोखे पर्यायांमधील गुंतवणुकीचा मुख्य उद्देश भांडवल सुरक्षित ठेवणे आणि त्यातून नियमित उत्पन्न मिळवणे हे असतात. अनेक 'ऑनलाइन बॉण्ड प्लॅटफॉर्म्स' सध्या कमी पतमापन दर्जा असलेले कर्जरोखे विकत आहेत. जर अर्थव्यवस्था मंदावली तर अशा कर्जरोख्यांमधील गुंतवणूक बुडण्याचा धोका अधिक असतो. तसेच जर गुंतवणूकदाराला मुदतीपूर्वी पैसे हवे असतील तर हे रोखे विकणे कठीण होऊ शकते. सध्याची परिस्थिती पाहता डेट म्युच्युअल फंड हे गुंतवणुकीच्या अनेक निकषांवर अधिक सरस ठरतात. अधिक परतावा देणारे, पण जोखमीच्या कर्जरोख्यांच्या (हाय यील्ड बाँड्स) तुलनेत डेट




म्युच्युअल फंडांचे चार प्रमुख फायदे पुढीलप्रमाणे आहेत :

**१) उत्तम तरलता –** गुंतवणूकदारांसाठी डेट म्युच्युअल फंड अधिक तरल ठरतात. कारण त्यात कोणत्याही अडचणीशिवाय त्यांना गुंतवणूक परत मिळू शकते. याउलट वैयक्तिक कर्जरोखे विकताना गुंतवणूकदाराला बाजारात योग्य खरेदी-विक्रीची किंमत शोधण्यासाठी खूप धडपड करावी लागते आणि ती अनेकदा खूप मर्यादित असते.

**२) गुंतवणुकीत उत्तम वैविध्यता –** नियमांनुसार म्युच्युअल फंडांना कर्जरोखे जारी करणा?या प्रत्येक संस्थेमध्ये गुंतवणुकीची एक ठरावीक मर्यादा पाळावी लागते. त्यामुळे म्युच्युअल फंड आपली गुंतवणूक सरकारी रोखे (जी-सेक), राज्य विकास कर्जरोखे (एसडीएल), सार्वजनिक क्षेत्रातील पंपन्यांचे कर्जरोखे आणि कॉर्पोरेट रोखे अशा विविध ठिकाणी विभागतात.

**३) व्यावसायिक पद्धतीने फंड व्यवस्थापन –** डेट फंडचे व्यवस्थापन हे नेहमी फंड व्यवस्थापक आणि विश्लेषकांच्या अनुभवी टीमद्वारे केले जाते. ही टीम कर्ज फेडण्याची क्षमता (क्रेडिट रिसर्च) आणि जागतिक व देशांतर्गत अर्थकारण (मॅक्रो इकॉनॉमिक रिसर्च) यांचा सखोल अभ्यास करते. त्यामुळे पोर्टफोलिओमधील व्याजदराची जोखीम आणि पैसे बुडण्याचा धोका नियंत्रित होण्यास मदत होते. तसेच विविध संस्था आणि वेगवेगळ्या मुदतीच्या रोख्यांमध्ये गुंतवणुकीची विभागणी झाल्यामुळे बाजार कोणत्याही परिस्थितीतून संक्रमण करत असला तरी गुंतवणूक सुरक्षित ठेवणे आणि गरजेनुसार पैसे उपलब्ध करणे सोपे जाते.

**४) कार्यक्षम पद्धतीने जोखीम व्यवस्थापन –** डेट म्युच्युअल फंड प्रामुख्याने वित्तीय संस्था असल्याने त्यांना जोखीम व्यवस्थापनाच्या दृष्टिकोनातून सरकारी नियमांचे पालन करणे बंधनकारक असते. त्यामुळे त्यांच्या कामकाजावर सतत देखरेख राहते. या फंडमध्ये तरलता, व्याजदरातील बदल, एकाच ठिकाणी जास्त गुंतवणूक न करणे आणि पैसे बुडण्याचा धोका याकडे सतत लक्ष ठेवले जाते. या सततच्या देखरेखीमुळे कर्जरोख्यांमधील गुंतवणुकीचे व्यवस्थापन आणि अंमलबजावणी अत्यंत प्रभावीपणे होते.

**प्रशांत पिंपळे**

# खकनार परिसरात वाघ मृतावस्थेत आढळला

## -विषप्रयोगाचा संशय, दोन राज्याची संयुक्त चौकशी

**धारणी/प्रतिनिधीः-** मध्यप्रदेशातील खकनार रेंजमधील पाचोरी परिसरात गुरुवारी सकाळी वाघ मृतावस्थेत आढळल्याने वन विभागात खळबळ उडाली आहे. ही घटना मध्यप्रदेशासह महाराष्ट्रालगत असलेल्या मेळघाट टायगर रिझर्व परिसराशी संबंधित असल्याने दोन्ही राज्यांच्या वनविभागांनी तातडीने तपास सुरू केला आहे.



माहितीनुसार गुरुवारी सकाळी सुमारे ११ वाजताच्या सुमारास चुनखडी, नानानगरी गावा लगत दातनपहाडी परिसरात, मध्यप्रदेश-महाराष्ट्र सीमेजवळ वाघाचा मृतदेह आढळून आला. घटनेची माहिती मिळताच वनविभागाचे अधिकारी तात्काळ घटनास्थळी दाखल झाले आणि प्राथमिक तपासणी सुरू केली. मात्र, वाघाचा मृत्यू नेमका कशामुळे झाला हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. दरम्यान, या प्रकरणाच्या सखोल तपासासाठी शुक्रवारी भोपाळहून फॉरेन्सिक पथक घटनास्थळी दाखल झाले असून, पोस्टमार्टम अहवालानंतरच मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार आहे. विशेष म्हणजे, मध्य प्रदेशातील बऱ्हाणपूर जिल्ह्यात गेल्या वर्षभरात वाघ मृतावस्थेत आढळण्याची ही दुसरी घटना आहे.

सदर परिसर घनदाट जंगलांनी व्यापलेला असून तो मेळघाट टायगर रिझर्वला लागून असल्याने महाराष्ट्र व मध्यप्रदेश या दोन्ही राज्यांदरम्यान वाघांचे स्थलांतर होत असल्याचे निदर्शनास आले आहे. मृत वाघ हा नेमका कोणत्या राज्यातील होता, याबाबतही प्रश्न उपस्थित होत आहेत. सूत्रांकडून मिळालेल्या एका विशेष माहितीनुसार, वाघाला पाण्याच्या स्त्रोतामधून विषप्रयोग केल्याचा प्राथमिक संशय व्यक्त केला जात आहे. तथापि, याबाबत अधिकृत पुष्टी अद्याप झालेली नाही. या घटनेच्या अनुषंगाने महाराष्ट्र व मध्यप्रदेश या दोन्ही राज्यांच्या वनविभागांकडून संयुक्तपणे सखोल चौकशी सुरू असून, तपास अहवालानंतरच संपूर्ण सत्य समोर येणार आहे.

# काटोलवरून वरूडमार्गे पुणे रेल्वे सुरू करा

## -केंद्रीय रेल्वेमंत्र्याकडे मागणी -आ.यावलकर व आ.ठाकुर यांची चर्चा

**वरूड/प्रतिनिधीः-** वरूड, मोर्शीचे आमदार उमेश उर्फ चंदू यावलकर आणि काटोलचे आमदार चरणसिंग ठाकूर यांनी नवी दिल्लीत केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची नुकतीच भेट घेतली. या भेटीदरम्यान त्यांनी दोन्ही मतदारसंघातील रेल्वेसंबंधित समस्यांवर प्रकाश टाकला. दोन्ही आमदारांनी मांडलेल्या मागण्यांना वैष्णव यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला.

आ. यावलकर यांनी काटोल, नरखेड, वरुड, मोर्शी, बडनेरा, पुणे या मार्गावर रेल्वे सेवा सुरू करण्याचा प्रस्ताव सादर केला. या भागातील रहिवाशांना सध्या पुणे रेल्वे मार्गाशी थेट जोडणी नसल्यामुळे, प्रवास करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. वैष्णव यांनी आ.यावलकर यांना ही मागणी लवकरात लवकर पूर्ण करण्याचे आश्वासन दिले.



त्याच प्रमाणे ठाकूर यांनीही प्रस्ताव सादर केला. प्रवाशांची सोय, सुरक्षितता आणि वेग सुधारण्याच्या उद्देशाने वैष्णव यांच्याशी चर्चा केली. दक्षिण एक्सप्रेसचे पूर्वीप्रमाणेच काटोल आणि नरखेड येथील थांबे पुन्हा पुर्वरत सुरू करावेत व इतर मागण्यांमध्ये भुसावळ, नरखेड नियमित सेवेचे सातत्य राखणे आणि विद्यार्थ्यांची होणारी गैरसोय दूर करण्यासाठी, सर्वेक्षणानंतर एका नवीन पुलाचे बांधकाम करण्याचा प्रस्ताव सादर केला आहे.

नागपूर, काटोल, नरखेड रेल्वे मार्गावर 'मेट्रो' सेवा सुरू करण्याबाबतही या चर्चेदरम्यान विचारविनिमय करण्यात आला. या याव्यतिरिक्त, वर्धा, काटोल, नरखेड मार्गासाठी नवीन रेल्वे मार्ग टाकण्याचा प्रस्तावही सादर करण्यात आला. दिल्ली, नागपूर मार्गावरील ढवळापूर येथील जुन्या दगडी पुलाच्या जागी आधुनिक 'बॉक्स ब्रिज' उभारण्याची आवश्यकताही यावेळी अधोरेखित करण्यात आली. वैष्णव यांनी या सर्व प्रस्तावांना सकारात्मक प्रतिसाद दिला. आवश्यक ती कार्यवाही केली जाईल, असे आश्वासन दिले.

# काँग्रेस शहर व जिल्हाध्यक्ष निवड प्रक्रिया सुरू

## -काँगेसचे सृजन संघटन अभियान

**अमरावती/प्रतिनिधीः-** काँग्रेस पक्षाच्या सृजन संघटन अभियानांतर्गत नवीन शहराध्यक्ष व जिल्हाध्यक्षाची निवड करण्यात येणार आहे. त्यासाठी पक्षाचे निरीक्षक तालुका, विधानसभा व ब्लॉक पातळीवरील कार्यकर्त्यांसह सामाजिक संस्था व संघटनांची मते जाणून घेणार असल्याची माहिती अखिल भारतीय काँग्रेसचे निरीक्षक आफताब अहमद यांनी शुक्रवारी पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी आ. भाई जगताप, खासदार बळवंत वानखडे, माजी मंत्री यशोमती ठाकूर, माजी आमदार डॉ. सुनील देशमुख, विद्यमान जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख, शहराध्यक्ष बबलू शेखावत प्रामुख्याने उपस्थित होते. आफताब अहमद पुढे म्हणाले, अ. भा. काँग्रेस समितीच्या सूचनेनुसार देशांत विविध राज्यांमध्ये सृजन संघटनात्म अभियान प्रारंभ करण्यात आले आहे. या अभियानाचा सातवा टप्पा सुरू झाला असून यामध्ये महाराष्ट्रातील सर्व जिल्हाध्यक्ष व शहराध्यक्ष यांची निवड करण्यात येणार आहे. या निवड प्रक्रियेत शिफारसींना फाटा देण्यात आला असून तळागाळातील कार्यकर्त्यांची मते जाणून घेण्यात येणार आहेत. दोन्ही पदांसाठी अर्ज प्रसिद्ध करण्यात आला असून जे इच्छूक त्यामध्ये सहभागी होतील त्यांच्या संदर्भातील मते तालुका, विधानसभा व ब्लॉक पातळीवरील कार्यकर्ते, सामाजिक संस्था, संघटना यांच्याकडून जाणून घेण्यात येणार आहे. दोन्ही पदासाठी इच्छूक हा पक्षाचा निष्ठावंत असण्यासोबतच चळवळीतील असणे व विचारधारेशी बांधील असणे अनिवार्य असल्याचे त्यांनी सांगितले.



भाई जगताप म्हणाले, अर्जांवर पक्षाचे निरीक्षक व नेते प्रत्यक्ष मते जाणून घेण्यासाठी तालुका पातळीवर १४ ते १७ एप्रिल या कालावधीत जाणार आहे. त्याचा अहवाल अ. भा. काँग्रेस समितीला सादर करण्यात येणार आहे. पत्रकार परिषदेला मनपा विरोधी पक्षनेते विलास इंगोले, माजी आमदार विरेंद्र जगताप, माजी महापौर मिलींद चिमोटे, महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा जयश्री वानखडे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

**पदाधिकारी व कार्यर्त्यांमध्ये बाचाबाची-**

काँग्रेस पक्ष निरीक्षकांची काँग्रेस भवनातील सभागृहात बैठक सुरू असताना बाहेर काही आजी माजी नगरसेवक व पदाधिकाऱ्यांमध्ये शाब्दीक हमरीतुमरी सुरू होती. नुकत्याच झालेल्या मनपा निवडणुकीत काही माजी नगरसेवकांना उमेदवारी नाकारण्यात आली, हा मुद्दा या वादाच्या केंद्रस्थानी होता.

माजी नगरसेवक सलिम बेग यांनी शहराध्यक्ष बबलू शेखावत व विरोधी पक्षनेते विलास इंगोले यांच्यासोबत वाद घातला. दरम्यान फिरोज खान यांनी मध्यस्थीचा प्रयत्न केल्याने वाद चिघळला. दुसऱ्या घटनेत माजी नगरसेवक शोभा शिंदे व विद्यमान नगरसेविका अर्चना आत्राम यांच्यात शाब्दी चकमक झाली. माजी नगरसेविका शोभा शिंदे व वंदना कंगाले यांनी मनपा निवडणुकीत उमेदवारी कापल्याची नाराजी निरीक्षकांसमोर व्यक्त केली.

# प्रवीण पोटे यांचा साहित्य क्षेत्रातील योगदानासाठी सत्कार

**अमरावती/प्रतिनिधीः-** माजी राज्यमंत्री प्रवीण पोटे यांच्या साहित्य क्षेत्रातील योगदानासाठी त्यांचा सत्कार गोविंद कासट यांच्यातर्फे सत्कार करण्यात आला.

आपल्या मातेच्या स्मृती प्रित्यर्थ दरवर्षी साहित्य क्षेत्रातील विविध वाङ्ममय प्रकारातील उत्कृष्ट कलाकृतींना सूर्यकांता देवी रामचंद्रजी पोटे राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करणे. गेले तेरा वर्षे सातत्याने आपल्या पोटे शैक्षणिक हब मध्ये मोठ्या कार्यक्रमाचे निमित्ताने आयोजन करणे. आधी वडील रामचंद्रजी पोटे या कार्यक्रमाला हजेरी लावायचे आणि आता त्यांच्या पश्चात कितीही व्यस्त असले तरी प्रवीण पोटे व श्रेयस पोटे हजर असणे सर्व साहित्यिकांना प्रोत्साहित करणे ही काम माजी मंत्री प्रवीण पोटे करीत आहे.



हे सर्व कमी म्हणून की काय नुकताच झालेल्या या दिमागदार व देखण्या सोहळ्यात प्रवीण पोटे यांनी साहित्य चळवळीसाठी भव्य साहित्य भवन उभारणार अशी घोषणा केली. या घोषणेवर त्यांचे कौतुक करणारे अग्रलेख ही लिहिल्या गेले. प्रवीण पोटे यांचा डॉ. गोविंद कासट मित्र मंडळातर्फे पुस्तक प्रदान करून सत्कार करण्यात आला. यावेळी मंचावर डॉ. गोविंद कासट प्राचार्य डॉ. शोभा रोकडे दीपक दारव्हेकर डॉ. श्यामसुंदर निकम, आबासाहेब कडू ,उद्धव शहाणे ,छायाताई पाथरे इत्यादी हजर होते. साहित्य क्षेत्र राजकारण्यापासून दूर ठेवा अशी ओरड सर्वत्र होत असताना एक राजकारणी असाही अशा शब्दात डॉ. गोविंद कासट यांनी त्यांचे कौतुक केले.

# गुलाबराव महाराजांच्या साहित्यावर ग्रंथ संग्रहालय

**अमरावती/प्रतिनिधीः-** प्रज्ञाचक्षू श्री संत गुलाबराव महाराज यांच्या समृद्ध, अद्वितीय आणि अमूल्य साहित्यसंपदेच्या जतन, संवर्धन व प्रभावी प्रसारासाठी प्रस्तावित ग्रंथ संग्रहालय या महत्त्वाकांक्षी उपक्रमाला राज्य शासनाकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाल्याने या संकल्पनेच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीसाठी आशादायी वातावरण निर्माण झाले आहे.

वारकरी शिक्षण संस्था, तीर्थक्षेत्र बेलोरा, ता. चांदूरबाजार तसेच गुलाबराव महाराज साहित्य प्रचार मोहीम यांच्या शिष्टमंडळाने शुक्रवार, ३ एप्रिल रोजी महाराष्ट्र राज्याचे महसूल मंत्री तथा अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची अमरावती दौऱ्यादरम्यान प्रत्यक्ष भेट घेतली. या भेटीदरम्यान शिष्टमंडळाने संग्रहालयाच्या संकल्पनेचा सविस्तर आढावा देत त्याची सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक उपयुक्तता स्पष्ट केली. यावर पालकमंत्र्यांनी अत्यंत सकारात्मक भूमिका घेत संस्थेच्या या उपक्रमाचे मनापासून कौतुक केले आणि संबंधित प्रस्तावाला गती देण्यासाठी तात्काळ जिल्हाधिकाऱ्यांसमोर सुस्पष्ट, सखोल व प्रभावी प्रेझेंटेशन सादर करण्याचे स्पष्ट निर्देश दिले, ज्यामुळे या प्रकल्पाला प्रशासकीय स्तरावर पुढे नेण्याचा मार्ग अधिक सुलभ झाला आहे. विदर्भातील महान संत, तत्त्वज्ञ, विचारवंत आणि साहित्यिक म्हणून ओळख



असलेल्या संत गुलाबराव महाराज यांच्या अद्वितीय वाङ्मयाचा व्यापक स्तरावर परिचय व्हावा आणि त्यांच्या विचारसंपदेचा लाभ समाजातील सर्व स्तरांपर्यंत पोहोचावा, या उदात्त उद्देशाने अमरावती येथे अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज असे पुस्तक संग्रहालय उभारण्याची मागणी करण्यात आली आहे. या उपक्रमासाठी संत गुलाबराव महाराज साहित्य प्रचार मोहीम, महाराष्ट्र राज्याचे प्रमुख माधुर्य विस्मय ठाकरे यांनी पुढाकार घेतला आहे. सुमारे सहा हजार पृष्ठांमध्ये विस्तारलेल्या १३४ ग्रंथांच्या अमूल्य साहित्याचा डिजिटल माध्यमातून सुबोध, आकर्षक आणि अभ्यासपूर्ण स्वरूपात परिचय करून देण्याची योजना या प्रस्तावात मांडण्यात आली आहे, ज्यामुळे विद्यार्थी, संशोधक आणि सर्वसामान्य वाचक यांना या ज्ञानसंपदेचा लाभ अधिक सुलभतेने मिळू शकेल.

# घोराड व पुसल्यात वादळीवाऱ्यासह गारपीट

## -मोसंबी उत्पादक शेतकऱ्यांचे नुकसान

**वरुड/प्रतिनिधीः-** येथून अवघ्या १५ किमी अंतरावर असलेल्या घोराड येथे मोसंबी पीक आहे. प्रत्येक शेतकऱ्याजवळ मोसंबी बागा आहेत. त्यांचा उदरनिर्वाह त्यावरच चालतो. गुरुवारी रात्री १ वाजताच्या सुमारास गारपीटीसह जोरदार पाऊस झाल्याने मोसंबीच्या झाडावरील फळ गळून पडले, काही झाडावरील फळावर गाराचा मार लागल्याने ते डागी झाले. त्यामुळे काही दिवसांनी झाडावर उरलेले फळे सुद्धा खाली येणार आहे. घोराड शिवारातील शेतकऱ्यावर आलेल्या या नैसर्गिक आपत्तीचे महसूल विभागाने पंचनामे करून नुकसान भरपाईची मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे. घोराड शिवारात गार पडलेली दिसून आली. देऊतवाडा, ढगा, एकदरा, आमनेर, जलालखेडा, उदापूर, मेंढी, खानापूर, चिंचरगव्हाण, मोरचुंद, पवनी, राजुरा, हातूर्णा, वाडेगाव, गाडेगाव, वघाळ येथे कमी प्रमाणात गार पडली आहे. पण, वादळ जोरदार असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. शेतकरी बगीच्यावर अतोनात खर्च करतो परंतु, वारंवार निसर्ग नुकसान करून जातो. त्यामुळे झालेला खर्च सुद्धा निघत नसल्याने शेतकरी चिंता व्यक्त करीत आहे.



ग्राम पुसला येथे वादळीवाऱ्यासह, गारपीट व अवकाळी पावसाने शुक्रवार ३ एप्रिल रोजी दमदार हजेरी लावली. यामध्ये फळगळ झाल्याने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. काही घरांची पडझड झाल्याने प्रंचड नुकसान झाल्याची माहिती प्राप्त झाली आहे. येथील वनपाल यांच्या शासकीय निवासस्थानावरील एक मोठे गुलमोहरचे झाड वादळी वाऱ्याने मोटरसायकलवर आदळल्याने दुचाकीची मोडतोड झाली. घरगुती साहित्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. संत्रा पिकाचे नुकसान झाल्याने नुकसानीचे पंचनामे करून संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्याची मागणी भाजपाचे माजी जिल्हा सचिव इंद्रभुषण सोंडे यांनी केली आहे.

# जिल्ह्यात वादळीवाऱ्यासह अवकाळी पाऊस

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती शहरासह जिल्ह्यतल्या विविध भागात शुक्रवारी सायंकाळी विजेच्या कडकडाटासह वादळी अवकाळी पावसाने हजेरी लावली. गेल्या दोन दिवसांपासून अधूनमधून पाऊस सुरूच आहे. या पावसाचा फटका गहू, मका, संत्रा, मोसंबी आदी पिकांना बसत आहे. त्यामुळे शेतकरी पुन्हा संकटात सापडला आहे.



वरूड तालुक्यात बुधवारी घोराड, आमनेर, देऊतवाडा, उदापूर, नायगाव या परिसरात वादळी वारा, अवकाळी पाऊस आणि गारपीट झाली. शुक्रवारी सायंकाळी ६.३० च्या सुमारास हातुर्णा, वाडेगाव, गाडेगाव, राजुरा बाजार, उदापूर, लोणी, वरूड, वाठोडा आदि भागात वादळीवाऱ्यासह पावसाने जोरदार हजेरी लावली. बुधवारी काही भागात बोराच्या आकाराची गार झाल्याने शेतमालाचे मोठे नुकसान झाले. तर शुक्रवारी झालेल्या वादळीवाऱ्यामुळे कापणीसाठी आलेला गहू, मका जमिनीवर आडवा झाला तर संत्रा मोसंबीची फळे गळून पडली. शासनाने पंचनामे करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे. हातुर्णासह काही भागात वादळीवाऱ्याने काहींच्या घरांवरील पत्रे उडाली. जिल्ह्यातल्या अन्य तालुक्यातही गेल्या दोन दिवसांपासून वादळी पाऊस येत आहे. अमरावती शहरातही सलग तिन दिवसांपासून रात्री पाऊस येत आहे.


## पाहिजे

ऑटोमोबाईल स्पेअर पार्टच्या गोडाऊनमध्ये काम करण्याकरीता दोन मुले पाहिजेत.
तसेच अकौन्टींग करीता एक मुलगी पाहिजे.
--पत्ता--
सी-१२, सातुर्णा,
एम.आय.डी.सी.-बडनेरा रोड,
अमरावती
मो.नं.७०२०८७९१६८/
८००७३४२३३५


## नावात बदल

माझे आजोबा 'स्व.भिमराव सूर्यभान वसू' या नावाने सर्व कागदपत्रे आहेत मात्र त्यांच्या शेताच्या सातबारा वर भिमराव रंगराव असे नाव नोंदविण्यात आले आहे.वरील दोन्ही नावे ही वेगवेगळ्या व्यक्तीचे नसून ती एकच आहे.तरी 'भिमराव सूर्यभान उर्फ रंगराव वसू'हे नाव सत्य असल्याचे मी प्रतिज्ञापत्र द्वारे कळवितो आहे.

-अंकुश श्रीकृष्ण कदम(नातू)
गुरुदेवनगर.


जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे

संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक २०८
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

मुख्य कार्यालय :— अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com


प्रो.क्र.११५४/२०२५

## वारसाचे प्रमाणपत्राबद्दल जाहीरनामा/सायटेशन नोटीस

**विजय जी.परवरे, दिवाणी न्यायाधीश क.स्तर, भातकुली, जि.अमरावती यांच्या न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्रमांक ४४८/२०२५ ने.ता.२८.०१.२०२६

**अर्जदार :**
1. Nita Suresh Jambhe, Age 46 Yrs. Occu.: Housewife
2. Komal Suresh Jambhe, Age 26 Yrs. Occu.: Student
3. Harshraj Suresh Jambhe, Age 21 Yrs. Occu.: Student

All R/o Ward No.2, At Po. Wathoda Shukleshwar, Tq.Bhatkuli, Dist.Amravati

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदारः** निरंक

ज्यापेक्षा **Suresh Mahadevrao Jambhe** हे दि.**१९.०९.२०२५** रोजी मयत झाले. अर्जदार **Nita Suresh Jambhe,** Age 46 Yrs. Occu.: Housewife, R/o Ward No.2, At Po.Wathoda Shukleshwar, Tq.Bhatkuli, Dist.Amravati व इतर यांनी **बॉम्बे रेग्युलेशन कायदा, १८२७ चे कलम २** प्रमाणे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता या न्यायालयामध्ये दि.**१७.१२.२०२५** रोजी अर्ज केला आहे. या अर्जाप्रमाणे वरील अर्जदार हे मयत **Suresh Mahadevrao Jambhe** यांचे वारस आहेत. ते सदरहू अर्जदार फक्त मयत **Suresh Mahadevrao Jambhe** यांचे वारस नाहीत असे कोणास सांगावयाचे असेल तर या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत दाखल करावी.

तसेच या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती दाखल न केल्यास सदरहु न्यायालय अर्जदारांना वारसा प्रमाणपत्र बाबत पुरावा घेऊन त्यांना सदरहू अर्जदारांना मयताचे वारस म्हणून घोषित करण्यात येईल आणि त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दिनांक **२२.१२.२०२५** रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले असे.

शिक्का

आदेशान्वये,
सहायक अधीक्षक,
दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर
भातकुली

# अंजनगाव बारीत महारुद्रा मंदिरात हनुमान जन्मोत्सव उत्साहात

## -भागवत कथेत भक्तिरसाची उधळण

**अंजनगाव बारी/प्रतिनिधीः-** अकरावा महारूद्र हनुमान व विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात हनुमान जन्मोत्सवा निमित्त भव्य संगीतमय भागवत सप्ताह, कीर्तन महोत्सव मोठ्या भक्तिभावात आणि उत्साहात पार पडला. या निमित्ताने झालेली सात दिवसीय श्रीमद भागवत कथा प्रसिद्ध प्रवचनकार ह.भ.प. प्रियंकाताई भोसले ( राजगड, जि.पुणे, झि- टॉकीज फ्रेम ) यांच्या रसाळ, अमृतमय वाणीने रंगत गेली. त्यांच्या मंचावरील उपस्थिती, शास्त्रवाचन आणि बालकृष्णाच्या वेशातील लहान मुलाला घेतलेल्या प्रेमळ दर्शनामुळे कार्यक्रमाला आध्यात्मिक तेज लाभले.

संपूर्ण गावात सात दिवस दिवसरात्र भक्तिमय वातावरण पसरले होते. कथा सुरू होताच गावातील मंडपात भाविकांची प्रचंड गर्दी उसळली. महिलांचे कीर्तन, आरत्या, भक्तिरसांनी भरलेली दिंडी, आणि सौंदर्यपूर्ण सजावट यामुळे मंडप अक्षरशः नटलेला दिसत होता. कथेमध्ये श्रीकृष्ण जन्म, गोवर्धन लीला, रासलीला यांसारख्या प्रसंगांचे झाक्यांमधून सुंदर सादरीकरण करण्यात आले. स्थानिक महिला व बालिकांनी साकारलेल्या कृष्ण-राधा, गोपी, देव-देवतांच्या वेशभूषा विशेष आकर्षण ठरल्या. या झाक्यांना उपस्थितांकडून भरभरून प्रतिसाद मिळाला.



गावातील सर्वच वयोगटातील भक्तांनी या उत्सवात सहभाग नोंदवला. महिलांची मोठी उपस्थिती, मुलांची सांस्कृतिक मिरवणूक, आणि भाविकांच्या टाळ-मृदूंगाच्या निनादाने उत्सव अधिकच भव्य बनला. सततच्या गर्दीमुळे मंडप सतत भरलेला दिसत होता.

समारोपाच्या दिवशी ह.भ.प. प्रियंकाताईंनी कर्तव्य, माता-पित्यांचा सन्मान व सांस्कृतिक मूल्यांचे महत्व अधोरेखित केले. त्यांच्या अंतिम प्रवचनाला भाविकांनी मोठ्या शांततेत आणि भक्तिभावाने कान दिले.

शेवटी काल्याचे किर्तन रामगीर महाराज देवस्थान मठाधिपती ह.भ.प. शंकरगीरी महाराज यांच्या हस्ते करण्यात आले. दि.३ रोजी 'भव्य महाप्रसादाने' कार्यक्रमाची सांगता झाली. आयोजन अकरावा महारूद्र हनुमान मंदिर मित्र मंडळ, अंजनगाव बारी मंडळाने गावकऱ्यांचे आणि सर्व भाविकांचे मन:पूर्वक आभार मानले. संपूर्ण गावाचा सहभाग आणि भक्तिभाव पाहता यंदाचा अकरावा महारुद्रा हनुमान जन्मोत्सव ऐतिहासिक ठरला, अशी सर्वांची भावना होती.

# कौलखेड हल्ला प्रकरणाचा ८ तासांत छडा

## जंगलातून आरोपी जेरबंद, तीन बाइक्स जप्त; रविवारी क्राइम सीन रिक्रिएशन



■ प्रतिनिधी | अकोला ■

शहरातील कौलखेड–खडकी परिसरात घडलेल्या मारहाण व जीवघेण्या हल्ल्याच्या सलग घटनांमुळे निर्माण झालेल्या दहशतीला अखेर पोलिसांनी ८ तासांतच आळा घातला. स्थानिक गुन्हे शाखेच्या (थ्रँ) पथकाने बार्शीटाकळी तालुक्यातील जंगल परिसरातून सर्व आरोपींना जेरबंद करत त्यांच्या ताब्यातील तीन मोटारसायकली जप्त केल्या. या धडाकेबाज कारवाईमुळे शहरात पोलिसांची दहशत पुन्हा प्रस्थापित झाल्याचे चित्र आहे.

पोलीस स्टेशन खदान हद्दीत ४ एप्रिल २०२६ रोजी कौलखेड व खडकी भागात वेगवेगळ्या ठिकाणी मारहाण व जीवघेण्या हल्ल्याच्या तीन गंभीर घटना घडल्या होत्या. या प्रकरणी गुन्हा क्रमांक ८५५/२०२६, ८५६/२०२६ व ८५७/२०२६ अंतर्गत भारतीय न्याय संहिता (ँन्ए) मधील विविध कलमांनुसार गुन्हे दाखल करण्यात आले होते. घटनांची तीव्रता लक्षात घेऊन पोलिसांनी तातडीने विशेष पथके गठित करून तपासाची सूत्रे हाती घेतली.

तपासादरम्यान आरोपी अटक टाळण्यासाठी बार्शीटाकळी तालुक्यातील खडकी शेतशिवारातील जंगल भागात लपून बसल्याची माहिती समोर आली. तांत्रिक विश्लेषण व गोपनीय माहितीच्या आधारे थ्रँ पथकाने सापळा रचत ५ एप्रिल रोजी सर्व आरोपींना ताब्यात घेतले. या कारवाईत कबीर सुनील बलखंडे (१८), धनंजय संदीप ढाले (१९), शिवम उर्फ शुभम संजय शेळके (१९), गौरव सुनील चव्हाण (२०) यांच्यासह एका विधीसंघर्षग्रस्त बालकाचा समावेश आहे. अटकेतील काही आरोपींवर यापूर्वीही गुन्हे दाखल असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

चौकशीत आरोपींनी जुन्या आपसी वादातून हल्ले केल्याची कबुली दिली असून, त्यांना पुढील कारवाईसाठी खदान पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. विशेष म्हणजे, अल्पवयीन आरोपी असला तरी ‘व्अॅक्ट’ अंतर्गत त्याच्यावर प्रौढ म्हणून खटला चालविण्याबाबत न्यायालयात विनंती केली जाणार असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

दरम्यान, रविवारी पोलिसांनी सर्व आरोपींना घटनास्थळी नेऊन क्राइम सीन रिक्रिएशन करून घेतले. या प्रक्रियेत आरोपींकडून घटनांची पुनर्रचना करून तपास अधिक मजबूत करण्यात आला.

ही संपूर्ण कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी, उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन पाटील व पोलीस निरीक्षक शंकर शेळके, पोलिस निरीक्षक मनोज केदारे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. एपीआय विजय चव्हाण, पोलिस उपनिरीक्षक गोपाल जाधव, पोलिस उपनिरीक्षक विष्णू बोडखे, पोलिस उपनिरीक्षक माजिद पठाण यांच्यासह स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने व खदान पोलिस यांच्या पथकाने अत्यंत कौशल्याने ही मोहीम यशस्वी केली.

### शहरात खळबळ, पोलिसांची कडक कारवाई सुरूच

या घटनेमुळे कौलखेड परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र, पोलिसांनी तात्काळ कारवाई करत सर्व आरोपींना अटक केल्याने नागरिकांमध्ये दिलासा निर्माण झाला असून, गुन्हेगारीविरोधात पोलिसांनी ‘झिरो टॉलरन्स’ची भूमिका घेतल्याचे स्पष्ट झाले आहे.



# ऑपरेशन प्रहार : अकोला पोलिसांची एकदिवसीय विशेष ड्राईव्ह

■ प्रतिनिधी | अकोला ■

जिल्ह्यातील अवैध गावठी दारू निर्मिती व विक्रीवर आळा घालण्यासाठी अकोला पोलीस दलाने ‘ऑपरेशन प्रहार’ अंतर्गत एकदिवसीय धडक मोहीम राबवून मोठी कारवाई केली. या मोहिमेत एकूण ७५ ठिकाणी छापे टाकण्यात येऊन सुमारे ८ लाख २ हजार ९३२ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

जिल्हा पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या मार्गदर्शनाखाली ३ एप्रिल २०२६ रोजी सकाळी १२ ते रात्री १२ वाजेपर्यंत ही मोहीम प्रभावीपणे राबविण्यात आली. जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांच्या पथकांनी समन्वय साधत अवैध दारू व्यवसायावर एकाच दिवशी मोठा प्रहार केला.

कारवाईदरम्यान देशी दारू संदर्भात ४६ गुन्हे नोंदवून २ लाख ३ हजार ५६२ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच गावठी हातभट्टी दारूच्या २९ गुन्ह्यांत ५ लाख ९९ हजार ३७० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. एकूण ७५ गुन्ह्यांमध्ये ८ लाखांहून अधिक किमतीचा मुद्देमाल नष्ट करण्यात आला असून संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे.



### 75 गुन्हे दाखल, सुमारे 8 लाखांचा मुद्देमाल जप्त

अवैध दारू निर्मितीमुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण होण्याबरोबरच कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्नही निर्माण होतो. या पार्श्वभूमीवर अकोला पोलिसांनी कठोर भूमिका घेत कारवाई सुरूच ठेवण्याचा इशारा दिला आहे. दरम्यान, अवैध दारू निर्मिती किंवा विक्रीबाबत माहिती असल्यास नागरिकांनी तात्काळ जवळच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन अकोला पोलीस दलाने केले आहे. पुढील काळातही अशा अवैध व्यवसायांवर सातत्याने कारवाई करण्यात येणार असल्याचे पोलिस प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

## उन्हात वृक्षलागवडीचा मोठा घोटाळा!

**तेल्हारा :** अकोला जिल्ह्यातील तेल्हारा–पाथर्डी–अकोट राज्य मार्गालगत ँश योजनेअंतर्गत सुरू असलेल्या दुतर्फा वृक्षलागवडीत मोठा गैरप्रकार उघडकीस आला आहे. रणरणत्या उन्हात, तब्बल ४० अंश तापमानात सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नियंत्रणाखाली लाखो रुपयांची वृक्षलागवड करण्यात येत असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे.

## लोकजागर मंचच्या वतीने कु. सुप्रिया धुंदे हिचा सत्कार

■ प्रतिनिधी | हिवरखेड ■

हिवरखेड येथील कस्तुरबा गांधी विद्यालयाची विद्यार्थिनी कु. सुप्रिया आनंद धुंदे (हिंगणी) हिने राष्ट्रभाषा प्रचार समिती वर्धा द्वारा आयोजित हिंदी प्रवेश परीक्षेत संपूर्ण भारतातून प्रथम क्रमांक पटकावला आहे. त्याबद्दल नेहमीच शैक्षणिक व सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या लोकजागर मंचने तिचा तिच्या उत्तुंग यशाबद्दल सत्कार केला. मुळ हिंगणी बु. येथील रहिवाशी असलेल्या व कस्तुरबा गांधी विद्यालय हिवरखेड येथे मराठी माध्यमात शिकणाऱ्या दहावीची विद्यार्थिनी कु. सुप्रिया हिने हे यश संपादन करून आपल्या शाळेचा व हिंगणी व हिवरखेड या दोन्ही गावांचा नावलौकिक वाढवला. तिच्या या यशाबद्दल लोकजागर मंचचे संस्थापक अध्यक्ष अनिल गावंडे यांनी तिचे कौतुक केले.

**Change in Name**

I, PRAMILA MANOHAR NAIK W/O BHUSHAN MURLIDHAR VYAGHRAMBRE R/o. Near Balapur Canal, Raghuvir Nagar Akola. (MS) 444002. have change My Name to PRATIKSHA BHUSHAN VYAGHRAMBRE for Passport Application ARN No. 260059455266 and all future purposes

**चौकशीची जाहिर नोटीस**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला**

जा.क्र. ८३०/ २०२६ दि. २५/०३/२०२६
अर्ज क्रमांक :- २५/२०२६ कलम १९
**सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक :** राजगृह बुद्ध विहार ट्रस्ट भोड, ता. जि. अकोला
**अर्जदार :-** श्री. उत्तम रामचंद्र सिरसाट रा. भोड, ता. जि. अकोला

संबंधित लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यांत येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त अकोला विभाग अकाला हे वर नमुद केलेल्या अर्ज या संबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम २२/१९ अन्वये खालील मुद्यावर चौकशी करणार आहेत.

१) वर नममद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय? २) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

**अ) जंगम मिळकत (वर्णन):-** रोख रक्कम रु.१०००/- श्री. उत्तम रामचंद्र सिरसाट यांचे ताब्यात आहे. **आ) स्थावर मिळकत (वर्णन):-** काही नाही.

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची केलेली कैफियतही नोटिस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल. अशारितीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरिल मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरि केली जाईल व अर्जाचे निकाला बाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटिस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त अकोला. १ यांच्या शिक्कयानीशी आज दिनांक- २५/०३/२०२६ रोजीदिली.

शिक्का
**अधिक्षक**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
अकोला विभाग अकाला

**चौकशीची जाहिर नोटीस**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला**

जा.क्र. ८२८/ २०२६ दि. २५/०३/२०२६
अर्ज क्रमांक :- २६/२०२६ कलम १९
**सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक-** श्री ब्रम्हांडनायक चॅरिटेबल ट्रस्ट अकोली खुर्द, अकोला ता. जि. अकोला
**अर्जदार :-** श्री. दिनेश चिरंजीलाल शर्मा रा. अकोली खुर्द, अकोला ता. जि. अकोला

संबंधित लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यांत येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त अकोला विभाग अकोला हे वर नमुद केलेल्या अर्ज या संबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम २२/ १९ अन्वये खालील मुद्यावर चौकशी करणार आहेत.

१) वर नममद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय? (२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

**अ) जंगम मिळकत (वर्णन):-** रोख रक्कम रु.१०००/- श्री. दिनेश चिरंजीलाल शर्मा यांचे ताब्यात आहे. **आ) स्थावर मिळकत (वर्णन):-** काही नाही.

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची केलेली कैफियतही नोटिस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्तयावर मिळेल अशारितीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरिल मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरि केली जाईल व अर्जाचे निकाला बाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटिस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त अकाला १ यांच्या शिक्कयानीशी आज दिनांक- २५/०३/२०२६ रोजीदिली.

शिक्का
**अधिक्षक**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
अकोला विभाग अकाला

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक १२२**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# निधी हडपण्यासाठी पेव्हर ब्लॉक कामांवर भर?

## खेट्री गावात निकृष्ट कामांचा सुळसुळाट; चौकशीची मागणी

■ प्रतिनिधी | खेट्री ■

शासनाचा विकासनिधी हडप करण्यासाठी ग्रामीण भागात पेव्हर ब्लॉकच्या कामांना प्राधान्य दिले जात असल्याची गंभीर चर्चा सध्या सुरू आहे. पातूर तालुक्यातील खेट्री गावात पेव्हर ब्लॉकसह विविध विकासकामे निकृष्ट दर्जाची करून देयके उचलण्याचा प्रकार वाढत असल्याचे समोर आले आहे.

गेल्या काही वर्षांपूर्वी जिल्हा परिषद मराठी व उर्दू शाळेच्या आवारात करण्यात आलेले पेव्हर ब्लॉक काम अंदाजपत्रकानुसार न करता घाईघाईत उरकण्यात आले होते. दोन दिवसांपूर्वी झालेल्या किरकोळ पावसातच या कामाची पोलखोल झाली. ठिकठिकाणी पेव्हर ब्लॉक खचले असून कामाच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी करण्यात आलेल्या या कामावर लाखो रुपये खर्च झाले असले, तरी प्रत्यक्षात हा निधी वाया गेल्याची भावना ग्रामस्थ व्यक्त करीत आहेत. पेव्हर ब्लॉक योजना ही नागरिकांच्या सोयीपेक्षा संबंधित अधिकारी व कंत्राटदार यांच्या



फायद्यासाठीच राबवली जात असल्याचा आरोप होत आहे. स्थानिकांमध्ये अशीही चर्चा आहे की, कमी खर्चात जास्त नफा मिळत असल्याने पेव्हर ब्लॉक कामे ‘सुलभ कमाईचा मार्ग’ बनली आहेत. या कामांमध्ये अधिकारी, कंत्राटदार, ग्रामपंचायत सचिव व सरपंच यांचा सहभाग असल्याचे बोलले जात आहे. दरम्यान, या निकृष्ट कामांविरोधात आवाज उठविणाऱ्यांवर दबाव टाकला जात असल्याचेही आरोप आहेत. ३० मार्च रोजी पातूर पंचायत समितीत याच कारणावरून वाद निर्माण झाल्याची माहिती समोर आली आहे. खेट्रीसह पातूर तालुक्यातील सर्व पेव्हर ब्लॉक कामांची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून जोर धरत आहे.

### तीन वर्षांतच कामाची दुर्दशा!

खेट्री गावात अवघ्या तीन वर्षांपूर्वी करण्यात आलेल्या पेव्हर ब्लॉक कामांची अवस्था सध्या अत्यंत खराब झाली आहे. संबंधित अधिकारी व कंत्राटदार यांच्या संगनमताने निकृष्ट दर्जाचे काम करून शासनाची फसवणूक करण्यात आल्याचा आरोप होत आहे. तरीही पुन्हा त्याच प्रकारच्या कामांना मंजुरी दिली जात असल्याने संशय अधिक गडद झाला आहे.

## सफाई कर्मचारी आयोगाचे अध्यक्ष कडून दखल

**अकोला :** महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोगाचे अध्यक्ष शेरसिंगजी डागौर हे मागील काही महिन्यापूर्वी अकोला जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले असता सफाई कामगार सचिन चावरे यांनी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय अकोला येथील झालेल्या त्यांच्यावर घटने संदर्भात संबंधित आरोपीवर कारवाई करण्याचे शेरसिंग डागौर यांना सादर केलेल्या निवेदनात नमूद केले होते आयोगाचे अध्यक्ष शेरसिंग डागौर यांनी घटना संगनात घेताच तात्कालीन जिल्हाधिकारी अजित कुंभार यांच्या सोबत झालेल्या बैठकीत सफाई कर्मचारी सचिन चावरे यांच्यावर झालेल्या घटनेवर चर्चा केली.

# महानगरात द्वितीय श्री श्याम संकीर्तन महोत्सवाचे भव्य आयोजन

■ प्रतिनिधी | अकोला ■

सामाजिक, सांस्कृतिक व आध्यात्मिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या गोरक्षण रोडचा राजा – विघ्नहर्ता गणेशोत्सव मंडळाच्या वतीने महानगरात द्वितीय श्री श्याम संकीर्तन महोत्सवाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवात राष्ट्रीय स्तरावरील भजनकार सहभागी होऊन भक्तीमय वातावरण निर्माण करणार असल्याची माहिती रविवारी रामदेवबाबा – श्यामबाबा मंदिर येथे आयोजित पत्रकार परिषदेत देण्यात आली.

शुक्रवार, १० एप्रिल रोजी सायंकाळी ६ वाजता मूर्तिजापूर रोडवरील सिटी स्पोर्ट क्लबच्या भव्य प्रांगणात हा महोत्सव पार पडणार आहे. गतवर्षी आयोजित प्रथम महोत्सवाला भक्तांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला होता. यावेळी प्रसिद्ध भजनकार राज



पारीक यांनी सादर केलेल्या भजनांनी वातावरण भक्तिमय केले होते.

यावर्षीच्या महोत्सवात राजस्थान येथील प्रसिद्ध भजनकार छोटूसिंग रावणा प्रथमच महानगरात येत असून ते आपल्या खास श्याम भजनांनी भक्तांना मंत्रमुग्ध करणार आहेत. त्यांच्या ‘तीन बाण के धारी’ या भजनामुळे त्यांना राष्ट्रीय कीर्ती लाभली आहे. तसेच खाटूधाम येथील सेवाधारी भजनकार महाराज शामसिंह चौहान यांची उपस्थिती लाभणार असून इंदोर येथील बासरीवादक देव कनेरी यांचीही साथसंगत लाभणार आहे.

या सोहळ्यात स्थानिक भजनकार गोपाल शर्मा हारे यांच्या हस्ते ‘गोरक्षण का राजा’ या गीताच्या चित्रफितीचे अनावरण करण्यात येणार आहे. महोत्सवानिमित्त श्री श्यामबाबांचा आकर्षक व भव्य दरबार उभारण्यात येणार असून फुलांची व सुगंधी अत्तरांची वर्षा करण्यात येणार आहे. कार्यक्रमाच्या प्रारंभी भव्य आतिषबाजीद्वारे मान्यवरांचे स्वागत

### राष्ट्रीय भजनकारांची राहणार उपस्थिती

करण्यात येईल. तसेच महोत्सवाच्या समारोपानंतर उपस्थित भक्तांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.या भक्तिमय सोहळ्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे. पत्रकार परिषदेला मंडळाचे मार्गदर्शक सुधीर रांदड, संजय शर्मा, मुरलीधर उपाध्याय, ॲड. सौरभ शर्मा, राजू शर्मा बालाजी, प्रथमेश शर्मा, मधुर बिसेन, सिमरनजीत सिंग बछेर, पंडित श्रीकांत इंदोरीया, मुकेश शर्मा, अनमोल बछेर, अभिलाष गाढे, हिमांशू दोशी, यश बियाणी, समर्थ सोनोने, कृष्णा शर्मा, सम्यक शर्मा यांच्यासह मंडळाचे पदाधिकारी व सेवाधारी उपस्थित होते.

# अडीच वर्षांतच डांबरी रस्त्याची चाळणी

## सुकळी–पिंपळखुटा मार्ग खड्डेमय; दुरुस्ती कधी होणार?

■ प्रतिनिधी | खेट्री ■

प्रधानमंत्री ग्रामीण सडक योजनेअंतर्गत पातूर तालुक्यातील सुकळी ते पिंपळखुटा या महत्त्वाच्या रस्त्याचे अवघ्या अडीच वर्षांपूर्वी डांबरीकरण करण्यात आले होते. मात्र, सध्या या रस्त्याची अवस्था अत्यंत दयनीय झाली असून संपूर्ण मार्ग खड्डेमय झाला आहे. ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडल्याने वाहनचालकांसह नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

या मार्गावरून दररोज शाळकरी मुले, शेतकरी, रुग्णवाहिका तसेच अवजड वाहतूक मोठ्या प्रमाणावर होत असते. मात्र, निकृष्ट दर्जाच्या कामामुळे रस्ता अल्पावधीतच खराब झाला असून अपघातांची शक्यता वाढली आहे. खड्ड्यांचा अंदाज न आल्याने दुचाकीस्वार घसरून पडण्याच्या घटना वाढल्या आहेत.

स्थानिक नागरिकांनी संबंधित विभागाकडे अनेक वेळा तक्रारी करूनही अद्याप कोणतीही ठोस उपाययोजना करण्यात आलेली नाही.



डांबरीकरणासाठी निकृष्ट साहित्याचा वापर झाल्याचा आरोपही नागरिकांकडून करण्यात येत आहे. अडीच वर्षांतच नव्या रस्त्याची चाळणी होणे ही गंभीर बाब असून, संबंधित अधिकाऱ्यांनी तातडीने दखल घेऊन रस्त्याची दुरुस्ती करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

### सहा कोटी २४ लाखांचा खर्च वाया?

सुकळी–पिंपळखुटा रस्त्याच्या डांबरीकरणासाठी सुमारे सहा कोटी २४ लाख रुपये खर्च करण्यात आले होते. मात्र, निकृष्ट दर्जामुळे रस्ता अल्पावधीतच खराब झाल्याने हा खर्च पाण्यात गेल्याचे चित्र आहे. पाच वर्षांच्या हमी कालावधीत दुरुस्ती अपेक्षित असतानाही कामाकडे दुर्लक्ष होत असल्याची खंत नागरिक व्यक्त करत आहेत.

### कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह

प्रधानमंत्री ग्रामीण सडक योजनेअंतर्गत करण्यात आलेल्या या कामाची गुणवत्ता संशयास्पद ठरत आहे. पाच वर्षांच्या कालावधीत रस्त्याची देखभाल व दुरुस्ती करण्याची जबाबदारी संबंधित विभागाची असतानाही प्रत्यक्षात कोणतीही कारवाई होत नसल्याने विभागाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

# पळसगाव बाईत अझोला युनिट; शेती-पशुपालनाला नवी दिशा

**सिंदी (रेल्वे)/जनमाध्यम**

ग्रामीण भागातील शेती आणि पशुपालन अधिक सक्षम व किफायतशीर करण्याच्या उद्देशाने पळसगाव बाई ग्रामपंचायतीने एक अभिनव पाऊल उचलत शेतकऱ्यांसाठी अझोला प्रात्यक्षिक युनिट उभारले आहे. मिशन समृद्धीच्या संकल्पनेतून साकारलेल्या या उपक्रमामुळे गावात नवचैतन्य निर्माण झाले असून शेतकऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.



अझोला ही प्रथिनांनी समृद्ध जलवनस्पती असून गाई, म्हशी, शेळ्या व कुक्कुटपालनासाठी ती अत्यंत उपयुक्त पूरक आहार ठरते. वाढत्या पशुखाद्याच्या किमतींच्या पार्श्वभूमीवर कमी खर्चात घरच्या घरी तयार होणारा हा पर्याय शेतकऱ्यांसाठी दिलासादायक ठरत आहे. ग्रामपंचायत परिसरात उभारलेल्या या युनिटमध्ये प्लास्टिक टाकीत पाणी, माती, शेण व आवश्यक पोषक घटक मिसळून अझोलाची लागवड केली जाते. अवघ्या ७ ते १० दिवसांत तयार होणारा अझोला दररोज पशुखाद्यासाठी वापरता येतो.या प्रकल्पाचे प्रात्यक्षिक मिशन समृद्धीचे समन्वयक विकी व पीआरपी वैशाली किशोर गोल्हर यांनी शेतकऱ्यांना करून दाखवले. अझोलाचे फायदे, लागवड पद्धती, देखभाल व वापर याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. शेतकऱ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेत विविध शंका विचारल्या, तर अनेकांनी स्वतःच्या घरीही अझोला युनिट उभारण्याची तयारी दर्शवली.

अझोलाच्या वापरामुळे जनावरांचे आरोग्य सुधारते, दूध उत्पादनात वाढ होते आणि रोगप्रतिकारक शक्ती बळकट होते. परिणामी पशुपालनाचा खर्च कमी होऊन उत्पन्नात वाढ होण्यास मदत होते. याशिवाय अझोला सेंद्रिय खत म्हणूनही उपयुक्त ठरत असून जमिनीची सुपीकता वाढविण्यास हातभार लागतो. त्यामुळे पर्यावरणपूरक शेतीला चालना मिळत आहे.या उपक्रमासाठी ग्रामपंचायतीने आवश्यक साहित्य व तांत्रिक मार्गदर्शन उपलब्ध करून दिले असून इच्छुक शेतकऱ्यांना प्रशिक्षण देण्याची जबाबदारीही स्वीकारली आहे. गावातील महिला बचत गटांनीही या प्रकल्पात रस दाखवला असून अझोला उत्पादनातून पूरक उत्पन्न मिळवण्याचा त्यांचा मानस आहे. त्यामुळे महिला सक्षमीकरणालाही बळ मिळणार आहे.या उपक्रमाच्या यशस्वीतेत सॉईल सन ॲग्रोटेक फार्मर प्रोड्युसर कंपनीच्या संचालक प्रीती धीरज लेंडे, वैशाली गोल्हर, पूजा रेवतकर, मनीषा पांडव तसेच कृषीसखी पौर्णिमा पाटील यांचे सहकार्य लाभले. ग्रामसेवक धीरज शिरपाते, प्रशांत बुरले, रोशन वाणी यांच्यासह ग्रामपंचायत कर्मचारी व शेतकऱ्यांचा सहभाग लक्षणीय ठरला.एकूणच, अझोला प्रात्यक्षिक युनिट हा केवळ प्रयोग नसून शेतकऱ्यांसाठी आर्थिकदृष्ट्या फायदेशीर, पर्यावरणपूरक आणि शाश्वत शेतीचा मार्ग दाखवणारा उपक्रम ठरत आहे. भविष्यात अधिकाधिक शेतकरी याचा लाभ घेऊन ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवे बळ मिळेल, असा विश्वास व्यक्त होत आहे.

> अझोलाच्या वापरामुळे दुग्धव्यवसाय व कुक्कुटपालन अधिक फायदेशीर होत असून शेतीपूरक व्यवसायाला चालना देण्यासाठी ग्रामपंचायत सातत्याने प्रयत्नशील आहे,
> **धीरज लेंडे,** माजी सरपंच

# पांढऱ्या सोन्याला झळाळी

## दर ८ हजारांच्या पुढे, मात्र वर्धेतील शेतकरी वंचितच

**वर्धा/जनमाध्यम**

आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील बदलत्या घडामोडी आणि युद्धजन्य परिस्थितीमुळे कापसाच्या दरात पुन्हा एकदा उसळी आली असून सध्या कापसाला ८ हजार ते ८५०० रुपये प्रतिक्विंटल असा दर मिळू लागला आहे. मात्र या दरवाढीचा अपेक्षित लाभ वर्धा जिल्ह्यातील बहुतांश शेतकऱ्यांना मिळत नसल्याचे वास्तव समोर आले आहे. काही आठवड्यांपूर्वी कापसाच्या दरात वाढ झाली होती, परंतु त्यानंतर अचानक घसरण झाल्याने अनेक शेतकऱ्यांनी आपला कापूस कमी दरातच विक्रीस काढला. आर्थिक गरज, कर्जाचा ताण आणि साठवणुकीच्या मर्यादा यामुळे शेतकऱ्यांना कमी भावातच कापूस विकावा लागला. विशेषतः वर्धा



जिल्ह्यासह विदर्भातील मोठ्या प्रमाणातील कापूस उत्पादक शेतकरी या परिस्थितीत अडकले.दरम्यान, गेल्या आठ-दहा दिवसांत कापसाच्या दरात पुन्हा वाढ झाली. कच्च्या तेलाच्या तुटवड्यामुळे कृत्रिम धाग्यांचे (पॉलिस्टर) दर २५ ते ४० टक्क्यांनी वाढले. परिणामी नैसर्गिक कापसाला आंतरराष्ट्रीय स्तरावर मोठी मागणी निर्माण झाली. चीन, बांगलादेश आणि व्हिएतनाम या देशांकडून भारतीय कापसाची मागणी वाढल्याने दरात झपाट्याने वाढ झाली आहे.तथापि, या वाढीचा फायदा फारच कमी शेतकऱ्यांना होत आहे. अंदाजे ७० ते ८० टक्के शेतकऱ्यांनी आपला कापूस आधीच विकलेला असल्याने ते या दरवाढीपासून दूर राहिले आहेत. उलट, कापूस महामंडळाने (सीसीआय) यापूर्वी मोठ्या प्रमाणात कापूस खरेदी करून साठवला असल्याने सध्याच्या वाढीव दराचा सर्वाधिक लाभ त्यांनाच होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.कापसाच्या दरवाढीमुळे बाजारात उत्साहाचे वातावरण असले, तरी शेतकऱ्यांच्या पदरी मात्र पुन्हा एकदा निराशाच पडली आहे. पांढऱ्या सोन्याची किंमत वाढली, पण त्या सोन्याचे खरे मालक असलेले शेतकरी मात्र लाभापासून वंचित राहिल्याचे चित्र वर्धा जिल्ह्यात स्पष्ट दिसून येत आहे.




# वर्ध्यात काँग्रेसचा खेळखंडोबा

**गांधींच्या भूमीतच पक्ष 'लावारिस', कार्यकर्त्यांचा संताप उसळला**

**निवडणुकीत आठवतो जिल्हा, नंतर टाकून दिला जातो थेट नेतृत्वावर हल्ला**

**निरीक्षकांसमोरच उघडली गटबाजी, मनमानी कारभारावर ताशेरे**

**वर्धा/रवींद्र लाखे**

महात्मा गांधींच्या विचारांची भूमी असलेल्या वर्धा जिल्ह्यात काँग्रेसची अवस्था अक्षरशः 'खेळखंडोबा' झाल्याचे चित्र समोर आले आहे. अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या निरीक्षकांसमोरच कार्यकर्त्यांनी संतापाचा स्फोट करत पक्षातील अंतर्गत राजकारण, गटबाजी आणि मनमानी कारभाराचे वाभाडे काढले.

इंदिरा सद्भावना भवन येथे संघटन सृजन अभियानाच्या बैठकीत झारखंडच्या आमदार तथा निरीक्षक श्वेता सिंग यांच्या उपस्थितीत ही खळबळजनक परिस्थिती उघड झाली. कार्यकर्त्यांनी कोणतीही भीड न बाळगता थेट केंद्रीय आणि राज्य नेतृत्वावर निशाणा साधला.निवडणुका आल्या की वर्धा 'गांधी जिल्हा' म्हणून आठवतो, पण निकाल लागल्यानंतर काँग्रेसला येथे अक्षरशः 'लावारिस' सोडले जाते, असा संतप्त सूर एका कार्यकर्त्याने लावला. पुढे बोलताना त्यांनी एका विशिष्ट नेत्यावर थेट आरोप करत सांगितले की, तो नेता मनमानी कारभार करत आपल्या जवळच्या लोकांनाच संधी देतो, समित्यांवर नेमणुका करतो, तर निष्ठावान कार्यकर्ते मात्र दारात उभे राहून खुर्च्या उचलण्यातच अडकून पडतात.

यावेळी राज्य आणि केंद्रीय नेतृत्वाकडून होत असलेल्या डोळेझाकी'वरही जोरदार टीका करण्यात आली. नेतृत्वाने डोळेझाक केली, म्हणूनच वर्ध्यात काँग्रेस आज नामशेष होण्याच्या उंबरठ्यावर आहे, असा इशाराच कार्यकर्त्यांनी दिला.या बैठकीला प्रा. वसंतराव पुरके, किशोर कान्हेरे, किशोर बोरकर, मनोज चांदूरकर, जिल्हाध्यक्ष चारुलता टोकस, शेखर शेंडे, सुधीर पांगुळ, शैलेश अग्रवाल, अनंत मोहोड, हेमलता मेघे यांच्यासह पदाधिकारी, ब्लॉक अध्यक्ष, फ्रंटल सेलचे प्रमुख व मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.गांधींच्या भूमीतच काँग्रेसची अशी अधोगती होत असल्याने पक्षाच्या अस्तित्वावरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, आता तरी नेतृत्व जागे होणार का असा प्रश्न राजकीय वर्तुळातून उपस्थित होत आहे.

# सिमेंटच्या जंगलात हरवत चालले 'गढीचे वाडे'

## परंपरेच्या श्वासाला लागली गंजाची किनार, वैभवाचे प्रतीक असलेले चिरेबंदी वाडे आज उपेक्षेच्या छायेत

**समुद्रपूर/जनमाध्यम**

कधीकाळी गावाच्या मध्यवर्ती ठिकाणी दिमाखात उभे असलेले गढीचे चिरेबंदी वाडे आज काळाच्या ओघात अस्तित्वाच्या उंबरठ्यावर येऊन ठेपले आहेत. हे वाडे केवळ विटा-मातीचे बांधकाम नव्हते, तर ते एक जिवंत संस्कृतीचे केंद्र, नात्यांचा उबदार स्पर्श आणि परंपरेचा श्वास होते.

उंच दरवाज्यातून आत पाऊल टाकताच अंगणात सण-उत्सवांची लगबग, हास्याचे तरंग आणि एकत्र कुटुंबाच्या सहजीवनाचा सुरेल गजर अनुभवायला मिळायचा. मात्र,



आधुनिकतेच्या झपाट्याने वाढणाऱ्या सिमेंटच्या इमारतींनी या सांस्कृतिक वारशावर गदा आणली आहे.एकेकाळी वैभवाचे प्रतीक मानले जाणारे हे भक्कम चिरेबंदी वाडे आज झिजत चालले आहेत. भिंतींना पडलेल्या भेगा, कोसळणाऱ्या कौलारू छपरांनी त्यांच्या अस्तित्वावर प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे. तरीही त्या भिंतींवर उमटलेले ओरखडे गतकाळाच्या जिवंत कथा सांगत उभे आहेत.वाडा कोसळतो, तेव्हा तो केवळ एक इमारत राहत नाही, तर त्याच्यासोबत एक अख्खा काळ, संस्कृती आणि आठवणींचा खजिना मातीखाली गडप होतो. त्या ढासळण्याचा आवाज बाहेर ऐकू येतो, पण हरवणाऱ्या इतिहासाचा आक्रोश मनाच्या आत खोलवर घुमत राहतो.

आज उरलेल्या वाड्यांकडे पाहताना ते केवळ भग्नावशेष वाटत नाहीत, तर भूतकाळाची साक्ष देणारी जिवंत स्मारके भासतात. या वाड्यांचे जतन आणि संवर्धन करणे हीच आपल्या सांस्कृतिक वारशाची खरी जपणूक आहे, असे मत स्थानिक ज्येष्ठ नागरिक व्यक्त करतात.सिमेंटच्या वाढत्या जंगलात गावाची परंपरा हरवत चालली आहे. भिंती ढासळल्या असल्या तरी आठवणी अजूनही ठामपणे उभ्या आहे, आणि त्या वाचवणे हीच आजची खरी गरज बनली आहे.

# पुतळा पूजनाने ग्रामजयंती महोत्सवाची सुरुवात

**वर्धा/जनमाध्यम**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विचार प्रतिष्ठानतर्फे सार्वजनिक पुतळा पूजन करून ग्रामजयंती महोत्सवाची उत्साहपूर्ण सुरुवात करण्यात आली. महिनाभर विविध सामाजिक, सांस्कृतिक व जनजागृतीपर कार्यक्रमांनी हा महोत्सव रंगणार असून शहरात सकारात्मक वातावरण निर्माण झाले आहे. उत्सवाच्या प्रारंभी राष्ट्रसंत चौकातील तुकडोजी महाराज यांच्या पुतळा परिसराची स्वच्छता करण्यात आली. स्वच्छतेनंतर पुतळ्याचे विधिवत



पूजन करण्यात आले. भजन, कीर्तन आणि जयघोषाने परिसर दुमदुमून गेला. उपस्थित नागरिकांनी मोठ्या श्रद्धेने सहभाग नोंदवत महापुरुषांप्रती कृतज्ञता व्यक्त केली.यानंतर छत्रपती शिवाजी महाराज, इंदिरा गांधी, बापूरावजी देशमुख, महात्मा गांधी, नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्यासह अन्य महापुरुषांच्या पुतळ्यांजवळही पूजन व स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या उपक्रमामुळे सामाजिक ऐक्य व स्वच्छतेचा संदेश देण्यात आला. या प्रसंगी हभप पुण्यदासजी चरडे महाराज, प्राचार्य सतीश जगताप, हभप काळे महाराज, मयूर ढुमणे, प्रा. प्रफुल्ल इंगोले, अजय मंथनवार, नागेश तागडे, अजय ठाकरे, किशोर फरताडे, प्रल्हाद गोलाईत यांच्यासह अनेक मान्यवर व नागरिक उपस्थित होते. पुढील टप्प्यात शहरातील इतर पुतळा परिसरातही असे उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

# विदर्भस्तरीय कराओके स्पर्धेत यवतमाळचा आशिष कैथवास विजेता

## ७५ स्पर्धकांचा उत्स्फूर्त सहभाग

**वर्धा/जनमाध्यम**

राजे श्री छत्रपती कराओके सिंगर ग्रुपतर्फे आयोजित विदर्भस्तरीय हिंदी चित्रपट गीतगायन कराओके स्पर्धेत यवतमाळ येथील आशिष कैथवास याने प्रथम क्रमांक पटकावत विजेतेपद मिळविले. या स्पर्धेत विदर्भातील विविध जिल्ह्यांमधून एकूण ७५ स्पर्धकांनी सहभाग घेतला होता.

दादाजी धुनिवाले मठ सभागृहात पार पडलेल्या या स्पर्धेला संगीतप्रेमींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. प्राथमिक फेरीत सहभागी झालेल्या ७५ स्पर्धकांमधून गुणांच्या आधारे १६ स्पर्धकांची अंतिम फेरीसाठी निवड करण्यात आली. अंतिम फेरीत प्रत्येक स्पर्धकाने दिलेल्या तीन गाण्यांपैकी एक गाणे सादर केले. या वेळी स्पर्धकांनी सादर केलेल्या सुमधुर गीतांनी उपस्थित रसिकांची दाद मिळवली.स्पर्धेचा निकाल जाहीर करताना परीक्षकांनी गुणवत्तेच्या आधारे यवतमाळच्या आशिष कैथवास याला प्रथम क्रमांक घोषित केले. नागपूरचा तनिष गजभिये याने द्वितीय, अमरावतीची पलक ढगे हिने तृतीय, तर वर्ध्याची विदिशा वाटकर हिने चौथा क्रमांक मिळविला. विजेत्यांना रोख पारितोषिक, प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले. तसेच योगिता मानकर, रिमा महल्ले आणि मेघा कोकाटे यांना प्रोत्साहनपर बक्षिसे देण्यात आली. सामाजिक बांधिलकी जपत गिरीश सावळकर व श्वेता सावळकर यांनी अंतिम फेरीत स्थान न मिळालेल्या दोन दिव्यांग मुलींना प्रत्येकी १,५०० रुपयांचे प्रोत्साहनपर पारितोषिक देऊन त्यांचे मनोबल वाढविले.स्पर्धेचे उद्घाटन ॲड. विजय बेदरकर, प्रभाकर उगेमुगे, दिलीप मेने व भारती कदम यांच्या उपस्थितीत झाले. तर बक्षीस वितरण सोहळ्यास नगराध्यक्ष सुधीर पांगूळ, सेलूचे ठाणेदार देवेंद्र ठाकूर, व्यावसायिक कमलेश ठक्कर, बाबाराव तुमसरे, पत्रकार नरेश डोंगरे, संदीप पजई व विनय संगई उपस्थित होते.स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी सुनील बुरांडे, संजय तिगावकर, गिरीश सावळकर, गिरीश वानखेडे, विक्रांत भागवतकर, महेश मुधोळकर, मेघळ अनासाने, अतुल पिसे, मेघा कोकाटे, रिमा महल्ले व योगिता मानकर यांनी परिश्रम घेतले. प्राथमिक फेरीचे परीक्षण तबला वादक श्याम सरोदे व गायिका स्वाती निधेकर यांनी, तर अंतिम फेरीचे परीक्षण नितीन वाघ व केतकी कुळकर्णी यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन किरण पटेवार व ज्योती भगत यांनी केले.या स्पर्धेमुळे विदर्भातील नवोदित गायकांना आपली कला सादर करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध झाले असून, अशा उपक्रमांची गरज असल्याचे मत उपस्थितांकडून व्यक्त करण्यात आले.

# भोवळ येऊन पडल्याने मृत्यू; डोक्याला मार ठरला जीवघेणा

**वर्धा**-अचानक भोवळ येऊन पडल्याने डोक्याला गंभीर दुखापत होऊन एका व्यक्तीचा मृत्यू झाल्याची घटना शहरात घडली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.निकेश बबन मेश्राम (वय ३९) हे पुलाच्या सुरक्षा ओट्यावर बसले असताना अचानक भोवळ येऊन खाली पडले.
पडताना त्यांच्या डोक्याला गंभीर मार लागला. घटनास्थळी उपस्थित नागरिकांनी त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल केले.मात्र डॉक्टरांनी तपासणीनंतर त्यांना मृत घोषित केले. या प्रकरणी हिंगणघाट पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली असून पुढील तपास सुरू आहे. अचानक घडलेल्या या घटनेने परिसरात शोकाचे वातावरण पसरले आहे.

# 'सेवेच्या आड लुट' डोळ्यांच्या दवाखान्यात अटेंडन्सचा दीड लाखांचा डाव उघड

## डॉक्टरांना अंधारात ठेवत औषधांची काळी विक्री

## गुन्हा दाखल; पोलिसांचा तपास वेगात

**हिंगणघाट/जनमाध्यम**

रुग्णसेवेच्या नावाखाली सुरू असलेल्या गैरप्रकारांनी पुन्हा एकदा डोके वर काढले असून, हिंगणघाटमधील टाका ग्राउंड परिसरातील एका नेत्रदवाखान्यात 'विश्वासघाताची' धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. दवाखान्यातील अटेंडन्सनेच डॉक्टरांना अंधारात ठेवत तब्बल दीड लाख रुपयांची अफरातफर केल्याचा प्रकार समोर आल्याने खळबळ उडाली आहे.

नेत्रतज्ज्ञ डॉ. आलोक वासुदेव बोरकर यांच्या दवाखान्यात ही घटना घडली. ऑपरेशननंतर रुग्णांना देण्यात येणारे आयड्रॉप व आय व्हाईप्स देण्याची जबाबदारी संबंधित अटेंडन्सकडे होती. मात्र, रुग्णांकडून घेतलेली रक्कम डॉक्टरांकडे न जमा करता ती स्वतःजवळच ठेवत असल्याचे उघड झाले.याचबरोबर स्टोअर रूममधील सुमारे १ लाख ५० हजार रुपये किमतीची औषधे परस्पर विक्री करून अपहार केल्याचेही निष्पन्न झाले. प्रकार उघड होताच डॉ. बोरकर यांनी अटेंडन्सला जाब विचारला असता तिने उडवाउडवीची उत्तरे देत आरोप नाकारले. यानंतर तिच्या वडिलांशी संपर्क साधला असता त्यांनीही अरेरावीची भाषा वापरल्याचे समोर आले.या प्रकरणी डॉ. बोरकर यांच्या तक्रारीवरून संबंधित अटेंडन्सविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ठाणेदार अनिल राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस हवालदार विनोद बुरीले पुढील तपास करत आहेत.दरम्यान, 'रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा' मानल्या जाणाऱ्या क्षेत्रात अशा प्रकारच्या गैरप्रकारामुळे संतापाची लाट उसळली असून, दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून जोर धरत आहे.

# छत्रपतींच्या स्मृतिदिनी पाणपोईचे उद्घाटन

**वर्धा/जनमाध्यम**

शहरातील व्हीआयपी रोड, गोपुरी परिसरात वर्धा जिल्हा व्यापारी संघ व शिवसेना (शिंदे गट) यांच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मृतिदिनी थंड पाण्याच्या पाणपोईचे उद्घाटन उत्साहात करण्यात आले. उष्णतेच्या तीव्रतेत नागरिकांना दिलासा देणारा हा उपक्रम ठरला. या पाणपोईचे उद्घाटन शिवसेना वर्धा जिल्हाप्रमुख राजेश सराफ यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा उपप्रमुख मिलन गांधी, माजी नगरसेवक तथा उपशहर प्रमुख शरद आडे, तक्रार निवारण समितीचे प्रमुख सुरेश




पट्टेवार, उपशहर प्रमुख संतोष लांगोरे, युवा सेना जिल्हाप्रमुख प्रथम यादव, उपजिल्हाप्रमुख यश पांडे यांच्यासह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला माल्यार्पण व पूजन करून करण्यात आली. त्यानंतर राजेश सराफ यांच्या हस्ते पाणपोईचे फीत कापून उद्घाटन करण्यात आले. या उपक्रमामुळे उन्हाळ्यात नागरिकांना थंड पाण्याची सुविधा उपलब्ध होणार असल्याने उपस्थितांनी समाधान व्यक्त केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक व्यापारी संघाचे अध्यक्ष संतोष यादव यांनी केले. त्यांनी या उपक्रमामागील उद्देश स्पष्ट करत समाजहितासाठी अशा उपक्रमांची गरज अधोरेखित केली. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन माजी नगरसेवक शरद आडे यांनी केले.उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या सेवेसाठी उभारलेली ही पाणपोई शहरात सामाजिक बांधिलकीचे उदाहरण ठरत असून, येणाऱ्या काळात अशा उपक्रमांची संख्या वाढावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# मद्यधुंद तरुणाचा धिंगाणा; पोलिसांची कारवाई

**वर्धा**-आष्टी तालुक्यातील किन्हाळा येथे मद्यधुंद अवस्थेत धिंगाणा घालणाऱ्या तरुणावर पोलिसांनी कारवाई केली. या घटनेमुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.सागर भागवत धुर्वे (वय २२, रा. किन्हाळा) हा तरुण मद्यप्राशन करून नागरिकांना त्रास देत होता. त्याच्या गोंधळामुळे नागरिकांनी पोलिसांना माहिती दिली. माहिती मिळताच तळेगाव (श्या.पंत) पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली.पोलिसांनी संबंधित तरुणाला ताब्यात घेऊन त्याच्याविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे. गावात शांतता अबाधित ठेवण्यासाठी पोलिसांकडून गस्त वाढविण्यात आली असून अशा प्रकारांवर कठोर कारवाई केली जाईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

# संत कबीर वॉर्डात वृद्धाची आत्महत्या

**हिंगणघाट** - शहरातील संत कबीर वॉर्डात एका वृद्धाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना उघडकीस आली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.अरुण लक्ष्मण राऊत (वय ८४) असे मृताचे नाव असून त्यांनी राहत्या घरी गळफास घेत जीवन संपविले. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पंचनामा करून मृतदेह ताब्यात घेण्यात आला.यानंतर मृतदेह उत्तरिय तपासणीसाठी शासकीय रुग्णालयात पाठविण्यात आला. परिसरात शोककळा पसरली आहे.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक १२९**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

## संक्षिप्त



### पाणंद विकासाला गती; अनेक रस्ते पूर्ण

**अंजनगाव बारी-**तालुक्यातील अंजनगाव बारी सर्कलमधील पाणंद रस्त्यांच्या विकासकामांना वेग आला असून अनेक महत्वपूर्ण मार्गांची कामे पूर्णत्वास पोहोचली आहेत. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांची शेतीमाल वाहतूक, रुग्णवाहिका सेवा तसेच दैनंदिन ये-जा सुलभ व्हावी यासाठी ही कामे अत्यंत महत्त्वाची मानली जात आहेत. यामध्ये अंजनगाव बारी–निभोरा, जळू, जनुना, टिमटाळा, खिरसाना, आडगाव(बु.) तसेच पांडेपुलापर्यंत या मार्गावरील पाणंद रस्त्यांची कामे पूर्ण झाली असून स्थानिक शेतकऱ्यांनी याचा मोठा लाभ मिळू लागला आहे.त्याचबरोबर यामध्ये आणखी प्रस्तावित व मंजूर पाणंद रस्त्यांचा उल्लेख करता येईल. तसेच अंजनगाव बारी सर्कलमधील मंजूर पाणंद रस्त्यांची मध्ये (१ कि.मी.) वाकपैजन ते मुळे शेतापर्यंतचा पाणंद रस्ता, गुलालकरी ते जयवंत कदम शेतापर्यंत, राजू टारपे ते प्रकाश हटवार शेतापर्यंत (खिरसाना), बावनकुरे ते रामदास दातीर शेतापर्यंत, विजय दातीर ते धांडे शेतापर्यंत, अंजनगाव बारी ते अऱ्हाड-कुऱ्हाड या पाणंद रस्त्यांचा समावेश असुन या सर्व कामांमुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळाला असून शेतीमाल वाहतुकीसह ग्रामीण संपर्कव्यवस्था अधिक मजबूत होत आहे.

### वणी ममदापूर फाट्यावर अपघात

**तिवसा-**अज्ञात वाहनाने दुचाकीला दिलेल्या धडकेत ५३ वर्षीय दुचाकीस्वार शेतकरी गंभीर जखमी झाल्याची घटना आज सकाळी १० वाजता वणी ममदापूर फाट्यावर घडली. नीलकंठ माधवराव कोहळे(वय,५३,रा.सारसी) असे अपघातात गंभीर जखमी झालेल्या शेतकऱ्याचे नाव आहे. आज सकाळी ते त्यांच्या MH २७, BP-५४६५ ने ममदापूर येथील शेताकडे गेले असता नागपूर वरून अमरावतीच्या दिशेने जाणाऱ्या अज्ञात कारने कोहळे यांच्या दुचाकीला वणी ममदापूर फाट्यावर जबर धडक दिली.ज्यात कोहळे हे गंभीर जखमी झाले.अपघातानंतर जखमी ला सोडून कारचालकाने पळ काढला.मात्र काही नागरिकांनी रक्तबंबाळ अवस्थेत रोडवर पडलेल्या नीलकंठ कोहळे यांना तिवसा ग्रामीण रुग्णालयात व नंतर अमरावती येथे उपचारार्थ दाखल केले.याप्रकरणी तिवसा पोलिसांनी अज्ञात कार चालकांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलीस करीत आहे.



### सोनाली जामठे यांची निवड

**टाकरखेडा संभू -** अमरावती येथील वऱ्हाडे मंगल कार्यालयात पार पडलेल्या कार्यक्रमात भारतीय जनता महिला मोर्चा (भा.ज.पा.) महिला आघाडीच्या भातकुली तालुका उपाध्यक्षपदी सोनाली निलेश जामठे यांची निवड करण्यात आली. तिवसा मतदारसंघाचे आ. राजेश वानखडे, महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा अनिता तिखीले तसेच भातकुली तालुका अध्यक्षा आशा जुमडे यांच्या हस्ते त्यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.यावेळी प्रदीप गौरखेडे, अमरदीप तेलखडे, भातकुली तालुका अध्यक्ष शाम गवळी, अमरावती तालुका अध्यक्ष विरेंद्र लंगडे, सोपान गुडघे, योगेश देशमुख आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.टाकरखेडा संभू ग्रामपंचायतीमध्ये दोन टर्म सदस्य म्हणून कार्य केलेल्या सोनाली जामठे यांच्या निवडीमुळे भातकुली तालुक्यात महिला आघाडीच्या कार्याला नवे बळ मिळणार असल्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. पक्षातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सोनाली जामठे यांचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# अकरावी प्रवेश प्रक्रिया पुन्हा ऑनलाइन; विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन केंद्रे सुरू

## आवश्यक कागदपत्रे आधीच तयार ठेवण्याचे आवाहन

**अमरावती/का.प्र.**
राज्यात यंदाही अकरावी प्रवेश प्रक्रिया केंद्रीय ऑनलाइन पद्धतीनेच राबवली जाणार आहे. त्यासाठी अमरावती शिक्षण विभागाने तयारी सुरू केली आहे. विद्यार्थ्यांचे अर्ज अचूक आणि त्वरित भरण्यासाठी माध्यमिक शिक्षणाधिकाऱ्यांनी शासकीय, अनुदानित विद्यालयांमध्ये मार्गदर्शन केंद्राची स्थापना करावी. माध्यमिक शाळांनी विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी प्रवेश अर्ज भरण्यासाठी साहाय्य करावे, विद्यार्थी, पालक, शाळा, विद्यालयांसाठी उद्बोधन वर्गांचे आयोजन करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी याबाबत विभागीय शिक्षण उपसंचालक, माध्यमिक शिक्षणाधिकारी यांना परिपत्रकाद्वारे सूचना दिल्या आहेत. गेल्या वर्षी प्रथमच राज्यभरात अकरावीची प्रवेश प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने राबवण्यात आली. परंतु प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यास विलंब झाल्याने अकरावीची प्रवेश प्रक्रिया सप्टेंबरपर्यंत सुरू राहिली. त्यानंतरही प्रवेश न घेतलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेशाची संधी देण्यात आली होती. या पार्श्वभूमीवर, यंदा अकरावीच्या प्रवेश प्रक्रियेच्या अनुषंगाने सूचना देण्यात आल्या आहेत. राज्य मंडळाशी संलग्न कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये अकरावीसाठी प्रवेश घ्यायचा असेल अशाच विद्यार्थ्यांनी ऑनलाइन प्रवेश प्रणालीद्वारे अर्ज करावा. अन्य मंडळाशी संलग्न शाळांतून दहावी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना राज्य मंडळ संलग्न महाविद्यालयातील अकरावीच्या प्रवेशासाठी ऑनलाईन प्रणालीद्वारे अर्ज करता येईल. शेवटच्या विद्यार्थ्याला प्रवेश मिळेपर्यंत प्रवेश प्रक्रिया गुणवत्तेनुसार आणि निकषांनुसार ऑनलाईन पद्धतीनेच करण्यात येईल. याव्यतिरिक्त अन्य कोणत्याही पद्धतीने शाळांना प्रवेश करता येणार नाही.प्रवेशासाठी महाविद्यालय शोधणे, शाखा, माध्यम, प्रवेशक्षमता, रिक्त जागा तपासणे, अर्ज करणे अशा सुविधा उपलब्ध होतील. प्रवेश प्रक्रियेत केंद्रीभूत प्रवेश, संस्थांतर्गत कोटा, व्यवस्थापन कोटा, अल्पसंख्याक कोटा उपलब्ध असेल. प्रवेश प्रक्रियेसाठी घटनात्मक आणि समांतर आरक्षण लागू असेल. घटनात्मक आरक्षणाअंतर्गतच्या जागा पहिल्या तीन नियमित फेऱ्यांअंतर्गत त्या त्या प्रवर्गातून भरण्यात येतील. त्यानंतरच्या फेऱ्यांमध्ये राखीव प्रवर्गाचे विद्यार्थी उपलब्ध न झाल्यास रिक्त जागा खुल्या प्रवर्गातून भरण्यात येतील, असे स्पष्ट करण्यात आले आहे.प्रवेश अर्जाचा भाग एक भरताना आरक्षण, गुणांची पडताळणी करण्यासाठी आवश्यक प्रमाणपत्रे जोडावी लागतात. तसेच प्रवेश निश्चित करताना संबंधित प्रमाणपत्रांची मूळ प्रत सादर करावी लागते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी संबंधित प्रमाणपत्रे वेळेपूर्वीच प्राप्त करून ठेवावीत, असे स्पष्ट करण्यात आले आहे. आवश्यक कागदपत्रांमध्ये दहावीचे गुणपत्रक, शाळा सोडल्याचा दाखला, महाराष्ट्राचा अधिवास दाखला, जात प्रमाणपत्र, नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र, आर्थिकदृष्ट्या दुर्बल पात्रता प्रमाणपत्र, दिव्यांग विद्यार्थ्यांना दिव्यांग प्रमाणपत्र आदींचा समावेश आहे.

# औद्योगिक भेटीद्वारे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष ज्ञानाचा लाभ

**चांदूर रेल्वे/**
राजर्षी शाहू सायन्स कॉलेज, चांदूर रेल्वे येथील भौतिकशास्त्र व इलेक्ट्रॉनिक्स विभागाच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांसाठी आई माऊली इंडस्ट्री (वॉटर बॉटलिंग प्लांट) येथे औद्योगिक भेटीचे आयोजन करण्यात आले होते. या भेटीद्वारे विद्यार्थ्यांना उद्योग क्षेत्रातील प्रत्यक्ष कार्यपद्धती, उत्पादन प्रक्रिया तसेच आधुनिक तंत्रज्ञानाची सखोल माहिती मिळाली.



या औद्योगिक भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी वॉटर बॉटलिंग प्लांटमधील विविध विभागांना भेट देऊन पाणी शुद्धीकरण प्रक्रिया, फिल्ट्रेशन, बॉटलिंग, सीलिंग, लेबलिंग, गुणवत्ता नियंत्रण तसेच पॅकिंग व्यवस्था यांचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. कामकाजातील शिस्त व सुरक्षिततेचे नियमही विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आले.

उद्योगातील तज्ज्ञ व आई माऊली इंडस्ट्रीचे संचालक अभिजीत आबदेव यांनी विद्यार्थ्यांना पाणी प्रक्रिया व बॉटलिंगची संपूर्ण प्रणाली सविस्तरपणे समजावून सांगत उद्योग व्यवस्थापनातील विविध पैलू उलगडून दाखवले. भौतिकशास्त्र व इलेक्ट्रॉनिक्स या विषयांतील सैद्धांतिक ज्ञानाचा उद्योग क्षेत्रात कसा उपयोग होतो, विशेषतः पाणी शुद्धीकरण यंत्रणा, सेन्सर्स, ऑटोमेशन प्रणाली यामध्ये, हे विद्यार्थ्यांना या भेटीद्वारे स्पष्ट झाले.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानवृद्धीसोबतच त्यांच्या करिअर दृष्टीकोनाचा विस्तार होण्यास मोठी मदत झाली.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पराग वडनेरकर यांनी अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टी, तांत्रिक जाण आणि उद्योगाभिमुख विचारसरणी विकसित होण्यास मदत होते, असे मत व्यक्त करत विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

या औद्योगिक भेटीचे यशस्वी आयोजन करण्यासाठी विभागप्रमुख प्रा. एस. ए. वाणी तसेच प्राध्यापकवृंद डॉ.ए.पी. पाचकवडे, डॉ.आर.एन.भगत आणि प्रा. पल्लवी देशमुख यांनी विशेष परिश्रम घेतले.

# चाकू बाळगणाऱ्यावर कारवाई

**आसेगाव पूर्णा/वार्ताहर**
स्थानिक पोलीस ठाण्याच्या हद्दीत सावळापूर फाटा येथे एका इसमाकडून बेकायदेशीररित्या चाकू बाळगल्याप्रकरणी पोलिसांनी कारवाई केली आहे.या प्रकरणी अमोल यादवराव घोडेस्वार (वय ४७, रा. सावळापूर ता. अचलपूर) याच्याविरुद्ध अप क्रमांक १२१/२६ नुसार कलम ४, २५ Arms Act तसेच महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १३५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आसेगाव पोलिसांना गोपनीय माहितीत एक इसम सावळापूर येथे धारदार चाकू घेऊन फिरत आहे. यामुळे येणाऱ्या जाणाऱ्या लोकांमध्ये भीती व दहशतीचे वातावरण निर्माण होत असल्याची याबाबत माहिती मिळतात आसेगाव चे ठाणेदार सुरज तेलगोटे यांचे सहकारी इजहार, हवालदार अरविंद केराम, ड्रायव्हर इम्तिहाज हे घटनास्थळ सावळापूर फाटा येथे जाऊन धाममधून करणारा इसम पळून जाण्याच्या बेतात असतानाच मोठ्या सीताफिने पोलिसांनी ताब्यात घेतले. तसेच त्याला धारदार शस्त्राबाबत विचारले असतात कोणतेही संयुक्त उत्तर दिले नाही. सदर शस्त्र पंच्यासमक्ष पंचनामा करून आसेगाव पूर्णा पोलिसांनी आरोपीकडून सुमारे ४१ सेंमी लांबी व ४.५ सेंमी रुंदीचा धारदार चाकू जप्त केला आहे. ही कारवाई ३ एप्रिल रोजी सायंकाळी सुमारे ६ वाजण्याच्या सुमारास सावळापूर फाटा येथे करण्यात आली.या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करीत आहेत.

# लग्नसराई, सणासुदीत बाजारात फुलांचा सुगंध महागला; उत्पादन घटले

**अंजनगाव बारी/वार्ताहर**
लगनसरा तसेच विविध सणासुदीला कार्यक्रमांच्या पार्श्वभूमीवर गावाकडील फुलांच्या बाजारात प्रचंड मागणी वाढली असून दरांमध्ये तब्बल १५ ते २० टक्क्यांनी वाढ झाली आहे. उत्पादन घटले आणि मागणी दुप्पट वाढल्याने ग्राहकांच्या खिशाला चांगलाच ऊन बसत आहे.

गेल्या काही दिवसांतील हवामानातील अनियमितता, उष्णतेची लाट आणि पावसाच्या अनियमित खंडामुळे स्थानिक तसेच परिसरातील शेतकऱ्यांच्या फुलउत्पादनावर मोठा परिणाम झाला आहे. उत्पादन कमी झाल्याने बाजारात जास्वंद, मोगरा, ताग, शेवंती, गुलाब, निरंजन, दुर्वा यांसह पूजा-अर्चनेला लागणाऱ्या फुलांना मोठी मागणी असल्याचे फुलविक्रेते सांगत आहेत. सणासुदीच्या काळात मंदिरांमध्ये, घरांमध्ये, तसेच विविध कार्यक्रमांना पुष्पहार, वेण्या, सजावट या सर्वांसाठी मोठ्या प्रमाणात फुले खरेदी केली जात असल्याने बाजारात भाव वाढ अपरिहार्य झाला आहे.स्थानिक विक्रेत्यांच्या मते, 'दरवर्षी सणासुदीच्या काळात मागणी वाढतेच, पण यंदा उत्पादन कमी असल्याने भाव अनियंत्रितरीत्या वाढले. ग्राहक मागणी पूर्ण करणे अवघड झाले आहे.'

गावातील तसेच बाजार समितीतील व्यापाऱ्यांकडून मिळालेल्या माहितीनुसार, आगामी आठवडाभर हीच दरवाढ कायम राहण्याची शक्यता आहे. सण उत्सवामुळे खरेदी वाढली असून ग्रामीण बाजारपेठेमध्ये फुलांचा सुगंध अधिक 'महाग' झाल्याचे चित्र दिसत आहे.



### फुलांचे प्रकार व सध्याचे भाव

शेवंती : १४०–१५० रुपये किला, गलंडा : ५०–६० रुपये किला, झेंडू : ९०–१०० रुपये किलो, गुलाब : १५० रुपये किलो, मोगरा (गजरा) : २० रुपये नग, बिजली: १५० रुपये किलो, निशिगंध : २५०–३०० रुपये किलो, डचगुलाब : ३०० रुपये गड्डी, उडुपी माळा : २५०–३०० रुपये

'उत्पादन घटले आणि मागणी अचानक वाढली. त्यामुळे फुलांच्या दरात वाढ अपरिहार्य झाली आहे. ग्राहकांना परवडेल अशा दरात पुरवठा करण्याचा आम्ही प्रयत्न करतोय.'
**-सुधीर तेटू,** फुल उत्पादन, अंजनगाव बारी

'हवामानातील अनियमितता आणि घटलेल्या उत्पादनामुळे फुलांचा पुरवठा मर्यादित झाला आहे. सणासुदीच्या वाढत्या मागणीमुळे बाजारभावांमध्ये काही प्रमाणात वाढ झाली असून आम्ही उपलब्धतेनुसार नियमित पुरवठा सुरळीत ठेवण्याचा प्रयत्न करत आहोत.'
**- निखिल तसरे,** फुल व्यवसायीक, अंजनगाव बारी.

# १५ एप्रिलला श्री संत गोरोबा काका पुण्यतिथी महोत्सवाचे आयोजन

**अमरावती/का.प्र.**
विदर्भ कुंभार समाज सुधार समिती, अमरावती यांच्या वतीने दि. १५ एप्रिल २०२६ रोजी श्री संत गोरोबा काका पुण्यतिथी दिन' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. शशिनगर, बडनेरा रोड येथील श्री संत गोरोबाकाका भवन येथे या निमित्ताने मंगळवार व बुधवार असे सलग दोन दिवस विविध धार्मिक आणि प्रबोधनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. १४ एप्रिल : सायं. ६.३० ते ७.३०: कलश पूजन व नवविवाहित दांपत्यांकडून होम पूजन. सायं. ७.३० ते ८.३०: श्री संत गजानन महाराज महिला भजनी मंडळ व सार्वजनिक नवदुर्गा महिला उत्सव मंडळ, माहुली (जहा.) यांच्या वतीने भजनाचा कार्यक्रम. बुधवार, दि. १५ एप्रिल २०२६ (मुख्य पुण्यतिथी दिन):सकाळी: श्री संत गोरोबा काकांची अभिषेक पूजा, सकाळी ७.३० ते ८.३०: श्री संत गोरोबा काका यांची पालखी मिरवणूक (दिंडी),सकाळी ९.३० ते दुपारी १२.०० ह.भ.प. सोपान महाराज सरोदे (जळका हिरापूर) यांचे काल्याचे सुश्राव्य कीर्तन व दुपारी १२.०० ते ३.००: महाप्रसादाचे वाटप.



सकाळी ७.३० वाजता निघणाऱ्या दिंडीत सर्व समाज बांधवांनी विशेष वेषभूषेत मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे. या दिंडीत एकवाक्यता राहावी म्हणून पुरुष मंडळींनी पांढरा ड्रेस व टोपी परिधान करावी, तर महिलांनी पिवळ्या रंगाची साडी परिधान करावी, अशी विशेष विनंती आयोजकांनी केली आहे.हा भव्य सोहळा विदर्भ कुंभार समाज सुधार समिती, श्री संत गोरोबा काका समाजोन्नती बहुउद्देशीय समिती आणि श्री संत गोरोबा काका नागरी सहकारी पतसंस्था, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला आहे. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी समितीचे अध्यक्ष सुधाकर ब. शेंडोकार, उपाध्यक्ष गजानन शं. तांबटकर, कोषाध्यक्ष सतिश अ. गावंडे, सचिव सुरेंद्र ना. सरोदे यांच्यासह समितीचे सर्व पदाधिकारी, सहसचिव, सदस्य परिश्रम घेत आहेत.




### शिक्षक समितीतर्फे सेवापूर्ती व ईद मिलन सोहळा

**दर्यापुर-**महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती. दर्यापूर तालुक्याचे अध्यक्ष तुळशीदास धांडे व त्यांची संपूर्ण टीम हे नेहमीच सामाजिक कार्यात अग्रगण असते. अखिल महाराष्ट्र उर्दू शिक्षक संघटनेचे जिल्हा प्रतिनिधी तथा दर्यापूर शिक्षक पतसंस्थेचे तज्ञ संचालक मोहम्मद असदुल्ला यांच्या निवासी जाऊन त्यांचा सेवापूर्ती सत्कार घेण्यात आला. सोबतच महाराष्ट्र राज्य उर्दू शिक्षक संघटनाचे पदाधिकारी, अखिल महाराष्ट्र उर्दू शिक्षक संघटना चे पदाधिकारी व दर्यापूर शिक्षक समितीचे पदाधिकारी यांनी मिळून सर्व मुस्लिम बांधवांना ईदच्या शुभेच्छा देऊन ईद मिलन सोहळा संपन्न केला. यामध्ये प्रामुख्याने शिक्षक समितीचे अध्यक्ष तथा अमरावती जिल्हा परिषद शिक्षक सहकारी बँकेचे संचालक तुळशीदास धांडे यांनी भूमिका पार पाडली.

### गुरुवारपासून श्री. स्वामी समर्थ पुण्यतिथी सप्ताह

## सामुहिक श्री.गुरूचरित्र महापारायण

**चांदूरबाजार/वार्ताहर**
स्थानिक शिवाजी नगरातील श्री.स्वामी समर्थ केंद्रात, श्री.स्वामी समर्थ पुण्यतिथी निमित्त नाम जप यज्ञ सप्ताह होत आहे. या सप्ताहात ९ एप्रिल ते १५ एप्रिल दरम्यान,' सामुहिक श्री.गुरूचारित्र महापारायण'. होणार आहे.या अध्यात्मिक सप्ताहाचे आयोजन श्री.स्वामी समर्थ सेवा व बालसंस्कार केंद्र, दिंडोरी प्रणित शाखा चांदूरबाजार व्दारा करण्यात आले आहे.



स्वामी समर्थ केद्रातील या अध्यात्मिक सोहळयात,८ एप्रिलला ग्राम देवता निमंत्रण,मंडल मांडणी,९ एप्रिलला ते अग्नी स्थापना, मंडल स्थापना, स्थापित देवता हवन,नित्य स्वाहाकार विधी होईल.तर ९ एप्रिल ते १५ मे दरम्यान दररोज सकाळी, ८.३० ते१०.३० या वेळेत 'सामुहिक श्री गुरूचरित्र महापारायण' होईल.या सप्ताहात दैनिक कार्यक्रमातील नित्य स्वाहाकारात अनुक्रमे श्री गणेश याग,श्री मनोबोध याग,श्री चंडी याग, श्री स्वामी याग, श्री गिताई याग,श्री मल्हार याग, श्री रूद्र याग, होम हवन होईल. या सप्ताहाचे दैनंदिन अध्यात्मिक कार्यक्रमात सकाळी ७.३० ते रात्री ८ वाजेपर्यंत, भूपाळी आरती, अभिषेक, नैवेद्य आरती, विशेष याग, श्री स्वामी चरित्र सारामृत, श्री दुर्गा सप्तशती पाठ, मल्हारी सप्तशती, औदुंबर प्रदक्षिणा, नैवेद्य आरती, सामुदायिक मंत्र जप, नित्य ध्यान, गीतेचा १५ वा अध्याय,गीताई,मनाचे श्लोक वाचन, पसायदान, तुकारामांचे अभंग, विष्णुसहस्त्रनाम वाचन, बटुक हवन इत्यादी विधी होईल. तसेच १५ एप्रिलला सकाळी ८ पासून श्री स्वामी समर्थ पुण्यतिथी सोहळा,श्री गुरूचरित्र महापारायण सांगता, बलीपुर्णाहुती, श्री सत्यदत्त पूजना नंतर,१०.३० ला महाआरती होईल. त्यानंतर लगेच ११ वाजता महाप्रसादाने,सप्ताहाची सांगता होईल. तरी या अध्यात्मिक पर्वाचा,स्वामी समर्थ सेवेकर्यांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा. असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

# राज्यातील शाळांची एकाच वेळी पटपडताळणी

## 'स्टुडंट पोर्टल'वर होणार नोंद

**अमरावती/क्रा.प्र.**
राज्यातील शाळांची नियतकालिक मूल्यांकन चाचणीदरम्यान पटपडताळणी करण्यात येणार आहे. त्यानुसार ११ एप्रिल, १५ एप्रिल आणि २२ एप्रिल या दिवशी शिक्षण विभागाचे पथक शाळांना भेट देऊन विद्यार्थी उपस्थितीचा आढावा घेऊन त्याची प्रणालीमध्ये नोंद करणार आहे.



प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी, माध्यमिक शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी या बाबत परिपत्रकाद्वारे सूचना दिल्या आहेत. राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेतर्फे राज्यातील शासकीय शाळा, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा, खासगी अनुदानित शाळांतील विद्यार्थ्यांसाठी नियतकालिक मूल्यांकन चाचणी घेतली जाणार आहे.या पार्श्वभूमीवर परिपत्रकाद्वारे दिलेल्या सूचनांनुसार, इयत्ता दुसरी ते आठवीच्या वर्गाची पटपडताळणी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने आयोजित केलेल्या पॅट परीक्षेच्या दिवशी करावी. इयत्ता नववीची मराठी गणित आणि इंग्रजी या विषयांची वार्षिक परीक्षा ११ एप्रिल, १५ एप्रिल, २२ एप्रिल रोजी आयोजित करावी. इयत्ता अकरावीची मराठी, भौतिकशास्त्र, इंग्रजी या विषयांची वार्षिक परीक्षाही याच दिवशी आयोजित करण्याबाबत स्पष्ट करण्यात आले आहे.पटपडताळणीची प्रक्रिया एकाच वेळी पूर्ण करण्यासाठी नववी आणि अकरावीच्या परीक्षाही याच दिवशी आयोजित करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. राज्यातील शाळा पटपडताळणीच्या अनुषंगाने 'स्टुडंट पोर्टल'वर मुख्याध्यापक लॉगिन, केंद्रप्रमुख लॉगिन, विस्तार अधिकारी लॉगिन, शिक्षणाधिकारी लॉगिनवर सुविधा उपलब्ध करून दिली जाणार आहे.पटपडताळणीसाठी शाळेला भेट देणारे पथक या लॉगिनचा वापर करून उपस्थित आणि अनुपस्थित विद्यार्थ्यांची नोंद करतील.

दाखल असणारे व हजेरी पत्राकावर असलेले सर्व विद्यार्थी पटनिर्धारण करीता ग्राह्य धरण्यात यावे.तसेच काही कारणास्तव या तारखेला अनुपस्थित असल्यास मागिल हजेरी उपस्थिती नुसार ग्राहय धरण्यात यावी.या अगोदर शासनाने आधार कार्डवर शिक्षक निर्धारण केले होते त्यानुसार शिक्षकांचे निर्धारण करुन समायोजन पण केले.ती आता पूर्ण होणार असुन या तारखेला १००% विद्यार्थी उपस्थित ठेवावे असे आवाहन शिक्षक समितीने केले आहे.
**राजेश सावरकर,**
राज्य प्रसिध्दी प्रमुख,

**दहावी, बारावीच्या विद्यार्थ्यांची उपस्थिती ग्राह्य**
इयत्ता दहावी, इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांची पटपडताळणी करण्याची आवश्यकता नाही. राज्य मंडळाच्या परीक्षेतील विद्यार्थी उपस्थिती ग्राह्य धरली जाणार असल्याचे पत्रात नमूद करण्यात आले आहे.

